


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार १९ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




## दिल्ली जल बोर्ड भ्रष्टाचार प्रकरण

# आप नेते सत्येंद्र जैनसह ६ जणांना अटक



### एसीबीची मोठी कारवाई

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्ली सरकारच्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने दिल्ली जल बोर्डाच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांच्या संवर्धनासाठीच्या निविदा प्रक्रियेत झालेल्या कथित मोठ्या प्रमाणावरील गैरव्यवहार प्रकरणी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणी माजी मंत्री सत्येंद्र जैन आणि एका आयएएस अधिका-यासह एकूण ६ जणांना अटक करण्यात आली आहे.

या कारवाईमुळे दिल्लीतील राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे.

सत्येंद्र कुमार जैन यांच्यासह उदित प्रकाश राय (माजी मुख्य कार्यकारी अधिकारी, दिल्ली जल बोर्ड), अंकित श्रीवास्तव (माजी कंत्राटी सल्लागार, दिल्ली जल बोर्ड), नागेंद्र यादव ( मेसर्स ए. एन. एंटरप्रायजेसचे मालक), राजा कुमार कुर्रा (मेसर्स युरोटेक एन्व्हायर्नमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे मालक) आणि पंकज वर्मा (मेसर्स सृजनहारचे मालक) यांना अटक करण्यात आली आहे.दिल्ली सरकारच्या दक्षता संचालनालयाने दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिल्ली जल बोर्डाच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांच्या सुधारणा आणि विस्तारासाठी काढण्यात आलेल्या निविदांमध्ये अटी व शर्तीमध्ये फेरफार करणे, भ्रष्टाचार करणे आणि गुन्हेगारी कट रचल्याचा आरोप आरोपींवर आहे.

या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ (२०१८ मधील सुधारणांसह) चे कलम ७, ७-ए, ९ आणि १३ तसेच भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४०९, ४१८ आणि १२०-बी अंतर्गत एसीबी पोलीस ठाण्यात एफआयआर क्र. १०/२०२४ (दिनांक ११ मे २०२४) नोंदवण्यात आला आहे. या घोटाळ्याप्रकरणी सध्या एसीबीकडून अधिक तपास सुरू आहे.

# डॉ.नरेंद्र दाभोलकर हत्याप्रकरणातील मुख्य आरोपी सचिन अंदुरेला जामीन, जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अंनिस) संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्याप्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. न्यायालयाने डॉ. दाभोलकरांच्या हत्याप्रकरणातील मुख्य आरोपी सचिन अंदुरे याला जामीन मंजूर केला आहे. तसेच सचिन अंदुरे याच्या जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती दिली आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची ऑगस्ट २०१३ मध्ये गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. यापूर्वी दाभोलकर प्रकरणातील सहआरोपी शरद कळसकरला एप्रिलमध्येच जामीन मंजूर झाला होता. त्यानंतर आता सचिन अंदुरेलाही न्यायालयने जामीन मंजूर केला आहे. ऑगस्ट २०१३ मध्ये दाभोलकर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. हा न्यायालयाचा निर्णय आहे. त्याबाबत सविस्तर माहिती घेउन आम्ही सर्वोच्च न्यायालयात अपील करु . यापूर्वी शरद कळसकर याला खालच्या कोर्टात शिक्षा झाली होती. मात्र, त्याला उच्च न्यायालयाने जामीन दिला होता. आम्ही त्याविरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयात गेलो होतो, अशी प्रतिक्रिया डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे चिरंजीव डॉ. हमीद दाभोलकर यांनी दिले.



डॉ. नरेंद्र दाभोलकर हे अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करणारे सामाजिक कार्यकर्ते आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (MANS) संस्थापक होते. २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी पुण्यातील ओंकारेश्वर परिसरातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर मार्निंग वॉक करत असताना दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यात त्यांचा मृत्यू झाला. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास पुणे पोलिसांकडे होता. त्यानंतर २०१४ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सीबीआयने तपास हाती घेतला. तपासादरम्यान अनेक आरोपींची नावे समोर आली आणि कटाचा तपास करण्यात आला. १० मे २०२४ रोजी पुण्यातील विशेष न्यायालयाने सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा आणि प्रत्येकी ५ लाख रुपयांचा दंड सुनावला. तर डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे या तिघांची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली. सीबीआयने तावडे यांना कथित सूत्रधार म्हणून मांडले होते; मात्र न्यायालयाला त्यांच्याविरुद्ध दोष सिद्ध करण्याइतका पुरावा मिळाला नाही. त्यानंतर आता शरद कळसकर आणि सचिन अंदुरे या दोघांनाही जामीन मंजूर करण्यात आला आहे.

# ‘जनहित’ असेल तर मुख्यमंत्र्यांना मंत्र्यांचा निर्णय बदलता येणार

**नागपूर/प्रतिनिधी :** एखाद्या मंत्र्याने घेतलेला निर्णय व्यापक जनहिताच्या दृष्टीने बदलणे आवश्यक वाटत असेल, तर आता मुख्यमंत्री त्या निर्णयात हस्तक्षेप करू शकणार आहेत. मात्र, असा निर्णय बदलताना त्यामागील कारणे लेखी स्वरूपात नोंदविणे मुख्यमंत्र्यांना बंधनकारक राहणार आहे. महाराष्ट्र शासनाने शुक्रवारी अधिसूचित केलेल्या महाराष्ट्र शासन कार्यव्यवहार नियम, २०२६ मध्ये मुख्यमंत्र्यांच्या या अधिकाराबाबत स्पष्टता करण्यात आली आहे. न्यायिक किंवा अर्धन्यायिक स्वरूपाच्या प्रकरणांमध्ये मात्र हा अधिकार वापरता येणार नाही. मुख्यमंत्र्यांना मंत्र्यांच्या निर्णयांवर स्वतंत्रपणे हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे का, याबाबत यापूर्वी स्पष्टता नव्हती. २०२३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणात तत्कालीन कार्यव्यवहार नियमांचा आधार घेत महत्त्वाचे निरीक्षण नोंदविले होते. त्या नियमांमध्ये मुख्यमंत्र्यांना स्वतंत्र



### अधिकाराबाबत राज्य शासनाचे नवे नियम जाहीर

अधिकार सोपविण्यात आलेला नसल्याचे न्यायालयाने म्हटले होते.या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आता नव्या कार्यव्यवहार नियमांमध्ये मुख्यमंत्र्यांच्या अधिकाराची स्पष्ट तरतूद केली आहे. संबंधित विभागाच्या मंत्र्याने घेतलेल्या निर्णयाचा जनहिताच्या दृष्टीने पुनर्विचार करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांना वाटल्यास ते निर्णय बदलू शकतील. मात्र, निर्णय का बदलण्यात आला, याची कारणे नोंदविणे आवश्यक असेल.नव्या नियमांनुसार, एखाद्या विभागाशी संबंधित विषयातील कागदपत्रे मुख्यमंत्र्यांना पाहायची असल्यास संबंधित विभागाने ती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री संबंधित विभागाच्या सचिवाकडून कागदपत्रे मागवू शकतात. मुख्य सचिवांनाही कोणत्याही विभागाकडून कागदपत्रे मागविण्याचा अधिकार देण्यात आला आहे.एखाद्या विभागाच्या मंत्र्याने घेतलेल्या निर्णयाचा आढावा घेण्याची किंवा त्यात बदल करण्याची आवश्यकता मुख्यमंत्र्यांना वाटल्यास, त्या निर्णयाची माहितीही त्यांच्याकडे सादर करावी लागणार आहे.

# मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती पुन्हा खालावली

## अंतरवाली सराटीत उपचार सुरू

**अंतरवाली सराटी-** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लढा देणारे आंदोलक मनोज जरांगे



पाटील यांची प्रकृती मंगळवारी अचानक पुन्हा खालावली आहे. अंतरवाली सराटी येथील सरपंचाच्या मळ्यात त्यांच्यावर सध्या वैद्यकीय पथकाकडून उपचार सुरू असून, त्यांना सलाईन लावण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी प्रकृतीच्या तक्रारींमुळे मनोज जरांगे पाटील यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे उपचार घेतल्यानंतर त्यांनी नुकताच डिस्चार्ज घेतला होता आणि ते अंतरवाली सराटी येथे परतले होते. मात्र, गावात परतल्यानंतर त्यांची प्रकृती पुन्हा बिघडल्याने वैद्यकीय पथकाला पाचारण करण्यात आले. सध्या डाक्टरांच्या थेट देखरेखीखाली सरपंचाच्या मळ्यात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. जरांगे पाटील यांच्या प्रकृतीबाबत अद्याप कोणतेही अधिकृत वैद्यकीय बुलेटीन किंवा माहिती समोर आलेली नाही. परंतु, डाक्टरांचे पथक त्यांच्या प्रकृतीवर सतत बारीक लक्ष ठेवून आहे. मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याची बातमी वा-यासारखी पसरताच अंतरवाली सराटी येथील आंदोलनस्थळी उपस्थित असलेल्या हजारो कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. उपचाराच्या ठिकाणी समर्थकांनी मोठी गर्दी केली असून, सर्वजण त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी प्रार्थना करत आहेत.

# बिलाला विलंब झाल्यास व्याज मिळणार

**मुंबई/ प्रतिनिधी-** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध कामांमध्ये सहभागी होणा-या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसह कंत्राटदारांची देयके वेळेत मिळावीत आणि त्यांना आवश्यक वित्तपुरवठा सुलभपणे उपलब्ध व्हावा, यासाठी ट्रेड रिसीव्हेबल्स इलेक्ट्रानिक डिस्काउंटिंग सिस्टीम या डिजिटल प्रणालीचा वापर करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. ट्रेडस प्रणालीच्या माध्यमातून कंत्राटदारांना शासनाकडून



मिळणा-या देयकांच्या आधारे वित्तीय संस्थांकडून तुलनेने वाजवी दरात निधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे कंत्राटदारांना देयके मिळण्यासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करण्याची आवश्यकता कमी होउन त्यांच्या व्यवसायातील रोख प्रवाह सुरळीत राहण्यास हातभार लागणार आहे. या प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी करण्यात येणा-या करारात विलंब झाल्यास व्याज आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. ट्रेडस अंतर्गत वित्तीय संस्थांकडून प्रत्यक्ष डिस्काउंटिंग झाल्यानंतर १८० दिवसांच्या आत शासनाकडून संबंधित देय रक्कम अदा न झाल्यास, विलंबाच्या कालावधीसाठी व्याज देय राहणार आहे. या व्याजाचा दर निश्चित करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येणा-या अंमलबजावणी व संनियंत्रण समितीवर राहणार आहे.

# वयाच्या 19व्या वर्षी विश्वविजेती

## नागपूरची दिव्या देशमुख अर्जुन पुरस्काराची मानकरी

**नागपूर/प्रतिनिधी :** बुद्धिबळाच्या पटावर गेल्या काही वर्षांत सातत्याने ठसा उमटविणा-या नागपूरच्या दिव्या देशमुखच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२५ अंतर्गत



दिव्या देशमुखची अर्जुन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. केंद्र सरकारने मंगळवारी राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची घोषणा केली. बुद्धिबळपटू विदित गुजराथीसह दिव्याचीही अर्जुन पुरस्कारासाठी निवड झाली आहे. यंदा एकूण १७ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

**सातत्यपूर्ण कामगिरीची पावती-** दिव्यासाठी हा केवळ पुरस्कार नसून गेल्या काही वर्षांतील तिच्या सातत्यपूर्ण कामगिरीची पावती आहे. अवघ्या पाचव्या वर्षी बुद्धिबळाला सुरुवात करणा-या दिव्याने अल्पावधीतच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली. बालवयातच तिने जागतिक युवा स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवले. २०१४ मध्ये अंडर-१० आणि २०१७ मध्ये अंडर-१२ जागतिक विजेतेपद पटकावल्यानंतर २०२४ मध्ये तिने अंडर-२० जागतिक ज्युनियर मुलींच्या स्पर्धेतही सुवर्णपदक मिळवले. २०२४ च्या या स्पर्धेत दिव्याने ११ पैकी १० गुण मिळवत अजिंक्य राहत विजेतेपद मिळवले.

**ऑलिम्पियाडमध्येही चमक-** २०२४ हे वर्ष दिव्याच्या कारकिर्दीतील महत्त्वाचे ठरले. बुडापेस्ट येथे झालेल्या ४५व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय महिला संघाने प्रथमच सुवर्णपदक जिंकले. या ऐतिहासिक कामगिरीत दिव्याचा महत्त्वाचा वाटा होता. तिने तिस-या पटावर खेळताना ११ पैकी ८ विजय आणि तीन बरोबरींसह ९.५ गुण मिळवले.

# शाळांना बॉम्ब स्फोटने उडवून देण्याचा मेल खलिस्तानवाद्याचा

**नागपूर/प्रतिनिधी :** शहरातील आघाडीच्या आणि प्रतिष्ठित शिक्षण संस्था असलेल्या १४ शाळांसह न्यायमंदिर आणि जिल्हाधिकारी कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ई मेल धडकल्याने मंगळवारी सकाळी ११ पासून तब्बल साडेतीन तास पोलिसांची तारांबळ उडाली. ज्या ज्या ठिकाणी बॉम्बच्या धमकीचा मेल मिळाला त्या त्या ठिकाणी पोलिसांनी बॉम्ब शोध आणि नाशक टीम, श्वान पथक आणि शिघ्र प्रतिसाद दलाला पाचारण करत संपूर्ण परिसर पिंजून काढला. साडेतीन तासांच्या अथक प्रयत्नांनतर सुदैवाने कुठेही आक्षेपार्ह वस्तू आढळली नसल्याने पोलीस यंत्रणेने सुटकेचा निश्वास टाकला.



**संशयाची सुई खलिस्तानी संघटनांवर -** पोलीस आणि तपास यंत्रणांना घाम फोडणारा हा मेल परदेशातून खलिस्तानवाद्याने पाठवल्याचे मेलमधल्या भाषेवरून समोर येत आहे. यात मेल पाठवणा-यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आगपाखड केली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाळांच्या माध्यमातून मुलांवर विशिष्ट विचारधार लादत असल्याचा संतापही व्यक्तकरत शिख समुदायाने आपल्या मुलांना या शाळेत न पाठवण्याची भाषा वापरण्यात आली आहे.

**काय आहे धमकीच्या मेलमध्ये ?**

यात मराठी नागपूर बोलणार खलिस्तान जिंदाबाद-मोहन भागवत ,मोदी-योगी आरएसएसचे तीन हिंदू माकडे, संघ परिवाराचे सदस्य शीखांचे शत्रू आहेत, असा उल्लेख आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखा संपवा शाळा वाचवा, तुमच्या मुलांना आरएसएस शाखेत पाठवू नका. कारण शाळा ३१ ऑगस्टला दुपारी १:११ वाजता उडवणार आहे. न्यायालय खलिस्तानच्या विरोधात कोर्टात खटला चालवत आहेत. सर्व न्यायालयांत दुपारी २:११ वाजता स्फोट घडवला जाईल. महापौर एमसी, सर्व हिंदू आरएसएस कार्यकर्त्यांना कार्यालय दुपारी ३:११ वाजता फटकारले पाहिजे, अशीही आगपाखड करण्यात आली आहे.

**कोण पाठवला धमकीचा मेल-** शहरातील १४ शाळा, जिल्हाधिकारी कार्यालय आणि न्याय मंदिराची इमारत बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा हा मेल खलिस्तान नॅशनल आर्मी या नावाने पाठवण्यात आला. यात इंजिनिअर गुरानख सिंग, रुकन शाहवाला, डॉ गुरनिर्वैर सिंग, खान राजदा, बब्बर खालसा (परमार-कॅनडा), प्रा. गुरकाल सिंग पीएचडी, खेम करण, प्रा. गुरंगा सिंग, जंदियाला गुरु या नावांचा त्यात उल्लेख आहे.

**सायबर शाखेकडून तपास हाती-** शाळांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा मेल मिळताच पोलिसांनी तडक शोध मोहिम राबवली असली तरी हा मेल नेमका कोणत्या आयपी पत्त्यावरून पाठवला गेला, हा खोडसाळपणा देशातून करण्यात आला, की त्याचे धागेदोरे अन्य कोणत्या देशाशी जुळले आहेत, याचा तपास पोलीस करत आहे. त्यासाठी सायबर शाखेला पाचारण करण्यात आले आहे.

# होर्मुझ अमेरिकेचा नवा भूभाग!

## फोटो शेअर करत ट्रम्प यांची घोषणा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ‘स्ट्रेट ऑफ होर्मुज’ हा अमेरिकेचा नवा भू-भाग अथवा प्रदेश असल्याची घोषणा करणारा एक नकाशा ‘ट्रुथ सोशल’वर पोस्ट केला आहे. तत्पूर्वी, इराणच्या पराभवानंतर, हा प्रदेश अधिकृतपणे अमेरिकेला जोडला जाईल, असे विधान ट्रम्प यांनी नुकतेच केले होते. यानंतर आता त्यांनी हा फोटो पोस्ट केला आहे. त्यांच्या या नव्या पोस्टमुळे मध्य पूर्वेतील लष्करी आणि राजनैतिक संघर्ष आणखी भडकण्याची शक्यता आहे. दरम्यान, इराणचे मुख्य मध्यस्थ, मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी स्पष्ट केले होते की, जोपर्यंत अमेरिका करारांतर्गत आपली वचनबद्धता पूर्ण करत नाही, तोपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली जाणार नाही. तसेच, इराणचा असा दावा आहे की त्यांच्या मागण्या जूनमध्ये अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धविरामाचा भाग होत्या, जो नंतर मोडला गेला.




**इराणच्या मुख्य मागण्या -** अमेरिकन नौदलाची नाकेबंदी उठवली जावी.

इराणच्या तेलावरील निर्बंध उठवले जावेत. परदेशात जप्त केलेली इराणची मालमत्ता आणि निधी परत केला जावा. उर्जा पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग ‘स्ट्रेट ऑफ होर्मुज’ हा जगातील सर्वात महत्त्वाचा उर्जा मार्ग मानला जातो. जगातील तेल पुरवठ्याचा मोठा भाग या मार्गातून जातो. या मार्गावरून अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाचा थेट परिणाम जागतिक इंधन बाजारावर आणि अर्थव्यवस्थेवर होत आहे.

# फाशीची शिक्षा कायम राहणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था ::** मृत्युदंडाच्या शिक्षेची अंमलबजावणी करण्यासाठी गळफास लावण्याची(फाशीची) सध्याची पद्धत रद्द करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवार दि. १८ ऑगस्ट रोजी फेटाळून लावली. मात्र, या विषयावर अधिक वेदनामुक्त आणि आधुनिक पर्यायांचा विचार करण्यास केंद्र सरकार पूर्णपणे मोकळे असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायाधीश विक्रम नाथ आणि न्यायाधीश संदीप मेहता यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (सीआरपीसी) कलम ३५४(५) च्या घटनात्मक वैधतेला या याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले होते. या कलमानुसार फाशीची शिक्षा झालेल्या कैद्याला तो मरेपर्यंत गळ्याला गळफास लावून टांगून ठेवण्याचे निर्देश दिले जातात.

याचिका फेटाळताना न्यायालयाने स्पष्ट केले की, भविष्यात वैद्यकीय किंवा वैज्ञानिकदृष्ट्या अशी कोणतीही ठोस माहिती समोर आली, ज्याद्वारे फाशीच्या पद्धतीवर पुनर्विचार करण्याची गरज निर्माण होईल, तर या मुद्द्याची घटनात्मक तपासणी करण्यास आजचा निर्णय अडसर ठरणार नाही. त्याचप्रमाणे, मृत्युदंडाच्या शिक्षेदरम्यान होणा-या वेदना कमीत कमी व्हाव्यात आणि मानवी प्रतिष्ठेचे जतन व्हावे, या घटनात्मक उद्दिष्टाचा पुनर्विचार करण्यासाठी केंद्र सरकारने तज्ज्ञ समितीमार्फत इतर पर्यायांची चाचपणी केल्यास त्यास न्यायालयाची कोणतीही हरकत नसेल.




**ज्येष्ठ वकील मल्होत्रांची होती याचिका-** ज्येष्ठ वकील ऋषी मल्होत्रा यांनी ही जनहित याचिका दाखल केली होती. गळफास लावून फाशी देण्याच्या पद्धतीमध्ये कैद्याला दीर्घकाळ अत्यंत वेदना आणि हाल सहन करावे लागतात, असा दावा याचिकेत करण्यात आला होता. फाशीच्या ऐवजी घातक इंजेक्शन, गोळ्या झाडणे, विजेचा धक्का देणे किंवा गॅस चेंबर यांसारख्या पर्यायांचा अवलंब करावा. या पर्यायांमुळे फाशीची शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपींचा अवघ्या काही मिनिटांत वेदनामुक्त मृत्यू होउ शकतो, अशी मागणी त्यांनी केली होती.

**दोन मुख्य मागण्या कोणत्या?**

याचिकेत प्रामुख्याने दोन मुख्य मागण्या करण्यात आल्या होत्या. यामध्ये पहिली मागणीही सीआरपीसीचे कलम ३५४(५) हे भेदभाव करणारे आणि संविधानाच्या कलम २१ (जीविताचा अधिकार) चे उल्लंघन करणारे असून, ज्ञान कौर प्रकरणातील घटनापीठाच्या निर्णयाशी विसंगत असल्याचे घोषित करावे. तर दुसरी मागणी ही सन्मानजनक पद्धतीने मृत्यू मिळणे हा संविधानाच्या कलम २१ अंतर्गत मूलभूत अधिकार घोषित करावा, अशी होती.

**फाशी विरुद्ध इतर पर्यायाची तुलना**

याचिकेत नमूद करण्यात आले होते की, गळफासाच्या प्रक्रियेत कैद्याला मृत घोषित करेपर्यंत ४० मिनिटांहून अधिक वेळ लागतो, तर गोळ्या झाडून मृत्यूदंडाची अंमलबजावणी केवळ काही मिनिटांत पूर्ण होते. तसेच प्राणघातक इंजेक्शन दिल्यास अवघ्या ५ मिनिटांत मृत्यू होतो. याचिकाकर्त्यांच्या मते, गळफासाची पद्धत रानटी, अमानुष आणि क्रूर आहे. संयुक्त राष्ट्र आर्थिक व सामाजिक परिषदेच्या ठरावाचा दाखला देत त्यांनी सांगितले की मृत्युदंड देताना कमीत कमी वेदना होतील अशाच पद्धतीने त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

**तज्ज्ञ समिती स्थापन करण-याची शिफारस**

मार्च २०२३ मध्ये सुनावणीदरम्यान न्यायालयाने या विषयावर तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचा विचार केला होता. न्यायालयाने भारताचे अ‍ॅटर्नी जनरल आर. व्यंकटरमणी यांना फाशीमुळे होणारा त्रास, त्यासाठी लागणारा वेळ आणि उपलब्ध संसाधनांविषयीची माहिती सादर करण्याचे निर्देश दिले होते. मे २०२३ मध्ये अ‍ॅटर्नी जनरल यांनी न्यायालयाला माहिती दिली की, मृत्युदंडाच्या शिक्षेसाठी अधिक चांगला पर्याय उपलब्ध आहे का, हे ठरवण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन करण्याची शिफारस त्यांनी सरकारला केली आहे.

**अमेरिकेचे उदाहरण आणि लष्करी कायद्याचा संदर्भ-** गेल्या वर्षी सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांनी अमेरिकेचे उदाहरण दिले. अमेरिकेतील ५० पैकी ४९ राज्यांनी फाशीऐवजी घातक इंजेक्शनचा पर्याय स्वीकारला आहे. किमान दोषी कैद्याला फाशी हवी की इंजेक्शन, असा पर्याय तरी दिला जावा. गळफासाच्या तुलनेत घातक इंजेक्शन ही जलद, मानवीय आणि अधिक सन्मानजनक पद्धत आहे असा युक्तिवाद त्यांनी केला होता. भारतीय सशस्त्र दलांच्या कायद्यांमध्ये असा पर्याय उपलब्ध असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. केंद्र सरकारने कैद्यांना शिक्षेचा पर्याय देण्याच्या सूचनेला विरोध केल्याबद्दल न्यायालयाने चिंता व्यक्त केली होती.

**जल्लादांवरील मानसिक प्रभावाकडेही न्यायालयाने वेधले लक्ष**

सुनावणीदरम्यान न्यायाधीश संदीप मेहता यांनी गळफास देणा-या जल्लादांवर पडणा-या मानसिक प्रभावाकडेही लक्ष वेधले. अ‍ॅटर्नी जनरल व्यंकटरमणी यांनी शेवटी न्यायालयाला आश्वस्त केले की, केंद्र सरकार सर्वोच्च स्तरावर या विषयाची गंभीर दखल घेत असून काही समित्यांचे गठन करण्यात आले आहे. त्यानंतर जानेवारी महिन्यात न्यायालयाने या याचिकेवरील आपला निर्णय राखून ठेवला होता, आज तो जाहीर करण-यात आला.



# 'एसआयआर' मधून वगळलेल्या मतदारांना पुन्हा एकदा नाव दाखल करण्याची संधी

## यादीतील सुधारणेसाठी बीएलओशी संपर्क साधावा - आ. सुलभा खोडके

**अमरावती/प्रतिनिधी: -**
विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमात जिल्ह्यातील ३ लाख ३० हजार ४०१ मतदार वगळण्यात आले आहेत. त्यात अमरावती विधानसभा मतदार संघातील ७५,६३७ मतदारांचा समावेश आहे. वगळण्यात आलेल्या मतदारांच्या नावाची यादी amravati.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. नावे दुबार असल्यामुळे व काही स्थलांतरीत तर काही नोंदणीवेळी अनुपस्थित असल्याने नावे वगळण्यात आली आहे. यापैकी पात्र नागरिकांना पुन्हा एकदा नाव दाखल करण्याची संधी देण्यात आली आहे. ही संधी २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर अशी महिनाभर सुरु राहील. वगळलेल्या मतदारांच्या यादीत नाव असल्यास तसेच यादीतील नाव सुधारणेसाठी तातडीने बीएलओंशी संपर्क साधावा, असे आवाहन आमदार सुलभा खोडके यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रासह अमरावती जिल्ह्यात मतदारयाद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जिल्ह्यासह अमरावती विधानसभा मतदार संघात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.



या अंतर्गत ब्लॉक लेवल ऑफीसर ( बि.एल.ओ) यांनी मतदारांच्या घरभेटी घेत प्रत्येकाकडून संपूर्ण माहितीनिशी गणना अर्ज भरून घेतला. अर्जाची खातरजमा करून ती नावे डीजीटल पद्धतीने संगणकीकृत करण्यात आली आहे. अमरावती विधानसभा मतदार संघात ३,७५,३९३ मतदार असून एस.आय. आर. मॅपिंग प्रक्रियेनंतर २,९९,४२६ नव्या यादीत स्थान मिळाले आहे. तर ७५,६३७ मतदारांची नावे वगळण्यात आले आहे. या मतदारांमध्ये मृत, दुबार नावे, स्थलांतरीत आणि इतर कारणांनी मूळ जागी न राहणाऱ्यांचा समावेश आहे. ज्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली, त्यांची यादी आगामी २४ ऑगस्ट रोजी अमरावती तहसील कार्यालयात जाहीर केली जाणार आहे. शिवाय यादीतून नाव वगळलेल्या मतदारांना पुन्हा एकदा नाव दाखल करण्याची संधी म्हणून नव्याने नाव नोंदवण्याची संधी म्हणून २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर असा महिनाभराचा कालावधी देण्यात आला आहे. अमरावती विधानसभा मतदार संघातील एकही पात्र मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही. यासाठी सर्व नागरिक, राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी यांनी यादीचे अवलोकन करावे. पात्र मतदाराचे नाव पत्ता सापडला नसल्यास किंवा 'अनकलेक्टेड' वर्गवारीमध्ये समाविष्ट झाले असल्यास अथवा त्यांनी गणनापत्रक जमा केले नसल्यास, त्यांनी त्वरित संबंधित बीएलओशी संपर्क साधून गणनापत्रकात अचूक माहितीसह भरावी, तसेच गणना पत्रक जमा करावे, असे आवाहन आ. खोडके यांनी केले आहे.

नागरिकांनी आपल्या बीएलओंची भेट घेऊन एसआयआर मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच यादीच्या सुधारणेसाठी सहकार्य करावे, या संदर्भात काही अडचणी असल्यास अमरावती विधानसभा मतदार संघातील मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तसेच बीएलओ पर्यवेक्षक अथवा मतदार केंद्रस्तरीय अधिकारी किंवा आमचे हेल्पलाईन नंबर ८३०८०८००८८, ७३८७२६६९७०, ७४१०७७०६३५ ,७३८५२१५३९५, ९९७५२०५२००, ९३७१८१८७८४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# EECP उपचार पद्धतीचे डेमो व हृदयरोग निदान शिबिर

## अमरावतीत १९ ऑगस्टला आयोजन; पहिल्या ५० रुग्णांसाठी तपासण्या मोफत

**अमरावती/प्रतिनिधी :-**
हृदयरोगाच्या रुग्णांसाठी आधुनिक व शस्त्रक्रियाविरहित उपचारपद्धतीची माहिती आणि मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने भडांगे EECP हार्ट अँड डेंटल केअर यांच्या वतीने EECP उपचार पद्धतीचे डेमो व हृदयरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत भडांगे EECP हार्ट अँड डेंटल केअर, दत्ता पॅलेस, युनियन बँकेसमोर, गांधी चौक, अमरावती येथे होणार आहे.

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन, ECG तपासणी तसेच साखर तपासणी करण्यात येणार असून, पहिल्या ५० रुग्णांसाठी या तपासण्या मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

EECP (Enhanced External Counterpulsation) ही शस्त्रक्रियाविरहित उपचारपद्धती असून, काही निवडक हृदयरुग्णांसाठी ती उपयुक्त ठरू शकते. विशेषतः बायपास शस्त्रक्रिया करणे शक्य नसलेल्या किंवा शस्त्रक्रिया टाळण्याचा पर्याय शोधणाऱ्या रुग्णांनी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचारपद्धतीबाबत माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शिबिरासाठी डॉ. अभिषेक एस. भडांगे (MBBS, MD, FICA) मार्गदर्शन करणार असून त्यांना आयसीयू तसेच बायपास शस्त्रक्रियेसाठी भूल देण्याचा अनुभव आहे. तसेच डॉ. विमी जैन (BDS, MDS), मॅक्सिलोफेशियल सर्जन व चेहरा-जबड्याच्या शल्यचिकित्सक यांचीही उपस्थिती राहणार आहे.

EECP उपचार घेतलेल्या रुग्णांनीही सकारात्मक अनुभव व्यक्त केले आहेत. मोर्शी येथील श्री. अंबुलकर यांनी पूर्वी बायपास शस्त्रक्रिया झाली होती. त्यानंतर EECP उपचार घेतल्यानंतर दैनंदिन कामे पूर्वीप्रमाणे करता येत असून हृदयाची पंपिंग क्षमता वाढल्याचे त्यांनी सांगितले. अमरावती येथील श्री. जावरकर यांनीही बायपास शस्त्रक्रियेनंतर EECP उपचार घेतल्यानंतर नियमित चालण्याची क्षमता सुधारल्याचा अनुभव व्यक्त केला.

EECP उपचारामुळे हृदयाला रक्तपुरवठा सुधारण्यास मदत होऊ शकते, व्यायाम सहनशक्ती व दैनंदिन काम करण्याची क्षमता सुधारण्यास काही रुग्णांना फायदा होऊ शकतो. मात्र, उपचाराची उपयुक्तता प्रत्येक रुग्णाच्या वैद्यकीय स्थितीनुसार तज्ज्ञ डॉक्टरांच्या तपासणीनंतर निश्चित केली जाते. शिबिरासाठी अधिक माहितीसाठी ७९७२२२२१४७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

# भीमशक्ती संघटनेचे मुंडन आंदोलन

## मल्लिकार्जुन खरगे यांच्या सभा मंडपाचे शुद्धीकरण करण्याचा निषेध

**अमरावती/प्रतिनिधीः-**
राज्यसभेचे विरोधी पक्षनेता मल्लिकार्जुन खरगे यांच्या उत्तराखंडमध्ये झालेल्या सभेनंतर सभा मंडपाचे शुद्धीकरण करण्यात आले होते. या घटनेच्या निषेधार्थ भीमशक्ती संघटनेच्या वतीने आज मंगळवार १८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मुंडन आंदोलन करण्यात आले. संविधानाने प्रत्येकाला समानतेचा अधिकार आणि समान प्रतिष्ठा अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले असून जात-पात धर्म अथवा सामाजिक पार्श्वभूमीच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीचा अपमान करणा-या जातीयवादी प्रवृत्तीला स्थान नाही. देशाच्या राजकारणात सर्वोच्च स्थान प्राप्त केलेल्या राज्यसभेच्या विरोधी पक्ष नेता मल्लिकार्जुन खरगे यांच्या उत्तराखंडच्या सभेनंतर सभामंडपाचे शुद्धीकरण करण्यात आले जे संवैधानिक मूल्यावर आघात करणारी



मानसिकता दर्शविते.

दरम्यान या घटनेचा खासदार चंद्रकांत हंडोरे प्रणित भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने निषेध करण्यात आला आणि शुद्धीकरणाचा निषेध करत पिंडदान करून मुंडन आंदोलन केले. मुंडन आंदोलन करणाऱ्यांमध्ये पंकज मेश्राम, राजेंद्र लोणारे, विकास डोंगरे, संजय भोयते, पंजाबराव मडावी, प्रदीप वानखडे ,नामदेव मोहोड, संजय अढाऊ, जितेंद्र मेश्राम, नागेश उंबरकर, राजेश उमकसह इतरांचा सहभाग होता.

# अमरावतीचे जागतिक तिरंदाज यशदीप भोगे यांना राज्य शासनाकडून ५२ लाखांचा निधी

## -मार्गदर्शक गणेश विश्वकर्मा यांनाही ५ लाखांचा निधी

### -आशियाई स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीची दखल

**अमरावती/प्रतिनिधीः-**
शहरातील प्रसिद्ध जागतिक तिरंदाज यशदीप संजय भोगे यांच्या आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेतील ऐतिहासिक सुवर्णपदकाची दखल घेत त्यांच्या या कामगिरीसाठी राज्य शासनाने ५२ लाख ५० हजारांचा पारितोषिक निधी मंजूर केला आहे. त्यांचे मार्गदर्शक गणेश विश्वकर्मा यांनाही ५ लाख २५ हजरांचा पारितोषिक निधी आजच्या क्रीडा विभागाच्या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आला आहे. ढाका (बांग्लादेश) येथे नोव्हेंबर २०२५ मध्ये झालेल्या आशियाई तिरंजादी अजिंक्यपद स्पर्धेत पुरुष रिकर्व्ह सांघिक प्रकारात यशदीप भोगे, अतनु दास आणि राहुल या भारतीय पुरुष रिकर्व्ह संघाने अंतिम फेरीत दक्षिण कोरियाचा पराभव करून



सुवर्णपदक जिंकले होते. भारताचे हे १८ वर्षांतील पहिले आशियाई सांघिक सुवर्णपदक ठरले. या कामगिरीची दखल घेत राज्य शासनाच्या क्रीडा विभागाने आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्पर्धेत गौरव वाढविणाऱ्या महाराष्ट्रातील पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याच्या योजनेंतर्गत आज यशदीप भोगे व मार्गदर्शक गणेश विश्वकर्मा यांना पारितोषिक निधी मंजूर केला आहे. धनुर्विद्या, पॅरा बॅडमिंटन, शूटींग, स्क्वॉश, क्रिकेट आणि पॅरा ॲथेलिटीक्स प्रकारात आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या महाराष्ट्रातील पदक प्राप्त १५ खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना (१५) एकूण १९ कोटी ४१ लाख ५० हजारांचा निधी रोख रक्कम पारितोषिक म्हणून मंजूर केला असून क्रीडा विभागाने तसा शासन निर्णय आज निर्गमीत केला आहे. खेळाडूंच्या यादीत प्रसिद्ध क्रिकेटपटू सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबे , पॅरा ॲथेलिट्स दीलीप गावित यांचा समावेश आहे.

# नियमित वेतन न मिळाल्याने सुरक्षा रक्षकांवर उपासमारीची वेळ

## प्रहारची कामगार आयुक्तालयावर धडक

अमरावती/प्रतिनिधीः-
नियमित वेतन न मिळाल्याने सुरक्षारक्षकांवर उपासमारीची वेळ आली आहे. यावर लवकरात तोडगा काढण्याची मागणी प्रहार सामाजिक संघटनेच्या वतीने कामगार आयुक्तांकडे आज मंगळवार १८ ऑगस्ट रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. निवेदनात म्हटले



आहे की, कल्याण मंडळ तर्फे विविध आस्थापनामध्ये सुरक्षारक्षक पुरविण्यात आले आहे. शहरातील अनेक आस्थापनामध्ये सुरक्षा रक्षक कार्यरत आहे. ते प्रामाणिकपणे आपले काम करत आहेत. परंतु अनेक आस्थापनांकडून त्यांना नियमित वेतन दिले जात नाही आहे. दोन ते तीन महिन्यापासून वेतन नसल्याने सुरक्षारक्षकांचे कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. यामुळे त्यांना लवकरात लवकर वेतन देण्यात यावे अन्यथा आंदोलनाचा इशारा प्रहार संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी छोटू महाराज वसू, बंटी रामटेके, जितू दुधाने, प्रशांत शिरभाते, इमरान खान, चेतन बर्डे, मधुकर भुले सह संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## १० वरिल उर्वरित

### आदिवासी विद्यार्थ्याचा अन्नातून

जुलाबाचा त्रास सुरू झाला. रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्याऐवजी शाळा प्रशासनाने त्यांना मेळघाटातील मूळ गावी पाठवून जबाबदारी झटकली.

प्रकृती अधिक बिघडल्याने राजेश बेठेकर याचा १६ ऑगस्ट रोजी पहाटे मृत्यू झाला. त्याचा चुलत भाऊ रामप्रसाद याच्यावर चुरणी रुग्णालयात, तर इतर ५ आजारी विद्यार्थ्यांवर अमरावतीतील राजापेठ येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

१४ ऑगस्टला गावी जाताना राजेशची प्रकृती उत्तम होती आणि १६ ऑगस्टच्या मृत्यूबद्दल १७ ऑगस्टला माहिती मिळाल्याचा दावा शाळा प्रशासनाने केला आहे. मात्र, नियमानुसार शासकीय रुग्णालयात न नेता खासगी रुग्णालयात भरती केल्याने पालकांनी संशय व्यक्त केला आहे.

### दुचाकीच्या चाकात स्कार्फ

ज्ञानेश निरंजन जामनेकर (वय २६) हे आपल्या आईसोबत एमएच २७ डीएक्स १२०३ क्रमांकाच्या दुचाकीने अकोला येथून अमरावतीकडे येत होते. आसरा गावासमोर दुचाकी धावत असताना ज्ञानेश यांच्या गळ्यातील निळसर-पारदर्शक स्कार्फ अचानक दुचाकीच्या मागील चाकात अडकला. त्यामुळे दुचाकीचा तोल जाऊन दोघेही रस्त्यावर पडले. अपघातात ज्ञानेश यांच्या आईच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाला. परिसरातील नागरिकांनी तत्काळ दोघांना पिकअप वाहनातून भातकुली येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासून महिलेला मृत घोषित केले. याप्रकरणी ज्ञानेश जामनकर यांच्या जबानीवरून भातकुली पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे

### मुथूट फिनकॉर्प फसवणूक

तक्रारीवरून ५ ऑगस्ट रोजी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासाची सूत्रे हाती घेतल्यानंतर पोलिसांनी शुभम रविंद्र वासेवाय (वय ३१), सुरज अनिलराव खेरकर (वय ३२) आणि धिरज पंचमराव सिरसाट (वय २९) या तिघांना अटक केली आहे. तपासादरम्यान या गुन्ह्यात एमपीआयडी कायद्याचे कलम ३ देखील वाढविण्यात आले आहे. आरोपींची पोलिस कोठडीत चौकशी केली असता, कथितरीत्या अपहार केलेले सोन्याचे दागिने विविध सोनारांकडे गहाण ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी यापूर्वीही काही दागिने हस्तगत केले होते.

तपासादरम्यान सराफा बाजारातील करुळे ज्वेलर्स, खरैय्या मार्केट येथे या प्रकरणातील आणखी सोन्याचे दागिने असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिस पथकाने पंचांसमक्ष संबंधित दागिन्यांची तपासणी केली. शासकीय धातुनिरीक्षकामार्फत वजन व तपासणी केल्यानंतर ३६०.६८० ग्रॅम सोन्याचे विविध दागिने जप्त करण्यात आले. या ताज्या कारवाईमुळे प्रकरणातील जप्त सोन्याचे वजन १ किलो ७०९.८८० ग्रॅमवर पोहोचले असून, तपासात आणखी कोणता मुद्देमाल समोर येतो, याकडे लक्ष लागले आहे. सिटी कोतवाली पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

मुथूट फिनकॉर्प लिमिटेड, विमको टॉवर, अमरावती शाखेशी संबंधित फसवणूक, अपहार किंवा अन्य कोणत्याही प्रकारची तक्रार नागरिकांची असल्यास त्यांनी सिटी कोतवाली पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# बडनेरामध्ये धावत्या मालवाहू वाहनाने घेतला पेट

## -चालकाच्या प्रसंगावधानाने मोठा अनर्थ टळला

**अमरावती/प्रतिनिधीः-**
बडनेरा जुनी वस्ती परिसरात आज मंगळवार १८ ऑगस्ट रोजी एका धावत्या मालवाहू वाहनाने अचानक पेट घेतला. अचानक घडलेल्या या घटनांमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. चालकाच्या प्रसंगावधाने मोठा अनर्थ टळला. या घटनेमुळे परिसरात वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. दोन्ही कडून वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. माहितीनुसार मंगळवारी सकाळी दहा वाजता सुमारास मालवाहू वाहन एम एच २७ एक्स ३४ १२ जुनी बस्ती परिसरातून जात असताना अचानक इंजिनच्या भागातून धूर निघू लागला. धोका लक्षात येताच चालक शेख मोहसीन शेख हारून यांनी प्रसंगावधान दाखवून तातडीने गाडी रस्त्याच्या कडेला थांबवली.



त्यानंतर काही क्षणातच केबिन मधून आगीच्या ज्वाळा बाहेर येऊ लागल्या आणि संपूर्ण वाहन आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. आग इतक्या वेगाने पसरली की पाहता पाहता संपूर्ण गाडी जळून खाक झाली. चालकाने वाहनातून उडी घेतल्याने मोठा अनर्थ टळला.या घटने नंतर मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. घटनेचे गांभीर्य पाहून स्थानिक नागरिकांनी अग्निशमन दल आणि पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पथकाने वीस मिनिटाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली पण तोपर्यंत वाहन जळून खाक झाले होते. प्राथमिक तपासात इंजिन मध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या घरावर चोरट्यांचा डल्ला

## -११ लाखांचा ऐवज लंपास -परतवाड्यात बंद घर फोडले

**अचलपूर/प्रतिनिधीः-**
शहरातील नायरा पेट्रोल पंप परिसरात असलेल्या सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी सुमारे ११ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना मंगळवारी उघडकीस आली.

न्यायाधीशांच्या घराला लक्ष्य करण्यात आल्याने पोलिस यंत्रणाही सतर्क झाली असून, चोरट्यांचा माग काढण्यासाठी विविध पथके कामाला लागली आहेत. संबंधित सेवानिवृत्त न्यायाधीश सध्या नागपूर येथे वास्तव्यास असून, परतवाड्यातील त्यांचे घर बंद होते. मंगळवारी त्यांच्या भावाने घराची पाहणी करण्यासाठी प्रवेश केला असता आतील साहित्य अस्ताव्यस्त आढळले. घराची पाहणी केल्यानंतर चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तत्काळ परतवाडा पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. घराची पाहणी करून पंचनामा करण्यात आला. चोरट्यांनी घरात नेमक्या कोणत्या मार्गाने प्रवेश केला आणि चोरीची घटना कोणत्या कालावधीत घडली, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

चोरीच्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले. पथकाने घटनास्थळावरून ठसे व इतर भौतिक पुरावे संकलित केले. त्याचबरोबर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि श्वान पथकही घटनास्थळी दाखल झाले. श्वान पथकाच्या माध्यमातून चोरट्यांचा संभाव्य मार्ग शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# गुन्हेगारी व वाहतूक कोंडीच्या गंभीर प्रश्नांवर उपाययोजना करा

## -शिंदे शिवसेनेचे पोलिसांना निवेदन

**खल्लार/प्रतिनिधीः-**
दर्यापूर शहरात वाढती गुन्हेगारी, घरफोडी, चोऱ्या आणि बिघडलेली वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, या मागणीचे निवेदन शिंदे शिवसेनेच्या वतीने पोलिस निरीक्षक अजित राठोड यांना आज (दि.१८) सादर करण्यात आले. नगरपरिषदेचे शिंदे शिवसेना गटनेते प्रदीप मलिये यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले.

रिद्धपूर येथे बसखाली आल्याने एका बालिकेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर वाहतूक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलावित अशी मागणी



निवेदनातून करण्यात आली.

शाळा-महाविद्यालय परिसरात 'सुरक्षित मार्ग' निश्चित करून निर्भया पथकाची गस्त वाढवावी. रात्रीची नाकाबंदी संवेदनशील आणि व्यापारी परिसरात रात्रीची पोलिस गस्त व अचानक नाकाबंदी तीव्र करावी. वाहतूक नियंत्रण गर्दीच्या वेळेत ('पीक आवर्स') मुख्य चौकांत अतिरिक्त वाहतूक पोलिस तैनात करावेत आणि अल्पवयीन चालकांवर कडक कारवाई करावी. अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या नेटवर्कचा शोध घेऊन संबंधितांवर कठोर गुन्हे दाखल करावेत. पोलिस, नगरपरिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्त पाहणी करून धोकादायक ठिकाणी ('ब्लॅक स्पॉट्स') सीसीटीव्ही व प्रकाशव्यवस्था उभारावी. सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती करून दरमहा नागरिक-पोलिस संवाद बैठकीचे आयोजन करावे. शहरात कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वी प्रभावी प्रतिबंधात्मक पावले उचलावित, असा इशाराही यावेळी देण्यात आला. निवेदन सादर करताना प्रदीप मलिये गटनेते शिवसेना, जिल्हा समन्वयक गोपाल पाटील, अरबट प्रदीप वडतकर, ओम राणे, यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


### भोकर-काळेगाव रस्ता प्रकरण तापले

# चौकशी अहवालाने अनियमिततेचा पर्दाफाश; आता कारवाईला 'ब्रेक' का?

■ प्रभारी कार्यकारी अभियंता प्रकाश इंगळे यांना तात्काळ कार्यमुक्त करण्याची मागणी
■ 'अधिकारी दोषी आढळल्यास कारवाई करू'
■ जिल्हा परिषद प्रशासनाकडून नोटीस व खुलाशाचे संकेत

■ प्रतिनिधी | अकोला ■

तेल्हारा तालुक्यातील भोकर-काळेगाव रस्ता व लहान पूल बांधकामातील कथित अनियमिततेचा मुद्दा आता जिल्हा परिषद प्रशासनाच्या दारात धडकला आहे. तब्बल १ कोटी ६४ लाख ६९ हजार रुपयांच्या या कामाची त्रयस्थ तांत्रिक चौकशी झाली. चौकशी अहवालातच 'मोठ्या प्रमाणात अनियमितता' झाल्याचे नमूद असल्याचा दावा तक्रारदार अरविंद पाटील यांनी केला आहे. मात्र अहवाल प्राप्त होऊनही तातडीची कारवाई झालेली नसल्याने आता प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभा अकोला जिल्हाध्यक्ष अरविंद पाटील यांनी आणखी आक्रमक भूमिका घेत प्रभारी कार्यकारी अभियंता प्रकाश इंगळे यांना तात्काळ पदावरून कार्यमुक्त करण्याची मागणी केली आहे. संबंधित अधिकारी पदावर राहिल्यास दस्तऐवज व पुराव्यांमध्ये छेडछाड किंवा ते नष्ट होण्याची शक्यता असल्याचा दावा करत त्यांनी वरिष्ठ प्रशासनाकडे ही मागणी केली आहे.

**पाईपच्या नोंदीपासून रस्त्याच्या गुणवत्तेपर्यंत सवाल**

प्रकरणातील आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे आरसीसी पाईपच्या नोंदीतील कथित तफावत. माप पुस्तिकेतील नोंदी आणि प्रत्यक्ष पाहणीत आढळलेले पाईप यामध्ये फरक असल्याचे चौकशी अहवालात नमूद असल्याचा दावा करण्यात आला आहे. याशिवाय रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या गटारांचा योग्य निचरा नसणे, काही ठिकाणी शेतात पाणी साचणे, मातीचे काम अपेक्षित पद्धतीने न होणे, रस्ता खचणे आणि खडी उखडल्याचे निरीक्षण मोका पाहणीत नोंदले गेल्याचे पाटील यांनी म्हटले आहे. एकीकडे



कोट्यवधींचे काम, दुसरीकडे चौकशी अहवालात अनियमिततेची नोंद; मग जबाबदार कोण? हा सवाल आता उपस्थित होत आहे.

**'प्रभारी कार्यकारी अभियंत्यांना तात्काळ कार्यमुक्त करा'**

या प्रकरणात अरविंद पाटील यांनी वरिष्ठ प्रशासनाकडे स्वतंत्रपणे निवेदन देत प्रभारी कार्यकारी अभियंता प्रकाश इंगळे यांना पदावरून तात्काळ कार्यमुक्त करण्याची मागणी केली आहे. पाटील यांच्या म्हणण्यानुसार, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने प्रथमदर्शनी संबंधित अधिकारी दोषी असल्याचे दिसून येत असल्याने ते त्याच पदावर राहणे योग्य नाही. ते पदावर कायम राहिल्यास दस्तऐवज अथवा पुराव्यांमध्ये छेडछाड होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे चौकशी निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्याला तात्काळ कार्यमुक्त करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

**प्रशासनाची भूमिका काय?**

दरम्यान, या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाशी संपर्क साधला असता, संबंधित अधिकारी वर्गाला नोटीस बजावून त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधितांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्याची तपासणी करण्यात येईल. खुलासा समाधानकारक नसल्यास दोषी अधिकारी वर्गावर नियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, अशी भूमिका प्रशासनाने स्पष्ट केली आहे. त्यामुळे आता प्रशासनाच्या नोटीसनंतर संबंधित अधिकारी काय खुलासा करतात आणि त्या खुलाशावर वरिष्ठ अधिकारी कोणता निर्णय घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

**"चौकशी अहवालातील निरीक्षणांनी खळबळ**

भोकर ते काळेगाव रस्त्याच्या कामाबाबत दाखल तक्रारीनंतर राज्य गुणवत्ता निरीक्षक ग्रेड-२ यांच्यामार्फत प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीनंतर तयार झालेल्या अहवालात प्रशासकीय मंजुरीपासून प्रत्यक्ष बांधकामाच्या गुणवत्तेपर्यंत अनेक मुद्द्यांवर आक्षेप नोंदविण्यात आल्याचे पाटील यांचे म्हणणे आहे. नवीन कामासाठी आवश्यक प्रक्रिया, प्रत्यक्ष मोका पाहणी, तांत्रिक मान्यता, क्रस्ट डिझाईन, मंजूर कामाच्या व्याप्तीतील बदल, करारनाम्याबाहेरील बाबी आणि काही बाबींच्या प्रमाणात झालेली वाढ यासंदर्भात चौकशी अहवालात प्रश्न उपस्थित झाल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, साहित्य चाचणी अधिकृत प्रयोगशाळेत होणे अपेक्षित असताना खासगी प्रयोगशाळेचा वापर झाल्याचे अहवालात नमूद असल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. माप पुस्तिका, चाचणी अहवाल आणि भुगतानाच्या आधारावरही प्रश्न उपस्थित करण्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

**अहवाल गंभीर पण कारवाईचा वेग मंद?**

चौकशी अहवालात मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळल्याचे नमूद असल्याचा तक्रारदाराचा दावा आहे. दुसरीकडे प्रशासनाने अद्याप थेट दोष निश्चित न करता संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे या प्रकरणात आता खरी कसोटी 'चौकशी अहवालानंतर प्रशासन किती वेगाने आणि किती निष्पक्षपणे कारवाई करते?' याची आहे. कोट्यवधींच्या सार्वजनिक निधीतून झालेल्या कामाबाबत तांत्रिक त्रुटी, माप पुस्तिकेतील कथित तफावत, साहित्य चाचणी, मंजूर व्याप्तीतील बदल आणि शेतांमध्ये पाणी साचण्यासारखे मुद्दे समोर आले असतील, तर केवळ कागदी खुलाशांवर प्रकरण थांबणार की जबाबदारी निश्चित होऊन प्रत्यक्ष कारवाई होणार, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**२४ ऑगस्टचा 'एल्गार'; प्रशासनासमोर मोठे आव्हान**

दरम्यान, या प्रकरणी तक्रारदार अरविंद पाटील यांनी यापूर्वीच २४ ऑगस्ट २०२६ पासून जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. सात दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. याशिवाय दोषी अधिकारी व संबंधितांविरुद्ध फौजदारी कारवाई, निलंबन, स्वतंत्र तांत्रिक फेरचौकशी, लेखापरीक्षण तसेच कंत्राटदाराला काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्याच्या मागण्या त्यांनी केल्या आहेत. त्यामुळे भोकर-काळेगाव रस्त्याचा 'रस्ता' आता केवळ बांधकामाच्या गुणवत्तेपुरता राहिलेला नसून प्रशासनाच्या कारवाईच्या विश्वासार्हतेचीही परीक्षा बनला आहे. चौकशी अहवालातील निरीक्षणांवर प्रशासन काय निर्णय घेते, संबंधित अधिकाऱ्यांचा खुलासा काय असतो आणि २४ ऑगस्टपूर्वी प्रत्यक्ष कारवाई होते का, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

## मुसळवाडी, खिर्डा येथे क्षयरोग तपासणी शिबिर; १२३ संशयितांचे एक्स-रे

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

प्राथमिक आरोग्य केंद्र मुसळवाडी येथे संशयित क्षयरुग्णांच्या तपासणीसाठी क्षयरोग व एड्स तपासणी शिबिर घेण्यात आले. फिरत्या क्ष-किरण वाहनातील डिजिटल एक्स-रे मशीनद्वारे ५२ संशयितांची तपासणी करण्यात आली. यापैकी २० संशयितांचे थुंकीचे नमुने (स्पुटम) संकलित करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. झरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.



परभणकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. खासबागे, वैद्यकीय अधिकारी डॉ. बांडे व डॉ. साठे यांच्या मार्गदर्शनाखाली क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी एक्स-रे तपासणी केली. यावेळी नामदेव धंदरे, सूरज गवळी, लक्ष्मी मैघने, ज्ञानेश्वर कराळे, प्रेमानंद नप्ते, विनायक नप्ते, गौरीशंकर कोळसकर, सुषमा खरात, युनिटी पॉवर कंपनीचे कर्मचारी तसेच आशा कार्यकर्ती, गोपाल गोटे व गणेश राऊत उपस्थित होते. दरम्यान, लिंक वर्कर प्रशांत सूर्य व प्रशांत सुर्वे यांनी ५५ व्यक्तींची एचआयव्ही/एड्स तपासणी केली. तसेच आरोग्य उपकेंद्र डव्हा अंतर्गत मौजे खीर्डा येथेही संशयित क्षयरुग्णांची तपासणी करण्यात आली. समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. वृषाली राणे यांच्या मार्गदर्शनाखाली एक्स-रे टेक्निशियन कार्तिक शिरसाट यांनी ७१ संशयितांचे एक्स-रे काढले.

## उद्या महानगरात मातृशक्तीची कांवड - कलश यात्रा

■ प्रतिनिधी | अकोला ■

विश्व मांगल्य सभा व अकोला शहरातील विविध मातृशक्ती मंडळे तसेच महिला संघटनांच्या संयुक्त नेतृत्वात श्रावण महिन्यानिमित्त भव्य 'मातृशक्ती कांवड - कलश यात्रा'चे आयोजन करण्यात आले आहे.गुरुवार दि २० ऑगस्ट रोजी दु २ वाजता टिळक मार्गवरील मोठे राम मंदिर येथून ही पवित्र यात्रा प्रारंभ होऊन श्री राज राजेश्वर मंदिर येथे पोहोचणार आहे.धार्मिक उत्साह,भक्तिभाव आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम असलेल्या या यात्रेत अकोला शहरातील महिला संघटना, भजनी मंडळी,हजारो धर्मप्रेमी आणि शिवभक्त मातृशक्ती सहभागी होणार आहेत.मातृशक्तीने पारंपरिक केसरी वस्त्र परिधान करून हातात कलश किंवा लहान कांवड घेऊन यात सहभागी होऊन याचा लाभ घेण्याचे आवाहन विश्व मांगल्य सभेच्या वतीने करण्यात आले आहे.

## महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर २१ ऑगस्ट जलसंधारण दिनी राज्यभर

**अकोला :** शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात १५ ते २१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान 'जलसंधारण सप्ताह' आणि १५ ऑगस्ट, २०२६ ते २६ जानेवारी, २०२७ दरम्यान 'जलसंधारण अभियान' आयोजित करण्यात येत आहे. दि २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' या उपक्रमाचे आयोजन करुन जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरुप देण्याचे कार्य राज्य शासनाने हाती घेतले असून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या लोकचळवळीत राज्यातील सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' या उपक्रमाचे मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिली आहे. या उपक्रमाची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सीक्यूर टूमारो अशी असून 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हे घोषवाक्य आहे.

---

## सोयाबीनवरील लष्करी अळीच्या प्रादुर्भावाची कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांकडून पाहणी

### वारंगी येथे शेतकऱ्यांना एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मौजे वारंगी, ता. मालेगाव येथे सोयाबीन पिकावरील लष्करी अळी व इतर पाने खाणाऱ्या किडींच्या प्रादुर्भावाची आज कृषी विज्ञान केंद्र, वाशिमच्या शास्त्रज्ञांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी केली.

यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे, पीक संरक्षण विषय तज्ज्ञ श्री. आर. एस. डवरे तसेच कृषी अर्थशास्त्रज्ञ डॉ. डी. एन. इंगोले उपस्थित होते. कृषी विभागाच्या वतीने मंडळ कृषी अधिकारी प्राजक्ता कुचेकर व अमोल तांबे यांनी सहभाग घेतला. तसेच प्रगतिशील शेतकरी राजकुमार दहात्रे, उमेश दहात्रे, दत्तराव बर्वे, संतोष बोरचाटे, हरीश वाथे, सुमित चौधरी व संतोष दहात्रे यांची उपस्थिती



होती. शास्त्रज्ञांनी प्रगतिशील शेतकरी राजकुमार दहात्रे यांच्या सोयाबीन प्रक्षेत्रासह परिसरातील इतर शेतांची प्रत्यक्ष पाहणी करून किडींची अवस्था, प्रादुर्भावाची तीव्रता व पिकाची वाढ यांचे निरीक्षण केले. पाहणीदरम्यान उंटअळी (Semi-looper) तसेच तंबाखूची पाने खाणारी अळी (Spodoptera litura) यांचा तुरळक प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला. सद्यस्थितीत प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले. यावेळी शेतकऱ्यांना एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) अंतर्गत नियमित पीक निरीक्षण, कामगंध सापळ्यांचा (Pheromone traps) वापर, पक्षी थांबे (Bird perches) उभारणे, अंडीपुंज व लहान अळ्यांचे यांत्रिक पद्धतीने नियंत्रण, तसेच आवश्यकतेनुसार वनस्पतीजन्य कीटकनाशकांचा वापर याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच किडीची आर्थिक नुकसान पातळी (Economic Threshold Level – ETL) ओलांडल्यानंतरच सोयाबीनसाठी लेबलवर मंजूर व शिफारशीत कीटकनाशकांची योग्य मात्रा व योग्य फवारणी तंत्राने वापर करावा, असा वैज्ञानिक सल्ला शेतकऱ्यांना देण्यात आला. अनावश्यक व प्रतिबंधात्मक रासायनिक फवारण्या टाळून कीटकनाशकांच्या प्रभावी गटांची फेरपालट करणे, जैविक व वनस्पतीजन्य उपायांना प्राधान्य देणे आणि परागीभवन करणारे तसेच उपयुक्त कीटकांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## स्व. प्रकाशदादा डहाके जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

लोकनेते तथा माजी आमदार स्व. प्रकाशदादा डहाके यांच्या जयंतीनिमित्त कारंजा शहरात दि. १९ ऑगस्ट रोजी विविध सामाजिक, पर्यावरणपूरक व जनसेवाभिमुख उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. प्रकाशदादांच्या सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि सर्वसामान्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याची आठवण जागविणाऱ्या या उपक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विनीत स्व. प्रकाशदादा डहाके मित्र मंडळ, कारंजा-मनोरा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमांची सुरुवात सकाळी ६ वाजता एकदिवसीय योगशिबिराने होणार आहे. हे योगशिबिर स्व. प्रकाशदादा डहाके निसर्ग पर्यटन केंद्र, कारंजा (लाड) येथे आयोजित करण्यात आले आहे. निरोगी जीवनशैली, शारीरिक व मानसिक आरोग्य याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने



या योगशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यानंतर सकाळी ९ वाजता सभापती निवास, कारंजा (लाड) येथे प्रतिमा पूजन करण्यात येणार आहे. स्व. प्रकाशदादांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात येणार आहे.

त्यानंतर सकाळी १० वाजता स्व. प्रकाशदादा डहाके निसर्ग पर्यटन केंद्र येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत स्व. प्रकाशदादांच्या स्मृती जपण्याचा हा उपक्रम असल्याने नागरिकांनी यात सहभागी होऊन वृक्षसंवर्धनाचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सकाळी ११.३० वाजता प्रकाश सभागृह, कॅम्प ३, बाभूळ, कारंजा (लाड) येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या यशाला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. सामाजिक बांधिलकीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमांमध्ये सायंकाळी ६ वाजता अन्नसेवेचे आयोजन करण्यात आले आहे. मुकबधिर विद्यालय, वृद्धाश्रम व अंध विद्यालय येथे अन्नसेवा करण्यात येणार असून, समाजातील गरजू व वंचित घटकांप्रती संवेदनशीलता जपण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात येणार आहे. दिवसभरातील कार्यक्रमांची सांगता सायंकाळी ७.३० वाजता सभापती निवास, कारंजा (लाड) येथे भजन संध्याने होणार आहे. पं. कृष्णेंद्र वाडकर यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या भजन संध्येतून भक्तिमय वातावरणात स्व. प्रकाशदादांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे.

स्व. प्रकाशदादा डहाके यांनी आपल्या कार्यातून जनसामान्यांशी जोडलेले नाते आणि समाजसेवेची प्रेरणा कायम ठेवली. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले हे विविध उपक्रम केवळ स्मरणापुरते मर्यादित न राहता योग, पर्यावरण, शिक्षण, अन्नसेवा आणि संस्कार या माध्यमातून समाजोपयोगी कार्याची परंपरा पुढे नेणारे ठरणार आहेत.

---

## लोकनेते भाऊसाहेब देशमुख



आज माजी खासदार सन्माननीय भाऊसाहेब अनंतरावजी देशमुख यांचा वाढदिवस. १९ ऑगस्टला त्यांचा वाढदिवस साजरा होत असताना होणारा शुभेच्छांचा वर्षाव ही केवळ औपचारिकता नाही, तर त्यामागे अनेक वर्षांचे स्नेहबंध, आठवणी, सहवास आणि विश्वास आहे. त्यांच्या कार्याशी आणि विचारांशी जोडलेल्या जनतेच्या मनातील तो जिव्हाळा आणि आपुलकी आहे. आमदार, राज्यमंत्री आणि त्यानंतर दोन वेळा खासदार असा भाऊसाहेबांचा राजकीय प्रवास राहिला आहे. सार्वजनिक जीवनातील विविध जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी अनेक चढ-उतार अनुभवले. राजकारणातील समीकरणे बदलली, सत्तेची केंद्रे बदलली; मात्र या बदलांचा परिणाम जनतेशी असलेल्या त्यांच्या आत्मीय संबंधांवर झाला नाही. जुन्या अकोला जिल्ह्यापासून आजच्या वाशिम जिल्ह्यापर्यंतच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात त्यांनी जनसामान्यांचा नेता म्हणून ओळख निर्माण केली. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या असंख्य व्यक्तींच्या भावनेत कोणतीही अपेक्षा नाही,तर केवळ आपुलकी आणि आत्मीयता असते. जनतेशी जपलेले हे नातेच त्यांच्या सार्वजनिक जीवनाची सर्वात मोठी कमाई आहे.

राजकारणात मतभेद असणे स्वाभाविक आहे. मात्र मतभेदांचा परिणाम व्यक्तिगत संबंधांवर होऊ नये, ही भूमिका भाऊसाहेबांनी सातत्याने जपली. राजकीय विरोधक असला तरी व्यक्ती म्हणून त्याचा सन्मान राखणे आणि प्रसंगी सहकार्याची भूमिका घेणे, हा त्यांच्या स्वभावाचा भाग राहिला; त्यामुळे राजकीय विरोधकांच्याही मनात त्यांच्याविषयी आदराची भावना कायम राहिली.

भाऊसाहेबांच्या सार्वजनिक जीवनाकडे पाहिले तर एक बाब ठळकपणे जाणवते—त्यांनी राजकारणाला समाजकारणाचे माध्यम मानले. सत्तेत कोणताही पक्ष असो, सामान्य माणसाची कामे व्हावीत, त्यांच्या अडचणी दूर व्हाव्यात आणि जनतेला आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. कृषी, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या क्षेत्रांना त्यांनी ग्रामीण विकासाचे प्रमुख आधार मानले. शेतकरी सक्षम झाला पाहिजे, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत आणि सर्वसामान्यांना आरोग्य सुविधा मिळाल्या पाहिजेत, हा त्यांच्या कार्याचा व्यापक दृष्टिकोन राहिला. विविध पक्षांतील नेत्यांशी असलेल्या स्नेहसंबंधांचा उपयोग त्यांनी वैयक्तिक राजकीय हितासाठी नव्हे, तर परिसरातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी केला.

भाऊसाहेबांच्या कार्याचा दीर्घकालीन प्रभाव जाणवणारे प्रमुख क्षेत्र म्हणजे शिक्षण. वडिलांकडून वारशाने मिळालेल्या ङङ'दि आर्य शिक्षण संस्थेला'ङङ त्यांनी केवळ पुढे नेले नाही, तर तिचा विस्तार करून तिला वटवृक्षाचे स्वरूप दिले. ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी मिळाव्यात, हा त्यांच्या शैक्षणिक कार्याचा केंद्रबिंदू राहिला. आज या संस्थेतून शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहेत.

एखाद्या शिक्षण संस्थेची खरी उंची तिच्या इमारतीत नसते, तर त्या संस्थेतून घडलेल्या विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वात असते. या अर्थाने घडलेल्या असंख्य विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरी हेच भाऊसाहेबांच्या शैक्षणिक कार्याचे खरे फलित आहे.

ग्रामीण विकासात शेतीचे महत्त्व ओळखून भाऊसाहेबांनी कृषी क्षेत्रालाही प्राधान्य दिले. या भागातील कृषी क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन त्यांनी 'कृषी विज्ञान केंद्र' आणि 'कृषी महाविद्यालय' यांची उभारणी केली. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास उत्पादन आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते, या भूमिकेतून आधुनिक कृषितंत्रज्ञान, पीक नियोजन आणि कृषीविषयक मार्गदर्शन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून करण्यात आले.

भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचा साधेपणा. सार्वजनिक जीवनात दीर्घकाळ महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळूनही माणसांशी सहज संवाद साधण्याची त्यांची वृत्ती कायम राहिली. स्वच्छ प्रतिमा, संयमी स्वभाव, प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि सुसंस्कृत राहणीमान यामुळे त्यांनी समाजात आपले वेगळे स्थान निर्माण केले. ज्येष्ठ कार्यकर्त्यांपासून तरुण पिढीपर्यंत विविध स्तरांतील लोकांशी त्यांनी आत्मीय संबंध जपले. त्यांच्या कार्यातून अनेकांना प्रेरणा मिळाली आणि त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ पुढील पिढ्यांनाही होत आहे. माणसे जोडणे, नाती जपणे आणि समाजहिताला प्राधान्य देणे, हीच त्यांच्या सार्वजनिक जीवनाची खरी ओळख आहे.

अशा कर्तृत्ववान, संवेदनशील आणि समाजाशी घट्ट नाते जपणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! भाऊसाहेब अनंतरावजी देशमुख यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजाच्या हितासाठी अखंड कार्य करण्याची ऊर्जा लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**सौ. किरण सुनील दुबे**
मुख्याध्यापिका भारत प्राथमिक मराठी शाळा, रिसोड

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २६२ ■ बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# वर्ध्यात पिझ्झा अन् बेकरीत अस्वच्छतेचा बाजार, एफडीएचा दणका

## डोमिनोज पिझ्झा आणि जय कृष्णा बेकरीचे अन्न परवाने निलंबित

### सुधारणा नोटीसनंतरही नियम धाब्यावर, माशांचा प्रादुर्भाव, पिण्याच्या पाण्याचे प्रमाणपत्रही गायब

**वर्धा जनमाध्यम :** ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित नियमांची पायमल्ली करणाऱ्या शहरातील दोन खाद्य आस्थापनांवर अन्न व औषध प्रशासनाने कठोर कारवाई केली आहे. सुभाषचंद्र वॉर्ड येथील डोमिनोज पिझ्झा आणि औद्योगिक वसाहत परिसरातील जय कृष्णा बेकरी या दोन्ही आस्थापनांचे अन्न परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तपासणीत मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आणि अन्न सुरक्षा कायद्यातील आवश्यक तरतुदींचे पालन होत नसल्याचे समोर आले. सुधारणा करण्यासाठी नोटीस बजावूनही अपेक्षित पूर्तता न झाल्याने प्रशासनाने अखेर परवाने निलंबित केले.



मे. जुबिलंट फूड वर्क्स लिमिटेड अर्थात डोमिनोज पिझ्झा, सुभाषचंद्र वॉर्ड, वर्धा या आस्थापनेची अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी ९ जुलै २०२६ रोजी तपासणी केली. त्यानंतर एमआयडीसी भागातील जय कृष्णा बेकरीची २४ जुलै २०२६ रोजी अन्न सुरक्षा अधिकारी रविराज घावर्डे यांनी तपासणी केली.

तपासणीदरम्यान दोन्ही आस्थापनांमध्ये अन्न सुरक्षा मानकांनुसार आवश्यक असलेली स्वच्छता आढळली नाही. परिसराच्या स्वच्छतेसाठी कोणतेही नियोजनबद्ध वेळापत्रक किंवा स्वच्छता कार्यक्रम उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले. अन्न तयार करण्याच्या ठिकाणी स्वच्छतेचा अभाव असल्याने ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला.

### ■ नोटीस देऊनही सुधारणा नाही

तपासणीत आढळलेल्या त्रुटींनंतर सहायक आयुक्त अन्न प्रफुल्ल टोपले यांनी संबंधित आस्थापनांना सुधारणा करण्यासाठी १५ दिवसांची मुदत देत सुधारणा नोटीस बजावली. या मुदतीत त्रुटी दूर करून त्याबाबतचा पूर्तता अहवाल सादर करणे अपेक्षित होते. मात्र मुदत उलटूनही संबंधित आस्थापनांकडून आवश्यक सुधारणा करण्यात आल्या नाहीत. तसेच पूर्तता अहवालही प्रशासनाकडे सादर करण्यात आला नाही. यामुळे दोन्ही आस्थापनांची सुनावणी घेण्यात आली. सहायक आयुक्त अन्न प्रवीण उमप यांच्या समक्ष झालेल्या सुनावणीवेळीही समाधानकारक पूर्तता अहवाल सादर करण्यात आला नाही. अखेर अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन आणि सुधारणा करण्यास झालेल्या दुर्लक्षाची गंभीर दखल घेत दोन्ही आस्थापनांचे अन्न परवाने निलंबित करण्यात आले.

### ■ माशांचा प्रादुर्भावही उघड

तपासणीदरम्यान खाद्यपदार्थ तयार करण्याच्या परिसरात माशांचा प्रादुर्भाव आढळून आल्याची बाबही समोर आली. अन्न परिसराची स्वच्छता नियमितपणे केली जात नसल्याचे निदर्शनास आले. स्वच्छतेसाठी कोणतेही वेळापत्रक उपलब्ध नसल्याने खाद्यपदार्थांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. अन्नाच्या संपर्कात येणारे पॅकेजिंग साहित्य फूड ग्रेडचे असल्याचे प्रमाणपत्रही उपलब्ध नव्हते. संबंधित साहित्याबाबत एनएबीएल मान्यताप्राप्त प्रयोगशाळेची प्रमाणपत्रे नसल्याचे तपासणीत आढळले.

### ■ कारवाईने खाद्य व्यावसायिकांचे धाबे दणाणले

ग्राहकांना दर्जेदार आणि सुरक्षित अन्न मिळावे यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून वेळोवेळी तपासण्या केल्या जातात. मात्र मोठ्या नावाच्या खाद्य आस्थापनांमध्येही मूलभूत स्वच्छतेचे नियम पाळले जात नसल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. सुधारणा नोटीस देऊनही नियमांची पूर्तता न करणाऱ्या आस्थापनांवर अखेर परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली. एफडीएच्या या कारवाईमुळे शहरातील इतर खाद्य व्यावसायिकांमध्येही खळबळ उडाली आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या आस्थापनांविरुद्ध प्रशासनाने अशीच कठोर भूमिका कायम ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### ■ कामगारांच्या आरोग्याचीही तपासणी गरजेची

आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वैद्यकीय प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले. खाद्यपदार्थांशी थेट संपर्कात येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची नोंद आणि वैद्यकीय तपासणी महत्त्वाची असताना त्याबाबतही आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याने प्रशासनाने गंभीर दखल घेतली.

याशिवाय आस्थापनांमध्ये वापरण्यात येणारे पिण्याचे पाणी पिण्यायोग्य असल्याचे प्रमाणपत्रही उपलब्ध नसल्याचे समोर आले. त्यामुळे खाद्यपदार्थांच्या निर्मितीपासून ते ग्राहकांपर्यंत पोहोचेपर्यंतच्या प्रक्रियेत स्वच्छता आणि सुरक्षिततेचे निकष पाळले जात होते की नाही, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# प्रेमसंबंधात पतीचा अडथळा ठरला जीवघेणा, पत्नीने प्रियकराच्या मदतीने पतीचा गळा आवळला

## संतोष कैकाडे हत्या प्रकरणाचा उलगडा, मृतदेह विहिरीत फेकला, चारही आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**हिंगणघाट जनमाध्यम :** तालुक्यातील शेकापूर बाई येथे संतोष पांडुरंग कैकाडे याच्या संशयास्पद मृत्यूचे गूढ अखेर उकलले आहे. पत्नीच्या प्रेमसंबंधात पती अडथळा ठरत असल्याने प्रियकर आणि त्याच्या दोन साथीदारांच्या मदतीने संतोषचा गळा आवळून खून केल्याचा धक्कादायक प्रकार पोलिस तपासात समोर आला आहे. खून केल्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह गावालगतच्या विहिरीत फेकण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी पत्नी सपना संतोष कैकाडेसह चार जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी शुभम रमेशराव कैकाडे याचे सपना कैकाडे हिच्यासोबत प्रेमसंबंध होते. या संबंधाची माहिती अथवा त्याला विरोध पती संतोष कैकाडे याच्याकडून होण्याची शक्यता असल्याने संतोष हा त्यांच्या प्रेमसंबंधातील अडथळा ठरत होता. त्यामुळे सपना हिने शुभम याच्यासोबत संगनमत करून संतोषचा काटा काढण्याचा कट रचल्याचा आरोप आहे.

दि. १६ ऑगस्टच्या मध्यरात्रीच्या सुमारास संतोष त्याच्या राहत्या घरी असताना शुभम कैकाडे, सचिन प्रभाकर बसुणे आणि प्रशांत रमेश करपे यांच्या मदतीने त्याचा गळा आवळून खून करण्यात आल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर हा प्रकार कोणालाही कळू नये म्हणून संतोषचा मृतदेह गावाजवळील बोबडे यांच्या विहिरीत फेकण्यात आल्याचा आरोप आहे.

संतोष १६ ऑगस्टपासून बेपत्ता असल्याने त्याचा शोध सुरू होता. अखेर १८ ऑगस्ट रोजी त्याचा मृतदेह विहिरीत आढळून आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. सुरुवातीला मृत्यूचे कारण संशयास्पद वाटत असतानाच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान प्रेमसंबंध आणि त्यातून निर्माण झालेला अडथळा हा खुनामागील मुख्य कारण असल्याचे समोर आले.

या प्रकरणी देवानंद पांडुरंगजी कैकाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वडनेर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३२३ २०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३ १ आणि ३ ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील शुभम रमेशराव कैकाडे वय ३० वर्ष रा. शेकापूर बाई, सचिन प्रभाकर बसुणे वय ३० वर्ष रा. माढळी, प्रशांत रमेश करपे वय ३६ वर्ष रा. माढळी आणि सपना संतोष कैकाडे वय ३६ वर्ष रा. शेकापूर बाई या चारही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांकडून सध्या आरोपींची चौकशी सुरू असून खुनामागील नेमका कट कसा रचण्यात आला, मृतदेह विहिरीत नेऊन फेकण्यामध्ये कोणाची कोणती भूमिका होती आणि या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास केला जात आहे. पुढील तपास वडनेर पोलिस करीत आहेत.

### प्रेमाच्या नावाखाली आखला खुनाचा कट

प्रेमसंबंधातून पतीचाच जीव घेतल्याच्या या धक्कादायक प्रकारामुळे शेकापूर बाई परिसरात संताप आणि खळबळ निर्माण झाली आहे. पतीला मार्गातून हटविण्यासाठी आखलेला कट आणि त्यानंतर मृतदेह विहिरीत फेकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याने या प्रकरणाची गंभीरता आणखी वाढली आहे.

# अंबिकापूर फाट्यावरून विद्युत वाहिनीचे वायर लंपास करणारे तिघे जेरबंद

**आष्टी शहीद जनमाध्यम :** तालुक्यातील अंबिकापूर फाट्याजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या विद्युत वाहिनीचे तब्बल ७०० मीटर कंडक्टर वायर चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली होती. या प्रकरणाचा आष्टी पोलिसांनी जलदगतीने तपास करीत तीन आरोपींना जेरबंद केले. आरोपींकडून चोरीस गेलेला २९ हजार रुपये किमतीचा संपूर्ण कंडक्टर वायर जप्त करण्यात आला आहे.

किशोर इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडचे साईड इंजिनियर राहुल चरणदास गजभिये यांनी याबाबत आष्टी पोलिसांत तक्रार दिली होती. १४ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजताच्या सुमारास अंबिकापूर बस स्टॉपजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या विद्युत वाहिनीचे सुमारे ७०० मीटर कंडक्टर वायर अज्ञात चोरट्याने लंपास केल्याचे निदर्शनास आले. या तक्रारीवरून आष्टी पोलिस ठाण्यात अपराध क्रमांक २८२/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ २ आणि ३ ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांना मिळालेली गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे सचिन देवराव कांबळे वय ४८ रा. थार आष्टी. दीपक विलासराव भोजने वय २९ रा. इंदिरानगर आष्टी आणि मंगेश



यशवंतराव कुडमेथे वय ३७ रा. थार आष्टी यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर पोलिसांनी आरोपींकडून चोरीस गेलेला २९ हजार रुपये किमतीचा ७०० मीटर कंडक्टर वायर जप्त केला. त्यामुळे विद्युत वाहिनीवरील चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी पोलिस ठाण्याचे ठाणेदार सहाय्यक पोलिस निरीक्षक राजेश जोशी. पोलिस उपनिरीक्षक निलेश भिलावे. पोलिस अंमलदार सचिन सोनोने. सतीश नंदागवळी. वैभव साबळे. अमर डाकूलकर आणि पवन देशमुख यांनी केली.

# संजय दत्त 'महा वॉकेथॉन'मध्ये धावणार

**मुंबई जनमाध्यम :** माती आणि जलसंधारणाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागातर्फे २१ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत 'महा वॉकेथॉन २०२६ वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले आहे. या राज्यव्यापी उपक्रमात अभिनेता संजय दत्त सहभागी होणार असून, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिलेले निमंत्रण त्यांनी स्वीकारले आहे.

जलसंधारणाचा संदेश लोकचळवळ बनविण्याच्या उद्देशाने लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, कलाकार, खेळाडू, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांना या उपक्रमात सहभागी करून घेतले जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात कमाल तीन किलोमीटर अंतराची वॉकेथॉन होईल. त्यानंतर सहभागींकडून मृद व जलसंधारणाची शपथ घेतली जाणार असून ई प्रमाणपत्रही दिले जाणार आहे.

जिल्हास्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पहिल्या दहा विजेत्यांचा गौरव केला जाणार आहे. प्रायोजकांच्या माध्यमातून एकूण ७१ हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांकाला २५ हजार, द्वितीय क्रमांकाला १५ हजार आणि तृतीय क्रमांकाला १० हजार रुपये मिळतील. सोडतीतून सात सहभागींची निवड करून प्रत्येकी तीन हजार रुपयांचे विशेष पारितोषिक दिले जाणार आहे.

# वाघाच्या हल्ल्यात मृत शेतकऱ्यावर वनविभागाच्या बंदोबस्तात अंत्यसंस्कार

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी शहराजवळील सिंदीविहिरा गावालगत नरसिंगपूर शेतशिवारात नागपंचमीच्या दिवशी पूजा करीत असलेल्या भोयर नामक शेतकऱ्यावर वाघाने हल्ला करून ठार केल्याच्या घटनेने तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेनंतर वनविभागाने नरसिंगपूर आणि सिंदीविहिरा परिसरात गस्त वाढविली आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी आर्वी उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. मंगळवारी मृतदेह रुग्णवाहिकेतून आष्टी येथील घरी आणण्यात आला. वनविभागाच्या देखरेखीखाली अंत्यसंस्कार पार पडले. अंत्यविधीसाठी वनविभागाकडून २५ हजार रुपयांची मदत देण्यात आली. पोलिसांचा बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता.

मृत शेतकऱ्याच्या पत्नीला दोन दिवसांत दहा लाख रुपयांचा धनादेश देण्यात येणार असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी लांबडे यांनी दिली.

नरसिंगपूर परिसरात गस्ती पथक तैनात करण्यात आले असून वनाधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. दरम्यान जैतापूर शिवारातही वाघ दिसल्याची चर्चा असून तेथे स्वतंत्र पथकाकडून शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. भोयर यांच्यावर हल्ल्यापूर्वी याच परिसरात वाघाने गायीवर हल्ला करून तिला जखमी केल्याची माहिती आहे. वाघाचा तातडीने बंदोबस्त करून शेतकरी आणि नागरिकांना सुरक्षितता द्यावी अशी मागणी होत आहे.

# गुगल मॅपचा धोका; ट्रक थेट बसस्थानकात

## पोलिसांच्या सतर्कतेने संभाव्य अनर्थ टळला

**वर्धा जनमाध्यम -** गुगल मॅपवर दाखविलेल्या चुकीच्या मार्गाचा आधार घेत अवजड ट्रक थेट बसस्थानकात घुसल्याची घटना वर्ध्यात घडली. झाशी राणी चौकाकडून उत्तम गलवा कंपनीकडे जाणाऱ्या आरजे ११ जीबी ३०४८ क्रमांकाच्या ट्रकचालकाला उड्डाणपुलाआधी बसस्थानकाच्या दिशेने जाणारा मार्ग गुगल मॅपवर दाखविण्यात आला. त्यानुसार चालकाने ट्रक त्या मार्गावर वळविला.

ट्रक बसस्थानकाच्या आत जात असल्याचे बजाज चौक येथे कर्तव्यावर असलेले वाहतूक पोलीस फौजदार रियाज खान व पोलीस कर्मचारी आरिफ खान यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तातडीने ट्रक अडवून संभाव्य धोका टाळला. पोलिसांनी चालकाची विचारणा केली असता, उत्तम गलवा कंपनीकडे जाण्यासाठी गुगल मॅपने हाच रस्ता दाखविला म्हणून इकडे वळलो, असे त्याने सांगितले.

बसस्थानकात प्रवाशांची मोठी वर्दळ असताना अवजड वाहन शिरल्याने खळबळ उडाली. पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला.

# दाभोलकरांच्या स्मृतिदिनाआधीच धक्का दोषीच्या जामिनावर अंनिसचा निषेध

**वर्धा जनमाध्यम :** डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणातील दोषसिद्ध सचिन अंदुरे याला मुंबई उच्च न्यायालयाने १८ ऑगस्ट रोजी जामीन मंजूर करीत अपील प्रलंबित असेपर्यंत जन्मठेपेच्या शिक्षेला स्थगिती दिल्याने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने तीव्र संताप व्यक्त केला आहे. हा निर्णय अत्यंत वेदनादायी आणि धक्कादायक असल्याचे समितीने म्हटले आहे.

जामीन अथवा शिक्षेला स्थगिती मिळणे म्हणजे दोषसिद्धी रद्द होणे किंवा संबंधित व्यक्ती निर्दोष ठरणे नव्हे. मात्र दाभोलकर यांच्या हत्येला तेरा वर्षे पूर्ण होत असताना स्मृतिदिनाच्या अवघ्या दोन दिवस आधी हा निर्णय होणे सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी अस्वस्थ करणारे असल्याचे अंनिसने स्पष्ट केले.

विशेष न्यायालयाने उपलब्ध पुराव्यांच्या आधारे सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना दोषी ठरवून जन्मठेप सुनावली होती. या दोषसिद्धीविरुद्धचे अपील अद्याप न्यायालयीन परीक्षणाधीन आहे. दरम्यान दाभोलकर यांच्या हत्येमागील कथित व्यापक कट आणि मास्टरमाईंडपर्यंत तपास यंत्रणा पोहोचू शकलेली नाही, असा आरोप अंनिसने केला. विशेष न्यायालयाने डॉ. वीरेंद्रसिंह तावडे यांच्यासह अन्य आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली होती. त्यामुळे संपूर्ण कटाचा उलगडा आणि हत्येमागील प्रत्येक संबंधिताची कायदेशीर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक असल्याची मागणी समितीने केली.

न्यायव्यवस्थेचा पूर्ण आदर राखत आदेशाचा अभ्यास करून पुढील कायदेशीर उपाययोजना करण्यात येतील, असे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी सांगितले. हा निर्णय वेदनादायी असला तरी विवेकवाद आणि संविधानिक मूल्यांच्या लढ्यात अंनिसचा संघर्ष थांबणार नाही, असा निर्धार समितीने व्यक्त केला.

# स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा खासदार गावात पुलासाठी लढणाऱ्या सुलतानपूरकरांचा प्रशासनाला दणका

**वर्धा जनमाध्यम :** स्वातंत्र्यानंतर तब्बल इतकी वर्षे उलटूनही सुलतानपूर गावात एकाही खासदाराने पाऊल ठेवले नव्हते. अखेर खासदार अमर काळे यांच्या रूपाने गावात प्रथमच खासदार पोहोचला. मात्र ही भेट केवळ औपचारिक ठरली नाही. वर्षानुवर्षे रखडलेल्या पुल आणि रस्त्याच्या प्रश्नाचा ग्रामस्थांनी खासदारांसमोर आक्रमकपणे पाढा वाचला.



मुख्य रस्त्यापासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर असलेल्या सुलतानपूरला जोडणाऱ्या मार्गावरील नाला आणि कमी उंचीचा रपटा पावसाळ्यात ग्रामस्थांसाठी जीवघेणा ठरतो. पाणी वाढले की रपटा पाण्याखाली जातो आणि गावाचा संपर्क तुटतो. विद्यार्थ्यांना कमरेपर्यंतच्या पाण्यातून मार्ग काढावा लागतो. अनेकदा बाहेरगावी अडकून राहण्याची वेळ येते. विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न महिलांनी खासदारांसमोर मांडला. पावसाळ्यात पुलावर पाणी असताना मुली मुख्य रस्त्यावर अडकतात आणि पालकांचा त्यांच्याशी संपर्क तुटतो. एखादी अनुचित घटना घडल्यास जबाबदारी कोण घेणार असा प्रश्न महिलांनी उपस्थित केला.

या प्रश्नासाठी अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांनी केवळ १५ मिनिटांचे आंदोलन केले होते. कोणालाही त्रास न देता केलेल्या या आंदोलनानंतरही राजकीय दबावातून पोलिसांमार्फत गुन्हे दाखल करून ग्रामस्थांना त्रास दिल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. खासदारांच्या मतदारसंघ दौऱ्यात सुलतानपूरचा समावेश झाला. इतर कार्यक्रमांमुळे रात्री साडेअकरा ते बाराच्या सुमारास ते गावात पोहोचले. मात्र महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसह ग्रामस्थ मध्यरात्रीपर्यंत त्यांची वाट पाहत होते. गावात पोहोचताच खासदारांनी उशीराबद्दल दिलगिरी व्यक्त केली. पुलाची उंची वाढवून कायमस्वरूपी पूल उभारावा आणि रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी या मागणीचे निवेदन ग्रामस्थांनी दिले. मधुसूदन हरणे, महेश झोटिंग पाटील, दशरथ ठाकरे, बालु वानखेडे, गणेश वैरागडे, प्रवीण श्रीवास्तव, रविकिरण कुटे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाला गिळंकृत करणाऱ्यांवर कारवाई करा

## पंचायत समितीसमोर भास्कर घोरपडे यांचे आमरण उपोषण

### अनधिकृत बांधकामाची चौकशी करून नाला मोकळा करण्याची मागणी

**आष्टी शहीद जनमाध्यम :** थार गावातील नाल्यावरील कथित अतिक्रमणाविरोधात प्रशासनाविरुद्ध संताप व्यक्त करीत भास्कर तुळशीराम घोरपडे यांनी आष्टी पंचायत समिती कार्यालयासमोर १८ ऑगस्टपासून बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याची ठाम भूमिका त्यांनी घेतल्याने प्रशासनाची कोंडी झाली आहे.

थार ग्रामपंचायत हद्दीतील नाल्यावर पंचफुला घोरपडे यांनी कथितरीत्या अनधिकृत बांधकाम करून अतिक्रमण केल्याचा आरोप भास्कर घोरपडे यांनी केला आहे. या बांधकामाची तातडीने चौकशी करून नाला अतिक्रमणमुक्त करावा, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या कारभाराचीही चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई तसेच बदली करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



सन २००० पासून अस्तित्वात असलेल्या झोपडीची ८ अ नोंद करून इमला कराची पावती देण्यात यावी. झोपडीपासून तीन फूट जागा सोडून पूरसंरक्षण भिंत बांधावी. तसेच थार येथील अरुण घोडीले यांनी पाडलेल्या बुद्धविहाराचे प्रवेशद्वार तातडीने बांधून द्यावे, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत.

आष्टी तालुका अन्याय निवारण समितीने आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे. प्रशासनाने मागण्यांची दखल न घेतल्यास वेळप्रसंगी समितीच्या वतीनेही आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला.

गटविकास अधिकारी पोकळे यांच्यासोबत उपोषणकर्त्यांची चर्चा झाली. मात्र समाधानकारक उत्तरे मिळाली नसल्याने उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी समितीचे अध्यक्ष प्रा. बी. टी. उरकुडे, मोहन गायकवाड, मनोहर घोरपडे, अरविंद लक्ष्मण घोरपडे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

आता प्रशासन नाला अतिक्रमणमुक्त करण्यासाठी ठोस पाऊल उचलते की उपोषणकर्त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करते, याकडे थार ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारमध्ये महाराष्ट्राचा गौरव

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**केंद्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाने जाहीर केलेल्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२५ मध्ये महाराष्ट्राने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर विदित संतोष गुजराती आणि ग्रँडमास्टर दिव्या जितेंद्र देशमुख यांना अर्जुन पुरस्कार, नेमबाजी प्रशिक्षक नेहा नंदकुमार चव्हाण यांना द्रोणाचार्य पुरस्कार, तर पुणे येथील आर्मी पॅरालिम्पिक नोड संस्थेला राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्कार जाहीर झाला आहे.सर्वोच्च न्यायालयाचे माजी निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती अरुण कुमार मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीच्या शिफारशींनुसार विविध श्रेणींमध्ये हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील खेळाडू, प्रशिक्षक आणि संस्थेने केलेल्या उल्लेखनीय योगदानाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे.

**बुद्धिबळ क्षेत्रात महाराष्ट्राचा गौरव**

क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी दिल्या जाणा-या अर्जुन पुरस्कार २०२५ साठी महाराष्ट्रातील दोन बुद्धिबळपटूंची निवड झाली आहे. ग्रँडमास्टर विदित संतोष गुजराती आणि ग्रँडमास्टर दिव्या जितेंद्र देशमुख यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे.



**नेहा चव्हाण यांना द्रोणाचार्य पुरस्कार**

उत्कृष्ट प्रशिक्षकांसाठीचा द्रोणाचार्य पुरस्कार २०२५ महाराष्ट्रातील नेमबाजी प्रशिक्षक नेहा नंदकुमार चव्हाण यांना जाहीर झाला आहे. खेळाडूंना सातत्यपूर्ण मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन देत त्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरीसाठी घडविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

**आर्मी पॅरालिम्पिक नोड, पुणे यांचा राष्ट्रीय सन्मान**

क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी उल्लेखनीय योगदान देणा-या संस्था आणि संघटनांना प्रदान करण्यात येणा-या राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्कार २०२५ साठी आर्मी पॅरालिम्पिक नोड, पुणे यांची निवड झाली आहे. पॅरालिम्पिक खेळाडूंना प्रशिक्षण, आवश्यक सुविधा आणि प्रोत्साहन उपलब्ध करून देत त्यांच्या क्रीडा कारकिर्दीला चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या संस्थेकडून केले जाते.

**देशातील इतर पुरस्कारार्थी**

राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२५ अंतर्गत महाराष्ट्रातील पुरस्कारार्थींसोबत देशातील विविध क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणा-या खेळाडू आणि प्रशिक्षकांचाही गौरव करण्यात आला आहे.

**अर्जुन पुरस्कार**

तेजस्विन शंकर (अथलेटिक्स) मुहम्मद अजमल व्ही. (अथलेटिक्स), प्रियंका गोस्वामी (अथलेटिक्स),त्रिशा जाली( बॅडमिंटन), पुल्लेला गायत्री गोपीचंद - बॅडमिंटन, नरेंद्र - बॉक्सिंग, धनुष श्रीकांत (कर्णबधिरांसाठी नेमबाजी), लालरेमसियामी (हॉकी),राजकुमार पाल (हॉकी), सुरजीत (कबड्डी), पूजा (कबड्डी),रु द्रांश खंडेलवाल (पॅरा-नेमबाजी), एकता भ्यान - (पॅरा-अथलेटिक्स), अरविंद सिंह (नौकानयन), अखिल श्योरान (नेमबाजी)

अर्जुन पुरस्कार (जीवनगौरव)
आय. अरु मइनायागम (फुटबाल)

द्रोणाचार्य पुरस्कार - नियमित श्रेणी
परवीर सिंह (एथलेटिक्स)
छोटे लाल यादव (बाक्सिंग)

द्रोणाचार्य पुरस्कार - जीवनगौरव श्रेणी
धर्मेंद्र सिंह यादव(बाक्सिंग)
वीरेंदर कुमार (कुस्ती)

## क्रीडा मंत्रालयाने राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२५ जाहीर केले

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** केंद्र सरकारच्या क्रीडा मंत्रालयाने राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२५ जाहीर केले आहेत. यंदा देशातील १७ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मात्र, भारतातील क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च सन्मान मानल्या जाणा-या मेजर ध्यानचंद खेळरत्न पुरस्कारासाठी यंदा एकाही खेळाडूची निवड झालेली नाही.

निवृत्त सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरुण कुमार मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीच्या शिफारशींनुसार या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. यंदाच्या अर्जुन पुरस्कार विजेत्यांमध्ये अनेक वेगवेगळ्या खेळांतील खेळाडूंचा समावेश आहे. यात तेजस्विन शंकर, धावपटू मुहम्मद अजमल व्ही आणि प्रियंका गोस्वामी, बॅडमिंटनपटू ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद, बुद्धिबळ खेळाडू विदित गुजराथी आणि दिव्या देशमुख यांचा समावेश आहे.

तसेच हॉकीपटू लालरेमसियामी आणि राजकुमार पाल, नेमबाज अखिल श्योराण, पॅरा नेमबाज रु द्रांश खंडेलवाल, पॅरा अॅथलीट एकता भ्यान, रोइंगपटू अरविंद सिंह, बाक्सर नरेंद्र, कबड्डीपटू सुरजीत आणि पूजा, तसेच नेमबाज धनुष श्रीकांत यांनाही अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. माजी भारतीय फुटबालपटू आय. अरु मैनायगम यांना अर्जुन पुरस्काराच्या जीवनगौरव श्रेणीत सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी १९६२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला सुवर्णपदक मिळवून देणा-या संघात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी तीन वेळा ड्युरंड कपही जिंकला आहे.

**पुण्यातील आर्मी पॅरालाम्पिक नोडचा सन्मान**

क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी दिला जाणारा राष्ट्रीय खेळ प्रोत्साहन पुरस्कार यंदा पुण्यातील आर्मी पॅरालाम्पिक नोड यांना जाहीर करण्यात आला आहे. एकूणच, २०२५ च्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांमध्ये विविध खेळांतील १७ खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. मात्र, देशातील सर्वोच्च क्रीडा सन्मान असलेल्या खेळरत्न पुरस्कारासाठी एकही नाव जाहीर न झाल्याने यंदाचा पुरस्कार सोहळा विशेष चर्चेत आला आहे.

## खेलरत्न पुरस्कारासाठी एकही खेळाडू नाही

यंदा सर्वात मोठी बाब म्हणजे मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारासाठी एकाही खेळाडूची निवड करण्यात आलेली नाही. हा भारतातील क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार मानला जातो.गेल्या वर्षी मात्र चार खेळाडूंना खेलरत्न पुरस्कार देण्यात आला होता. त्यामध्ये बुद्धिबळ विश्वविजेता डी. गुकेश, भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंह, पॅरा अॅथलीट प्रवीण कुमार आणि ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर यांचा समावेश होता.द्रोणाचार्य पुरस्काराच्या श्रेणीत अॅथलेटिक्स प्रशिक्षक परवीर सिंह, बाक्सिंग प्रशिक्षक छोटेलाल यादव आणि नेमबाजी प्रशिक्षक नेहा नंदकुमार चव्हाण यांची निवड झाली आहे.

## आमदारांच्या पीए, वाहन चालकांच्या मानधनात 10 हजाराची वाढ

**मुंबई / प्रतिनिधी-**विधानसभा आणि विधान परिषदेच्या विद्यमान आमदारांचे स्वीय सहाय्यक (पीए) आणि वाहनचालकांच्या मानधनात प्रत्येकी १० हजार रु पयांची वाढ करण्यात आली आहे. निर्णय घेतला आहे. मानधनातील ही वाढ १ ऑगस्ट २०२६ पासून लागू करण्यात आल्याची माहिती माहिती संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी दिली. राज्य सरकारच्या निर्णयानुसार आमदारांच्या पीएंचे मासिक मानधन ३० हजार रु पयांवरू न ४० हजार रु पये, तर वाहनचालकांचे मासिक मानधन २० हजार रु पयांवरू न ३० हजार रु पये झाले आहे.



जवळपास चार वर्षानंतर ही मानधन वाढ करण्यात आली आहे. संसदीय कार्य विभागाने आज मानधन वाढीबाबतचा शासन निर्णय जारी केला. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन आणि भत्ते अधिनियम, १९५६ मधील तरतुदींनुसार विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांना त्यांचे विधिमंडळाचे प्रशासकीय कामकाज अधिक परिणामकारकपणे पार पाडण्यासाठी पीएची सुविधा उपलब्ध करू न देण्यात येते. विधानमंडळ सदस्यांच्या वेतन आणि भत्ते संयुक्त समितीच्या शिफारशीनुसार पीएच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन होता. त्यानुसार स्वीय सहाय्यक आणि वाहनचालकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री निधीतून अवयव प्रत्यारोपणासाठी 798 रुग्णांना 15 कोटी 79 लाखांची मदत

**मुंबई /प्रतिनिधी-** यकृत, मूत्रपिंड, फुप्फुस आणि हृदय यांसारखे महत्त्वाचे अवयव निकामी झाल्यानंतर अनेक रु ग्णांसाठी अवयव प्रत्यारोपण हाच उपचाराचा शेवटचा पर्याय ठरतो. मात्र, या शस्त्रक्रियांसाठी येणारा लाखो रु पयांचा खर्च आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी मोठे आव्हान ठरतो. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी गरजू रु ग्णांसाठी आधारवड ठरत असून १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियांसाठी ७९८ रु ग्णांना १५ कोटी ७९ लाख ६६ हजार रु पयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

वैद्यकीय तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे किडनी, यकृत, हृदय आणि फुप्फुस प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया अधिक यशस्वी होत आहेत. त्यामुळे अवयव निकामी झालेल्या अनेक रु ग्णांना नवजीवनाची आशा निर्माण झाली आहे. मात्र, खासगी रु ग्णालयांमध्ये या शस्त्रक्रियांसाठी मोठा खर्च येत असल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल रु ग्णांसमोर उपचारांचा



प्रश्न निर्माण होतो. अशा वेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून मिळणारी आर्थिक मदत रु ग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठा दिलासा ठरत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीची कार्यपद्धती अधिक गतिमान आणि रु ग्णकेंद्रित करण्यात आली आहे. वैद्यकीय मदतीसाठी रु ग्णांना मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासू नये, यासाठी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्याचबरोबर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि धर्मादाय रु ग्णालय मदत कक्षाची अद्ययावत ऑनलाइन प्रणालीही कार्यान्वित करण्यात आली आहे. आर्थिक मदतीबरोबरच अर्ज प्रक्रिया सुलभ करणे, उपचारासाठी लागणारा वेळ कमी करणे आणि गरजू रु ग्णांना तातडीने मदत उपलब्ध करू न देणे, यावरही मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून भर दिला जात आहे.

**अशी दिली मदत**

- १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत अवयव प्रत्यारोपणासाठी देण्यात आलेल्या मदतीमध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ६१७ रु ग्णांना १२ कोटी २३ लाख ६६ हजार रु पये देण्यात आले.
- यकृत प्रत्यारोपणासाठी १६२ रुग्णांना ३ कोटी २१ लाख ५० हजार रु पये मंजूर करण्यात आले.
- फुप्फुस प्रत्यारोपणासाठी ३ रु ग्णांना ६ लाख रु पये देण्यात आले.
- हृदय प्रत्यारोपणासाठी १६ रु ग्णांना २८ लाख ५० हजार रु पयांची आर्थिक मदत देण्यात आली.

## वाशिम 'एमआयडीसी'साठी 44.85 कोटी मंजूर

**मुंबई/प्रतिनिधी :** वाशिम जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी वाशिम एमआयडीसीतील मुख्य व अंतर्गत रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी १८ कोटी रु पये, पाणीपुरवठा योजनेसाठी १६ कोटी रु पये आणि पायाभूत सुविधेकरिता १०.८५ कोटी रूपये मंजूर करण्यात येतील, अशी माहिती उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिली. तसेच वाशिम येथील एमआयडीसीतील वारंवार होणा-या वीज खंडित होण्याच्या समस्येवर कायमस्वरू पी तोडगा काढण्यासाठी ३ कोटी ८२ लाख रु पयांचा निधी जिल्हा नियोजन निधीतून देण्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी मान्य केले.उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत आणि वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत मंत्रालय येथे वाशिम जिल्ह्यातील औद्योगिक विकासाबाबत बैठक झाली. बैठकीस राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार भावना गवळी, आमदार श्याम खोडे, खासदार संजय देशमुख, वाशिम जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, एमआयडीसीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी अजित कुंभार तसेच वाशिम जिल्ह्यातील उद्योजक उपस्थित होते.वाशिम विकास केंद्रातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण खराब झाले असून त्यासाठी १८ कोटी रुपयांचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे उद्योगमंत्री डॉ.सामंत यांनी तत्काळ मान्यता दिली. तसेच आकांक्षित जिल्हा म्हणून




वाशिमला प्राधान्य देत हा निधी मंजूर करण्याची कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश डॉ.सामंत यांनी दिले.एमआयडीसीतील सध्याचा पाणीपुरवठा विहिरीवर अवलंबून असून उन्हाळ्यात विहीर आटल्यामुळे उद्योगांना पाण्याची अडचण निर्माण होते. त्यामुळे पंचाळा धरणातून पाणी आणण्यासाठी १६ कोटी रुपयांच्या या योजनेला उद्योगमंत्र्यांनी मान्यता देत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.एमआयडीसीमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याची असल्याने वाशिम येथे ३३ केव्ही वीजवाहिनी उभारण्यासाठी ३ कोटी ८२ लाख रुपयांचा प्रस्ताव आहे. उद्योगांसाठी वीजपुरवठा सुरळीत होणे अत्यावश्यक असल्याचे नमूद करत हा निधी डीपीडीसीतून देण्याची जबाबदारी पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्वीकारली.एमआयडीसीतील भूखंडांचे जलदगतीने वाटपाची प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे निर्देश डॉ. सामंत यांनी दिले. वाशिम एमआयडीसीमध्ये कायमस्वरू पी प्रशासकीय यंत्रणा उपलब्ध करू न देणे तसेच उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रादेशिक अधिकारी (आरओ) यांनी आठवड्यातील एक दिवस वाशिममध्ये उपलब्ध राहावे, असे निर्देश डॉ. सामंत यांनी दिले. इसापूर धरणातून वाशिमसाठी प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेत एमआयडीसीसाठी स्वतंत्र पाणी आरक्षणाचा विचार करावा.असे सांगून मंत्री अड.सामंत यांनी जलसंपदा विभागाच्या पाणी वाटप समितीकडे एमआयडीसीसाठी पाणी आरक्षणाचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. एमआयडीसीच्या पाणीपुरवठ्यासाठी स्वतंत्र व्यवस्था व स्वतंत्र पाईपलाईन आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

## सिंदखेडराजा मधील राजमाता जिजाउ यांच्या स्मारकाला 50 कोटी देण्याचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथील राजमाता जिजाउ यांच्या स्मारकासाठी नगरविकास विभागाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून ५० कोटी देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. जिजाउंच्या स्मारकाचा कामाला गती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. सिंदखेडराजामधील या स्मारक आणि जिजाउसृष्टीच्या कामासाठी २०२४ साली ५० कोटी जाहीर करण्यात आले होते. या निधीमधून सिंदखेडराजा जवळील जिजाउसृष्टीचे काम सुरू करण्यात आले होते. आजवर या कामांसाठी २७ कोटींचा निधी खर्च झाला असून हे काम सध्या प्रगतीपथावर आहे. मात्र शहरातील लखुजी जाधव यांच्या ऐतिहासिक वाड्यातील प्रत्यक्ष स्मारकाच्या कामालाही सुरुवात करता यावी यासाठी अजून ५० कोटी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



**स्मारकाच्या कामाला गती देण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश**

या निधीतून जिजाउ मॉंसाहेबांच्या स्मारक तसेच या परिसरातील रस्ते आणि आजूबाजूच्या इतर सोयी सुविधांचा विकास केला जाईल. स्थानिक नगरपालिकेकडून प्रस्ताव मागवून पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून या कामाला गती देण्यात येणार असून, लवकरात लवकर या स्मारकाचे काम पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. यावेळी मंत्री प्रकाश आबिटकर, आमदार रोहित पवार, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार सुनील भुसारा, माजी आमदार शशिकांत खेडेकर हेदेखील यावेळी उपस्थित होते.

## पोषण आहार, गणवेश व शालेय सुविधांमध्ये तडजोड नाही



### शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

### दर्जा, स्वच्छता आणि विद्यार्थी हिताला सर्वोच्च प्राधान्य

**मुंबई-** शाळांमधील पोषण आहाराचा दर्जा आणि स्वच्छता याबाबत सर्व संबंधितांनी गांभीर्यपूर्वक काम करावे. शाळांमध्ये प्रत्यक्षात दर्जेदार सुविधा उपलब्ध आहेत की नाहीत, याची शिक्षणाधिका-यांनी काटेकोर तपासणी करावी, असे सांगून प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, मोफत गणवेश योजना तसेच शाळांमधील भौतिक सुविधांच्या अंमलबजावणीत तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले. गुणवत्तापूर्ण शिक्षणाला शालेय शिक्षणाचे प्राधान्य असल्याचे सांगून पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, शाळांच्या इमारतींची दुरुस्ती, ई-सुविधा, प्रयोगशाळा, क्रीडांगणे याकडे विशेष लक्ष देण्याची सूचना त्यांनी केली.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, मोफत गणवेश योजना आणि शाळांमधील भौतिक सुविधांबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात आयोजित राज्य पातळीवरील शिक्षणाधिका-यांच्या ऑनलाईन आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, शालेय शिक्षण आयुक्त सच्चिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, एससीईआरटीचे संचालक ड?. हेमंत वसेकर, शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी, उपसचिव तुषार महाजन यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.मंत्री दादाजी भुसे यांनी, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे अन्नधान्य गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक असून अन्न साठवणुकीची जागा, स्वयंपाकाची जागा आणि विद्यार्थ्यांच्या भोजनस्थळाची स्वच्छता ही अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे सांगितले. शाळेत दर्जा, प्रमाण आणि स्वच्छतेच्या बाबींची काटेकोर अंमलबजावणी न झाल्यास मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि संबंधित अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या गणवेशाचा दर्जा उत्कृष्ट असल्याबाबत तपासणी करु न तातडीने अहवाल सादर करण्यात यावा.



निकृष्ट दर्जाच्या गणवेशांसंदर्भात पुरवठादारांवर कठोर कारवाई करण्याबरोबरच मुख्याध्यापक, व्यवस्थापन समिती आणि शिक्षणाधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी, असे त्यांनी सांगितले. शाळांमधून विद्यार्थिनींसाठी स्वच्छतागृहे तातडीने उपलब्ध करण्याचे निर्देश देउन स्वच्छतागृहे वापरण्यायोग्य, स्वच्छ आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुलभ असावीत, यावर त्यांनी भर दिला. शासन आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत असले तरी त्यांची देखभाल स्थानिक स्तरावर प्रभावीपणे होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.शाळांच्या भौतिक सुविधांच्या कामांसाठी जिल्हा नियोजन समिती, रोजगार हमी योजना, गौण खनिज निधी, लोकप्रतिनिधींचा विकास निधी तसेच लोकसहभागाच्या माध्यमातून प्रयत्न करण्याची सूचना मंत्री भुसे यांनी केली.




## गडचिरोली जिल्हा क्रीडा संकुलाच्या 80 कोटीच्या अंदाजपत्रास मान्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** गडचिरोली येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे विविध क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी ८० कोटी १२ लाख रु पयांच्या अंदाजपत्रकास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यामुळे गडचिरोलीतील क्रीडा सुविधा बळकट होतील. गडचिरोली क्रीडा संकुलास यापूर्वी ४४ कोटी ५० लाख लाख रु पयांच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. क्रीडा संकुलास २३ कोटी रु पयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. मात्र क्रीडा संकुलाच्या दुस-या टप्प्यात ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅक, फूटबाल मैदान, मुला-मुलींकरिता वसतिगृह, प्रेक्षक गॅलरी, जलतरण तलाव, टेनिस कोर्ट, व्हालीबाल मैदान, कबड्डी मैदान, पार्किंग एरिया विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी तयार करण्यात आलेल्या ८०.१२ कोटी रु पयांच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.

## धान व तांदूळ वाहतूक खर्चासाठी 328.47 कोटी रुपयांचा निधी

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत पणन हंगाम २०२४-२५ मधील धान, ग्राहकोपयोगी तांदूळ तसेच ग्राहकोपयोगी तांदूळ वाहतुकीच्या खर्चासाठी ३२८ कोटी ४७ लाख रु पयांचा निधी वितरित करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.यामुळे किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व तांदळाच्या वाहतुकीसाठी झालेला खर्च भागविणे शक्य होणार आहे. एकूण ३२८ कोटी ४७ लाख रु पयांच्या वाहतूक खर्चापैकी केंद्र शासनाकडून अंदाजे ८० कोटी रु पये मिळणार आहेत. त्यामुळे राज्य शासनावर पडणा-या अंदाजे २४८ कोटी ४७ लाख रु पयांच्या अतिरिक्त खर्चासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या निर्णयामुळे किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व तांदूळ खरेदी प्रक्रियेशी संबंधित वाहतूक खर्चाची पूर्तता करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध होणार आहे.

## वित्त, नियोजन विभागांची पुनर्रचना करण्यास मान्यता

वित्त व नियोजन विभागांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी या विभागांची पुनर्रचना करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यानुसार नियोजन विभागाकडील अर्थसंकल्पीय विषय आणि पदे वित्त विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. १ सप्टेंबर १९७२ पासून नियोजन विभाग स्वतंत्र विभाग आहे. नियोजन आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्य आणि जिल्हा पातळीवर वार्षिक कार्यक्रम आखणे या विभागाचे प्रमुख कार्य होते. मात्र नियोजन आयोगाऐवजी नीति आयोगाची स्थापना झाल्यामुळे नियोजन विभागाचे स्वरू प बदलले. त्यानुसार शासन कार्यनियमावलीतील नियोजन विभागाकडील अर्थसंकल्पीय विषय वित्त विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले. यामध्ये वार्षिक कार्यक्रमाची आखणी करणे, कार्यक्रम प्रकाशनांचे मुद्रण, केंद्र पुरस्कृत योजनांचा समन्वय, वैधानिक विकास मंडळे, निधी विवरणपत्र, वित्त आणि बँकिंगशी निगडीत विषय, निधी वितरण, पुनर्विनियोजन, पुरवणी मागणी आदी विषयांचा समावेश आहे. या कामांशी निगडीत नियोजन विभागाकडील २८ पदे वित्त विभागाकडे हस्तांतरित करण्यासही मान्यता देण्यात आली. पुनर्रचनेनंतर नियोजन विभाग सर्व प्रशासकीय विभागांची धोरणे, कार्यक्रम व योजना यांची उपलब्धी व फलनिष्पत्ती यांसह साध्य झालेली प्रत्यक्ष लक्ष्ये यांचे नियतकालाने संनियंत्रण करणे आणि आढावा घेणे जिल्हा नियोजन समित्यांकडून आलेल्या जिल्हा वार्षिक योजनेच्या अग्रक्रमांस अंतिमरु प देणे अशी कार्ये पार पाडील.

## पुण्यात होणार युसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप-2032

### स्पर्धा आयोजनाला शासनाचे पाठबळ

पुणे ग्रँड टूर -२०२६ स्पर्धेच्या यशस्वी आयोजनानंतर आता युसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप - २०३२ चे यजमानपद पुण्याला मिळणार आहे. या स्पर्धा संयोजनासाठी शासनाकडून समर्थनपत्र, आर्थिक हमी, पायाभूत सुविधा व कार्यान्वयनविषयक विविध बाबींना धोरणात्मक मान्यता देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. युसीआय वर्ल्ड चॅम्पिनयशिप, २०३२ च्या निमित्ताने आशियातील पहिले यजमान पद भारताकडे येणार आहे. स्पर्धेच्या माध्यमातून सुमारे ३३० कोटी रु पयांची आर्थिक उलाढाल होणे अपेक्षित आहे. पुणे जिल्हा प्रशासन, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुणे ग्रँड टूर - २०२६ यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली होती. या भारतातील पहिल्या युनियन सायक्लिस्ट इंटरनॅशनल (युसीआय) स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामुळे महाराष्ट्राच्या क्रीडा लौकिकात आणखीच भर पडली. स्पर्धेतील उत्कृष्ट नियोजन, आंतरराष्ट्रीय दर्जाची अंमलबजावणी, सुरक्षा व्यवस्थापन व तांत्रिक क्षमतेची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली असून, या स्पर्धेचा दर्जा युसीआय २.२ वरू न युसीआय २.१ असा उन्नत करण्यात आला आहे. या यशस्वी आयोजनामुळे पुणे जिल्हा, महाराष्ट्र व भारताची आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रातील विश्वासार्हता व क्षमता सिद्ध झाली आहे. या पार्श्वभूमीवर पुण्याला सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (सीएफआय) व पुणे ग्रँड टूर आयोजन समितीला युसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप, २०३२ ची संधी मिळणार आहे. या स्पर्धेमुळे किमान शंभर देशातील २५ ते ३० कोटी क्रीडा रसिकांपर्यंत महाराष्ट्राची क्रीडा संस्कृती पोहचणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून पुणे जिल्ह्याला दख्खनचे प्रवेशद्वार (गेट वे टू डेक्कन) या संकल्पनेतून जागतिक सायकलिंगच्या नकाशावर स्थान मिळणार आहे.

## जायकवाडी प्रकल्प टप्पा -2 साठी 6 हजार 477 कोटीची तरतूद

जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ च्या कामासाठी ६ हजार ४७७ कोटी ८८ लाख रू पयांची तरतूद करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे गोदावरी खोऱ्यातील सिंदफणा नदीवरील माजलगाव धरणाच्या कामास गती मिळणार आहे. या प्रकल्पामुळे छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, बीड, परभणी व नांदेड या पाच जिल्ह्यातील सुमारे १ लाख ३१ हजार ६५२ हेक्टरला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ ही पाचवी सुधारित प्रशासकीय मान्यता आहे. यामुळे ४५४ द.ल.घ.मी. साठवण क्षमतेचे माजलगांव धरण अस्तित्वात येणार आहे. यावर माजलगांव (लोणी सावंगी) उपसा योजना, साळींबा ठिबक उपसा योजना, शिरस मार्ग निम्नपात्री बंधारा, रोशनपुरी उच्चपातळी बंधारा व १४८ किलोमीटर लांबीचा माजलगांव उजवा कालवा व त्यावरील ६ मार्गस्थ जलाशय (गल्हाटी, धोंड, उकडगांव, मुरंबी, पेंडू, सुभाषनगर) तसेच माजलगांव मासोळी प्रकल्पाची उंची वाढविण्याचे काम समाविष्ट आहे. जायकवाडी प्रकल्पाच्या कामाचे दोन टप्प्यांमध्ये नियोजन करण्यात आलेले असून पहिल्या टप्प्यातील जायकवाडी धरण, जायकवाडी प्रकल्पाचा २०८ कि.मी. लांबीचा पैठण डावा कालवा, त्यावरील शाखा कालवे, वितरिका, उप व लघु वितरिका या घटकांचे काम पूर्ण झालेले असून टप्पा दोन हा मराठवाड्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या टप्पा-२ ला ६ हजार ४७७.८८ कोटी रु पयांची पाचवी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याअंतर्गत पैठण उजवा कालवा, माजलगाव धरण आणि माजलगाव उजवा कालव्याशी संबंधित कामे होणार आहेत.



## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# पुढचे पाऊल

वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'नीट' परीक्षेतील गैरप्रकार आणि प्रश्नपत्रिका फुटल्याचे प्रकार समोर आल्यानंतर परीक्षा घेणाऱ्या 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' (एनटीए) या केंद्रीय संस्थेची कार्यपद्धती आणि तिची विश्वासार्हता पूर्णपणे कोलमडली असल्याचे स्पष्ट झाले. देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य, त्यांनी रात्रंदिवस केलेले कष्ट आणि त्यांच्या पालकांची स्वप्ने या एका परीक्षेवर अवलंबून असतात. अशावेळी सर्वोच्च पातळीवर होणारा हा हलगर्जीपणा केवळ प्रशासकीय अपयश नसून, देशाच्या शैक्षणिक आणि सामाजिक नैतिकतेवर झालेला मोठा प्रहार आहे. त्यामुळेच 'एनटीए'च्या कामकाजात केवळ वरवरच्या सुधारणा करून चालणार नाही, तर या संपूर्ण यंत्रणेची मुळापासून पुनर्रचना करणे आता अनिवार्य झाले आहे. गेल्या काही दिवसांमध्ये प्रशासनाने 'एनटीए' मध्ये तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत असलेल्या अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हटवले आहे तसेच संस्थेचा प्रशासकीय पाया भक्कम करण्यासाठी महाव्यवस्थापक आणि त्या समकक्ष पदांवर कायमस्वरूपी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हे पाऊल योग्य दिशेने पडले असले, तरी पुरेसे नाही. तात्पुरत्या कर्मचाऱ्यांना बदलून नवीन अधिकारी आणल्याने मूळ प्रवृत्ती आणि सिस्टिममधील त्रुटी लगेच दूर होत नाहीत. परीक्षा सुधारणांसाठी नंदन नीलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या 'टास्क फोर्स'शी या सर्व प्रशासकीय पावलांबाबत सखोल विचारविनिमय केला गेला पाहिजे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर सरकारने 'पेपर लीक' विरोधी कायद्यात सुधारणा करून तो अधिक कडक आणि कठोर केला. परीक्षेची गुप्तता भंग करणाऱ्या, प्रश्नपत्रिका लीक करणाऱ्या आणि शैक्षणिक क्षेत्रात दरोडा घालणाऱ्या गुन्हेगारी तत्त्वांवर अंकुश ठेवण्यासाठी कडक कायदे असणे आवश्यक आहे. देशात आज दुर्दैवाने भक्कम 'पेपर लीक माफिया' तयार झाले आहेत. जे विद्यार्थ्यांच्या लाचारीचा आणि प्रशासकीय ढिसाळपणाचा गैरफायदा घेतात. या माफियांचे जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी कायदे कठोर असायलाच हवेत; परंतु केवळ शिक्षेची तरतूद वाढवल्याने गुन्हे थांबत नाहीत. कायद्यातील कडकपणासोबतच प्रश्नपत्रिका लीक होण्याची शक्यताच शून्य होईल, अशी भक्कम व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. उपचारापेक्षा प्रतिबंध महत्वाचा या तत्त्वावर काम करावे लागेल. यासाठी 'एनटीए' आणि अशा सर्व परीक्षा घेणाऱ्या संस्थांच्या मूळ कार्यपद्धतीतच आमूलाग्र आणि क्रांतिकारी बदल घडवून आणावे लागतील. आज परिस्थिती इतकी बिकट झाली आहे, की केवळ राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षाच नव्हे, तर राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा आणि शालेय मंडळांच्या परीक्षांमध्येही प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. परीक्षा केंद्रांवर हायटेक उपकरणांचा वापर करून कॉपी करणे, डमी उमेदवार बसवणे आणि थेट मुद्रणालयातून किंवा वाहतुकीदरम्यान प्रश्नपत्रिका लीक करणे या गोष्टी आता नित्याच्या झाल्या आहेत. ही साखळी तोडण्यासाठी परीक्षा आयोजित करणाऱ्या सर्व संस्थांनी आधुनिक आणि सुरक्षित तंत्रज्ञानाचा वापर तातडीने सुरू केला पाहिजे.यापुढील काळात जुन्या चुकांमधून धडा घेत प्रश्नपत्रिकांचे सुरक्षित 'एनक्रिप्शन', प्रश्नपत्रिका डिजिटल पद्धतीने शेवटच्या क्षणी केंद्रांवर पोहोचवणे, बायोमेट्रिक पडताळणी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित देखरेख यंत्रणा उभारणे यावर भर दिला गेला पाहिजे. एकाच परीक्षेसाठी प्रश्नपत्रिकांचे अनेक संच तयार ठेवले पाहिजेत, जेणेकरून कोणत्याही क्षणी एक संच लीक झाल्यास दुसरा संच वापरून परीक्षा विनाअडथळा पार पाडता येईल. 'नीट' सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये दर वर्षी पंधरा ते वीस लाख विद्यार्थी सहभागी होतात. संपूर्ण वर्षाची मेहनत एकाच दिवसातील तीन तासांच्या परीक्षेवर अवलंबून असते. त्यामुळे विद्यार्थ्यांवर अथांग मानसिक आणि सामाजिक दबाव येतो. परीक्षापद्धतीत पारदर्शकता आणण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचा ताण कमी करण्यासाठी नीट परीक्षा वर्षातून किमान दोनदा आयोजित करण्याच्या पर्यायावर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. ज्याप्रमाणे अभियांत्रिकी प्रवेशासाठी 'जेईई मेन' परीक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते. त्यात विद्यार्थ्यांचा सर्वोत्तम गुण गृहीत धरला जातो, तीच पद्धत वैद्यकीय प्रवेशासाठीही लागू केली जाऊ शकते. त्यामुळे एका परीक्षेच्या दिवशी काही तांत्रिक किंवा वैयक्तिक अडचण आल्यास विद्यार्थ्याचे पूर्ण वर्ष वाया जाणार नाही. परीक्षा प्रणालीवरील दबाव कमी होईल आणि सुरक्षा यंत्रणा अधिक चांगल्या प्रकारे नियोजन करू शकतील. एकाच वेळी खूप मोठ्या प्रमाणावर भौतिक प्रश्नपत्रिका छापणे आणि त्यांचे वाटप करणे यातील धोके कमी होतील. 'एनटीए'ची कार्यपद्धती सुधारणे म्हणजे केवळ काही संगणक बदलणे किंवा काही कर्मचाऱ्यांना हटवणे नाही, तर संस्थेच्या कार्यसंस्कृतीत पारदर्शकता आणणे होय. कोणत्याही स्तरावरील परीक्षा आयोजित करणाऱ्या संस्थांचे कामकाज इतके पारदर्शक आणि अचूक असले पाहिजे, की परीक्षार्थींच्या मनात परीक्षेच्या शुद्धतेबद्दल आणि गुणवत्तेबद्दल कोणतीही शंका राहता कामा नये. परीक्षा केंद्र निवडण्यापासून उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनापर्यंत प्रत्येक टप्प्यावर स्वतंत्र आणि त्रयस्थ ऑडिट केले पाहिजे. भारताला जागतिक स्तरावर 'ज्ञान महासत्ता' बनवायचे असेल, तर प्रथम आपल्याला आपल्या देशातील परीक्षा प्रणालीची ढासळलेली विश्वासार्हता पुनर्स्थापित करावी लागेल. लाखो तरुण विद्यार्थ्यांचे मनोबल खचणे हे कोणत्याही राष्ट्राच्या भविष्यासाठी अत्यंत घातक आहे. आपण वर्षानुवर्षे केलेल्या मेहनतीपेक्षा पैशाच्या बळावर प्रश्नपत्रिका विकत घेणारा विद्यार्थी पुढे जात आहे, हे एखाद्या प्रामाणिक विद्यार्थ्याला कळते, तेव्हा त्याचा लोकशाही आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडतो, म्हणूनच केंद्र सरकार, शिक्षण मंत्रालय, नंदन नीलेकणी, 'टास्क फोर्स' आणि संबंधित घटकांनी आता कोणताही वेळ न गमावता ठोस पावले उचलली पाहिजेत. राधाकृष्णन समितीच्या शिफारशींची तत्काळ पूर्ण अंमलबजावणी करणे, कडक कायदे लागू करणे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आणि परीक्षांचे स्वरूप अधिक लवचिक आणि विद्यार्थीकेंद्री करणे हे आता ऐच्छिक उरलेले नाही, तर तातडीचे राष्ट्रीय कर्तव्य बनले आहे.

# डिजिटल रस्त्यावरील टोलनाका!

**यूपीआयवर शुल्क लावणे म्हणजे डिजिटल रस्त्यावर टोलनाका उभारणे. भारताला खरोखर डिजिटल महासत्ता बनायचे असेल, तर त्याची डिजिटल पायाभूत व्यवस्था काही मोजक्या कंपन्यांसाठी नफेखोरीचे साधन बनता कामा नये.**



गेल्या दशकात भारताने जगासमोर अभिमानाने मांडलेल्या महत्त्वाच्या गोष्टींपैकी एक म्हणजे 'युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस' म्हणजेच 'यूपीआय'. छोट्या दुकानदारापासून मोठ्या व्यापाऱ्यापर्यंत, शेतकऱ्यापासून कामगारापर्यंत आणि विद्यार्थ्यापासून निवृत्त नागरिकापर्यंत कोट्यवधी भारतीय आज या व्यवस्थेचा वापर करतात. मात्र आता एक मूलभूत प्रश्न निर्माण झाला आहे - ज्या डिजिटल पेमेंट व्यवस्थेत सरकारने स्वतः सामान्य नागरिकांना आणले, त्याच व्यवस्थेचा वापर करण्यासाठी आता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्यांच्याकडून शुल्क वसूल करण्याचा मार्ग खुला केला जात आहे का?

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकतीच लोकसभेत प्रचंड गदारोळात 'पेमेंट्स आणि सेटलमेंट ॲक्ट २००७'च्या सेक्शन १० अमधे दुरुस्ती मंजूर करून घेतली. त्यानंतर, सर्वसामान्य ग्राहकांच्या व्यक्ती-ते-व्यक्ती यूपीआय व्यवहारांवर शुल्क आकारले जाणार नाही, अशी भूमिका सरकारने स्पष्ट केली आहे. भविष्यात मर्चंट डिस्काउंट रेट (एमडीआर) लागू झाला तरी तो काही निवडक व्यापारी व्यवहारांपुरता आणि नाममात्र असेल, असे सांगितले जात आहे. तथापि, खरा प्रश्न आहे तो, डिजिटल पेमेंट व्यवस्था ही सार्वजनिक पायाभूत सुविधा आहे, की नफा कमावण्यासाठी उपलब्ध करून दिलेली बाजारपेठ?

आधुनिक अर्थव्यवस्थेत वेतन, निवृत्ती वेतन, शिष्यवृत्ती, सरकारी अनुदाने, सामाजिक सुरक्षा, विमा, करभरणा, सरकारी योजनांचे लाभ, थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) आणि दैनंदिन व्यापारी व्यवहार अशा नागरिकांच्या आर्थिक जीवनातील जवळपास प्रत्येक बाबीचा आज बँकिंग व्यवस्थेशी संबंध आहे. त्यामुळे बँकिंग आणि पेमेंट व्यवस्था आता सार्वजनिक उपयोगिता सेवा झाली आहे. ती एकविसाव्या शतकातील एक अत्यावश्यक आर्थिक पायाभूत सुविधा आहे. तिचा मूलभूत खर्च शासनाने आणि व्यापक वित्तीय व्यवस्थेने उचलायला हवा.

नोटाबंदीपासून जनधन, आधार, मोबाइल, डीबीटी, आणि डिजिटल इंडियापर्यंत सरकारने नागरिकांना औपचारिक बँकिंग आणि डिजिटल पेमेंट व्यवस्थेत आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मोहिमा राबवल्या. त्यातून अगदी छोट्या दुकानदारांनीही क्यू आर कोड लावले. ग्रामीण भागातील नागरिकांनीही स्मार्टफोनच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार करण्यास सुरुवात केली. या संपूर्ण परिवर्तनाचा काही खर्च नागरिकांनीही उचलला आहे. स्मार्टफोन, इंटरनेट डेटा, डिजिटल साक्षरता आणि सायबर फसवणुकीचा वाढता धोकाही त्यांनी स्वीकारला आहे. आता ही व्यवस्था त्यांच्या दैनंदिन जीवनाचा अपरिहार्य भाग झाल्यानंतर तिचे हळूहळू व्यापारीकरण करणे म्हणजे नागरिकांच्या विश्वासाशी धोरणात्मक प्रतारणा ठरेल. विशेष म्हणजे मार्च २०२५ मध्ये सरकारने स्वतः १,५०० कोटी रुपयांच्या प्रोत्साहन योजनेला मंजुरी दिली होती आणि छोट्या व्यापाऱ्यांकडील दोन हजारांपर्यंतच्या यूपीआय व्यवहारांसाठी ०.१५ टक्के प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला होता. याचा अर्थ स्पष्ट आहे. डिजिटल पेमेंटमधून व्यापक सामाजिक आणि आर्थिक लाभ होत असल्यामुळे त्याच्या पायाभूत खर्चाचा काही भाग सार्वजनिक निधीतून उचलण्याचे तत्त्व सरकारने स्वतः स्वीकारले होते; मग आता त्यापासून मागे का जायचे?

सरकार असा युक्तिवाद करू शकते की, प्रस्तावित एमडीआर ग्राहकांकडून घेतला जाणार नाही; तो केवळ निवडक व्यापाऱ्यांकडून आकारला जाईल. पण प्रश्न केवळ, शुल्क कोण भरणार, एवढाच नाही. त्या शुल्काचा अंतिम आर्थिक भार कोण सहन करणार, हा आहे. आणि अप्रत्यक्ष शुल्कांच्या व्यवस्थेत हा भार शेवटी सर्वसामान्य ग्राहकापर्यंत पोहोचण्याची शक्यता मोठी असते. आज असे सांगितले जाईल की शुल्क फक्त मोठ्या व्यापाऱ्यांसाठी आहे. उद्या त्याची मर्यादा बदलली जाऊ शकते. परवा व्यवहाराची किमान रक्कम कमी केली जाऊ शकते.

अर्थात, डिजिटल पायाभूत व्यवस्था चालविण्यासाठी खर्च येतो. सर्व्हर, डेटा सेंटर, सायबर सुरक्षा, दूरसंचार नेटवर्क, फसवणूक प्रतिबंधक यंत्रणा, तक्रार निवारण आणि सेटलमेंट यंत्रणा या सर्वांचा खर्च आहे. मात्र रस्त्यांच्या निर्मितीसाठी खर्च होतो म्हणून प्रत्येक गल्लीत टोल नाका उभारला जात नाही. डिजिटल व्यवहारांमुळे बँकांवर केवळ खर्चाचा भार पडतो, असा युक्तिवाद एकतर्फी आहे. डिजिटल व्यवहारांमुळे शाखांमधील रोख व्यवहार कमी होतात. रोख रक्कम हाताळणे, मोजणी, रोख वाहतूक, एटीएममध्ये रोकड भरणे आणि इतर अनेक मानवी प्रक्रियांवरील खर्च कमी करण्याची क्षमता डिजिटल व्यवहारांमुळे निर्माण होते.

हा प्रश्न फक्त यूपीआयचा नाही. बँक ग्राहकांकडून विविध प्रकारची शुल्के आकारली जातात. त्यात खात्याशी संबंधित सेवा, काही एटीएम व्यवहार, चेक संबंधित सेवा, ॲलर्ट्स, कार्ड्स आणि इतर सुविधा येतात. प्रत्येक शुल्क स्वतंत्रपणे पाहिल्यास लहान वाटू शकते. मात्र प्रश्न रकमेचा नाही, तत्त्वाचा आहे. बँकिंग हे नागरिकाच्या दैनंदिन जीवनासाठी अपरिहार्य झाले असेल, तर मूलभूत बँकिंग सेवांना स्वतंत्र नफा केंद्रांमध्ये रूपांतरित करणे योग्य नाही. मूलभूत बँकिंग सेवा हा नागरिकांचा आर्थिक अधिकार मानला पाहिजे.

या चर्चेला एक अत्यंत महत्त्वाचा आंतरराष्ट्रीय संदर्भही आहे. यूपीआय आणि 'रूपे' (RuPay) यांसारख्या भारतीय पेमेंट व्यवस्थांमुळे भारताला स्वतःची डिजिटल आर्थिक पायाभूत व्यवस्था निर्माण करण्याची क्षमता मिळाली आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय कार्ड नेटवर्क्स आणि पेमेंट कॉर्पोरेशन्सवरील भारताचे अवलंबित्व कमी करण्याची ऐतिहासिक संधी निर्माण झाली. इथेच आर्थिक सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण होतो. भारत-अमेरिका व्यापार चर्चेच्या पार्श्वभूमीवर यूपीआय आणि देशांतर्गत पेमेंट व्यवस्थांबाबत परकीय व्यावसायिक हितसंबंधांचा प्रभाव अथवा दबाव असल्याची राजकीय चर्चा होत आहे. यूपीआयवर एमडीआर आणण्याचा निर्णय अमेरिकेच्या दबावामुळेच घेण्यात आला आहे, असे बोलले जात आहे.

भारताचे सार्वजनिक डिजिटल पेमेंट धोरण कोणत्याही परकीय सरकारच्या, बहुराष्ट्रीय कार्ड नेटवर्कच्या किंवा जागतिक वित्तीय कंपनीच्या दबावाखाली असता कामा नये. भारताच्या डिजिटल पेमेंट धोरणातील कोणताही बदल पूर्ण पारदर्शकतेने आणि देशाच्या सार्वजनिक हिताला सर्वोच्च स्थान देऊनच झाला पाहिजे. त्यामुळे यूपीआय, रूपे आणि भारताची डिजिटल यंत्रणा कोणत्याही आंतरराष्ट्रीय व्यापार वाटाघाटीतील सौदेबाजीचे साधन बनणार नाही, हे संसद व सरकारने स्पष्टपणे जाहीर करायला हवे. डिजिटल सार्वभौमत्व म्हणजे केवळ भारतीय नागरिकांचा डेटा भारतातच राहणे एवढेच नाही; त्याचा अर्थ अधिक व्यापक आहे. भारताची पेमेंट व्यवस्था भारतीय सार्वजनिक हिताच्या नियंत्रणाखाली राहिली पाहिजे. तिचे नियम भारतीय संसद, भारतीय नियामक संस्था आणि भारतीय जनतेच्या हिताच्या आधारावर ठरले पाहिजेत.

डिजिटल पेमेंटमुळे व्यवहारांची गती वाढते. पैसा औपचारिक वित्तीय व्यवस्थेमध्ये फिरत राहतो आणि आर्थिक व्यवहारक्षमता वाढते. डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे व्यवहाराची व्यापकता आणि गती, वित्तीय औपचारिकता आणि बँकिंग तरलता यांच्या वापराच्या पद्धती बदलतात. या बदलातून निर्माण होणारा उत्पादकतेचा लाभ आणि खर्चातील बचत कोणाच्या वाट्याला जाते, हा खरा राजकीय अर्थशास्त्राचा प्रश्न आहे. जर या परिवर्तनाचा फायदा फिनटेक कंपन्या, पेमेंट ॲग्रिगेटर आणि मोठ्या वित्तीय संस्थांनी घ्यायचा आणि त्याचा खर्च सामान्य नागरिकांच्या माथी मारायचा असे असेल, तर ते स्वीकारता येणार नाही.

या संपूर्ण प्रश्नाच्या केंद्रस्थानी एक मूलभूत वैचारिक संघर्ष आहे. एका बाजूला बाजारवादी विचार सांगतो की, 'प्रत्येक सेवेची किंमत असते; त्यामुळे ती वापरणाऱ्याने पैसे भरले पाहिजेत.' दुसऱ्या बाजूला लोककल्याणवादी विचार सांगतो की, 'समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत पायाभूत सेवा सार्वत्रिक, परवडणाऱ्या आणि शक्य असेल तेथे मोफत उपलब्ध करून देणे ही कल्याणकारी राज्याची जबाबदारी आहे.' यूपीआय ही केवळ फिनटेक उद्योगाची व्यावसायिक उपलब्धी नाही. ती सार्वजनिक धोरण, सार्वजनिक संस्था, भारतीय बँकिंग व्यवस्था, तंत्रज्ञान आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कोट्यवधी भारतीय नागरिकांच्या सहभागातून निर्माण झालेली राष्ट्रीय डिजिटल संपत्ती आहे. या राष्ट्रीय संपत्तीभोवती आता टोलनाका उभारला जाऊ नये. आज आवाज उठवला नाही तर...

प्रत्येक शुल्काची सुरुवात लहानच असते. सुरुवातीला मोठ्या व्यवहारांवर. नंतर मोठ्या व्यापाऱ्यांवर.त्यानंतर मर्यादा बदलतात.पुढे शुल्क सामान्य केले जाते, आणि काही वर्षांनी नागरिकांना सांगितले जाते, 'ही तर बाजाराची अपरिहार्यता आहे'. मात्र ही अपरिहार्यता नाही. ही राजकीय आणि आर्थिक धोरणाची निवड आहे. त्यामुळे यूपीआयवरील शुल्काचा प्रश्न केवळ डिजिटल पेमेंटचा नाही, तो सार्वजनिक मालमत्ता, ग्राहकांचे अधिकार,वित्तीय समावेशन, आर्थिक सार्वभौमत्व आणि कल्याणकारी राज्याच्या मूलभूत स्वरूपाचा प्रश्न आहे. भारताला खरोखर डिजिटल महासत्ता बनायचे असेल,तर त्याची डिजिटल पायाभूत व्यवस्था काही मोजक्या कंपन्यांसाठी नफेखोरीचे साधन बनता कामा नये. ती डिजिटल सार्वजनिक संपत्ती म्हणून विकसित आणि संरक्षित झाली पाहिजे. रस्ते अर्थव्यवस्थेला जोडतात. रेल्वे देशाला जोडते. वीज उत्पादनाला शक्ती देते. पाणी जीवनाला आधार देते आणि आजच्या काळात बँकिंग आणि डिजिटल पेमेंट व्यवस्था संपूर्ण अर्थव्यवस्थेला जोडते. त्यामुळे तिच्या मूलभूत पायाभूत सुविधांचा खर्च समाजाने सामूहिकरीत्या सरकारच्या माध्यमातून उचलला पाहिजे. तो प्रत्येक व्यवहाराच्या वेळी सामान्य माणसाच्या खिशातून वसूल केला जाऊ नये.

**देविदास तुळजापूरकर**

# 'यूपीआय'चा संशयकल्लोळ

लोकसभेने नुकताच कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ मंजूर करताना देयक आणि निपटारा प्रणाली कायद्यात बदल करण्याचा प्रस्ताव स्वीकारला आहे. या बदलामुळे केंद्र सरकारला कोणते इलेक्ट्रॉनिक व्यवहार विनामूल्य ठेवायचे आणि कोणत्या व्यवहारांवर शुल्क आकारता येईल, याबाबत निर्णय घेण्याची अधिक मुभा मिळणार आहे. येणाऱ्या काळात यूपीआय व्यवहारांवर शुल्कआकारणी केली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सरकार भलेही हे शुल्क व्यापाऱ्यांना लागू असेल असे म्हणत आहे; पण अप्रत्यक्षपणे त्याचा भार ग्राहकांवरच टाकला जाईल हे निश्चित आहे.

सुलभ, वेगवान आणि विनाशुल्क आर्थिक व्यवहार करण्याची सुविधा देत युनिफाईड पेमेंट इंटरफेस म्हणजेच यूपीआयने देशातील आर्थिक व्यवहारांची पद्धतच बदलून टाकली. छोट्या दुकानदारांपासून मोठ्या उद्योगांपर्यंत आणि शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत त्याचा विस्तार झाला. डिजिटल इंडियाच्या यशाचे उदाहरण म्हणून यूपीआयचे उदाहरण केंद्र सरकारमधील सर्व मंत्रीगण, पंतप्रधान आणि भाजपशासित राज्यातील सरकारे, समर्थक सातत्याने करतच असतात. पण आता यूपीआय आणि रुपेच्या काही व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा मार्ग मोकळा करणाऱ्या कायद्यातील बदलामुळे काही प्रश्न निर्माण झाले असून त्यांची समर्पक उत्तरे नेहमीप्रमाणे सरकारकडून मिळत नाहीयेत. मुळात, ज्या व्यवस्थेचे यश सरकार अभिमानाने सांगत आले, तिच्या मूलभूत वैशिष्ट्यांमध्ये बदल करण्याची गरज का निर्माण झाली, हा यातील कळीचा प्रश्न आहे.

### शाश्वततेचा प्रश्न की धोरणातील विसंगती?

यूपीआयचे व्यवहार ग्राहक आणि व्यापाऱ्यांसाठी विनाशुल्क असले तरी त्यामागील व्यवस्था विनाखर्च चालत नाही. बँका, भारतीय राष्ट्रीय देयक महामंडळ, देयक सेवा पुरवठादार आणि इतर संस्थांना तंत्रज्ञान, सुरक्षा, सर्व्हर, देखभाल आणि विस्तारासाठी मोठा खर्च करावा लागतो. पण यूपीआयची व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी सरकार दरवर्षी बँकांना मोठ्या प्रमाणावर म्हणजेच २००० कोटी रुपयांची आर्थिक मदत देत आहे. अशा परिस्थितीत बँकांना व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा अधिकार देण्यामागील आर्थिक तर्क स्पष्टपणे समोर येणे आवश्यक आहे. सरकारच्या अनुदानातून ही व्यवस्था चालवायची आणि त्याच वेळी त्याच व्यवहारांवर शुल्क आकारण्याची मुभा द्यायची, या दोन्ही बाबींचा समन्वय कसा साधला जाणार, याचे समाधानकारक उत्तर सरकारने देणे गरजेचे आहे. उद्योगांच्या मते प्रत्यक्ष खर्च सरकारी अनुदानापेक्षा मोठा आहे. मात्र त्याचे उत्तर थेट शुल्कव्यवस्था निर्माण करण्यातच आहे, असे मानणे घाईचे ठरेल. कारण यूपीआयची लोकप्रियता मोठ्या प्रमाणावर 'विनाशुल्क व्यवहार' या वैशिष्ट्यावर उभी आहे. हीच बाब बदलली, तर त्याच्या वापरावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.सद्यस्थितीत दोन हजार रुपयांपेक्षा अधिक व्यवहार एकूण व्यवहारसंख्येच्या केवळ ४ ते ५ टक्के असले, तरी व्यवहारमूल्याच्या सुमारे ७० टक्के हिस्सा त्यांचा आहे. त्यामुळे छोट्या व्यवहारांना स्पर्श न करता मोठ्या व्यवहारांवर शुल्क लावण्याची कल्पना विचारात घेता येऊ शकते. परंतु ही व्यवस्था प्रत्यक्षात कशी राबविली जाईल, हा अधिक महत्त्वाचा मुद्दा आहे.




### खात्री काय?

यूपीआय व्यवहारांवरील शुल्काचा विषय प्रामुख्याने मर्चंट डिस्काऊंट रेट म्हणजेच एमडीआरभोवती फिरतो. हा असा महसूल असतो जो व्यापारी डिजिटल व्यवहार सुलभतेने पार पाडण्यासाठी बँका किंवा पेमेंट कंपन्यांना देतात. सध्या हा दर शून्य असल्यामुळे लहान दुकानदारांपासून ते मोठ्या ग्राहकांपर्यंत सर्वांनीच डिजिटल व्यवहारांचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला आहे. आता नव्या विधेयकानंतर सरकारचे म्हणणे आहे की, एमडीआर हा ग्राहकावर नव्हे, तर व्यापाऱ्यांवर लागू होणार असल्यामुळे सामान्य वापरकर्त्यावर थेट परिणाम होणार नाही. हे तांत्रिकदृष्ट्या योग्य दिसत असले, तरी आर्थिक व्यवहार प्रत्यक्षातइतके सरळ नसतात. व्यापाऱ्यांच्या खर्चात वाढ झाली तर वस्तू किंवा सेवांच्या किमतीत तो खर्च समाविष्ट होण्याची शक्यता आहे. काही व्यापारी ग्राहकांना वेगळे शुल्कही आकारू शकतात. त्यामुळे 'ग्राहकाकडून शुल्क घेतले जाणार नाही' एवढे सांगणे पुरेसे ठरणार नाही. सरकारने अशा शुल्काचा अंतिम परिणाम ग्राहकांवर होणार नाही, यासाठी स्पष्ट आणि प्रभावी नियम तयार करणे आवश्यक आहे. विशेषत लहान व्यापारी आणि सेवा क्षेत्रातील व्यावसायिकांवर त्याचा अनावश्यक भार पडता कामा नये. यूपीआयने छोट्या व्यवहारांनाही डिजिटल केले आहे. पण शुल्क आकारणीमुळे या वर्गाला पुन्हा रोख व्यवहाराकडे वळण्याची वेळ आली, तर आतापर्यंत झालेल्या डिजिटल परिवर्तनाला धक्का बसू शकतो.

यूपीआय शुल्काचा विचार केवळ आर्थिक शाश्वततेसाठी होत असेल, तर त्याचे स्पष्ट आर्थिक गणित देशासमोर ठेवले पाहिजे. यूपीआय चालवण्यासाठी प्रत्यक्ष किती खर्च होतो, सरकारची सध्याची मदत किती आहे, भविष्यात किती गुंतवणूक आवश्यक आहे आणि शुल्काशिवाय कोणते पर्याय उपलब्ध आहेत, याची माहिती सार्वजनिक झाली पाहिजे. कारण यूपीआय ही केवळ सरकारी योजना नाही. ती देशाची डिजिटल पायाभूत सुविधा बनली आहे. तिच्याशी कोटय़वधी नागरिक आणि लाखो व्यापारी जोडलेले आहेत.

डिजिटल व्यवहार सातत्याने वाढत असताना प्रत्येक व्यवहाराचा खर्च सरकारनेच उचलणे दीर्घकाळ शक्य होणार नाही. पायाभूत सुविधांचा विस्तार, सायबर सुरक्षा आणि तंत्रज्ञानातील सुधारणा यासाठी मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता आहे. म्हणूनच यूपीआयला कायमस्वरूपी विनाशुल्क ठेवायचे असल्यास पर्यायी महसूल मॉडेल तयार करावे लागेल. मोठ्या व्यापारी व्यवहारांवर अत्यल्प शुल्क हा त्यापैकी एक पर्याय असू शकतो. मात्र त्यासाठी व्यवहारांचे प्रमाण, मूल्य, व्यापाऱ्याचा आकार आणि क्षेत्र यांचा विचार करून अत्यंत काळजीपूर्वक रचना करावी लागेल.

भारताने यूपीआयच्या माध्यमातून जगाला डिजिटल व्यवहाराचे एक प्रभावी मॉडेल दिले आहे. ब्राझीलची पिस यांसारखी व्यवस्था शुल्क आकारणीसह चालत असली, तरी भारताची परिस्थिती वेगळी आहे. भारतात यूपीआयने आर्थिक व्यवहारांचे मोठ्या प्रमाणावर लोकशाहीकरण केले आहे. त्यामुळे अन्य देशांच्या उदाहरणाचा आधार घेऊन भारततही शुल्क लागू करणे पुरेसे कारण ठरू शकत नाही. तेव्हा सरकारने यूपीआयच्या आर्थिक शाश्वततेचा विचार जरूर करावा; पण त्याच वेळी त्याची सुलभता, कमी खर्च आणि सर्वसमावेशकता अबाधित ठेवायला हवी. विशेषत छोट्या व्यवहारांवर कोणताही अतिरिक्त भार पडता कामा नये.यूपीआयचा विस्तार हा भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. त्याच्या टिकाऊपणासाठी बदल आवश्यक असतील, तर ते बदल करता येतील. पण बदल करताना यूपीआयची मूळ ताकदच कमी होणार नाही, याची काळजी घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

### ग्राहकांचे काय?

यूपीआय शुल्क आकारणीबाबत निर्माण झालेला मुख्य प्रश्न शुल्क आकारले जाईल की नाही, एवढाच नाही. प्रश्न हा आहे की, व्यापाऱ्यांकडून आकारले जाणारे शुल्क अखेरीस ग्राहकांपर्यंत पोहोचणार नाही, याची हमी कोण देणार? भारताच्या डिजिटल देयक व्यवस्थेचे भविष्यातील धोरण कोण ठरवणार? जर हा निर्णय भारताच्या अंतर्गत आर्थिक गरजांमधून घेतला जात असेल, तर त्याचे कारण स्पष्टपणे सांगणे सरकारच्या हिताचे आहे. तसेच जर अमेरिका-भारत व्यापार चर्चेचा त्यावर कोणताही प्रभाव नसेल, तर तेही स्पष्ट केले पाहिजे. कारण अस्पष्टता वाढली की आर्थिक निर्णयाभोवती अनावश्यक चर्चा निर्माण होते.

**महेश कोळी**

बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# ‘झारीतील शुक्राचार्यां’मुळे जिल्हा परिषद प्रशासनाची नाचक्की..!

## सीईओंना उच्च न्यायालयात मागावी लागली बिनशर्त माफी, शिक्षकाच्या नियुक्तीवरून न्यायालयाचे ताशेरे

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १८ : जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विभागातील कारभार पुन्हा एकदा न्यायालयाच्या दारात पोहोचला असून, शिक्षकाच्या नियुक्तीप्रकरणी झालेल्या प्रशासकीय गोंधळामुळे जिल्हा परिषद प्रशासनाची चांगलीच नाचक्की झाली आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या कार्यकाळात झालेल्या निर्णयावरून दाखल याचिकेच्या सुनावणीदरम्यान विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांना नागपूर खंडपीठात बिनशर्त माफी मागावी लागली.**



यवतमाळ येथील माध्यमिक शाळेत कार्यरत गणित विषयाचे शिक्षक सुनील पांडुरंग बरमदे यांना कोणतेही ठोस कारण नसताना निलंबित करण्यात आले होते. बरमदे हे एम.एस्सी. गणित पदवीधारक असून अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना गणित शिकविण्यासाठी त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. निलंबनाविरोधात त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर प्रशासनाने निलंबन मागे घेत त्यांची पांढरकवडा येथे नियुक्ती केली. मात्र, तेथे त्यांना त्यांच्या विशेष पात्रतेच्या गणिताऐवजी रसायनशास्त्र शिकविण्याचे आदेश देण्यात आले. या निर्णयावर न्यायालयानेच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. गणित विषयासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकाला रसायनशास्त्र का शिकविण्यात येत आहे, अशी विचारणा न्यायालयाने केली. अखेर या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांनी न्यायालयात बिनशर्त माफी मागितली. न्यायालयाने वादग्रस्त अट दोन दिवसांत रद्द करण्याचे निर्देश दिल्यानंतर प्रशासनाने संबंधित शिक्षकाला नववी-दहावीच्या विद्यार्थ्यांना गणित शिकविण्याचा आदेश दिला. दरम्यान, यवतमाळ येथील अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर या निर्णयाचा परिणाम होत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. ४६ विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आले असून, अध्ययनावर गंभीर परिणाम होत असल्याने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

### ‘झारीतील शुक्राचार्य’ कोण?

जिल्हा परिषद शिक्षण विभागातील निर्णयप्रक्रियेवर यापूर्वीही अनेकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत. काही अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मनमानीमुळे प्रशासनाची प्रतिमा मलिन होत असल्याची चर्चा आहे. या प्रकरणात न्यायमूर्ती अनिल पानसरे आणि न्यायमूर्ती निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले असून, पुढील सुनावणी १९ ऑगस्टला होणार आहे.

### शिक्षणाचा अधिकार कागदावरच?

प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण मिळणे हा त्याचा अधिकार आहे. मात्र, प्रशासनातील निर्णयांच्या गोंधळाचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर होत असेल, तर जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आली आहे. शिक्षकांच्या प्रशासकीय फेरबदलात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, अशी पालकांची मागणी आहे.

# कोलाम समाजावरील अन्यायाला लगाम लावा, अन्यथा जिल्हाभर तीव्र आंदोलन!

## आश्रमशाळांतील विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १८ :** आदिम कोलाम समाजावर होत असलेला अन्याय, अत्याचार आणि प्रशासकीय दुर्लक्ष तातडीने थांबवावे, अन्यथा जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शामा दादा कोलाम ब्रिगेडने पत्रकार परिषदेतून दिला. प्रदेशाध्यक्षा इंदिरा बोंद्रे यांच्या आदेशानुसार झालेल्या या पत्रकार परिषदेत आश्रमशाळांतील विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न तीव्रतेने उपस्थित करण्यात आला. आदिवासी युवा नेते अतुल आत्राम यांनी आश्रमशाळांमध्ये आदिवासी व कोलाम विद्यार्थिनी सुरक्षित नसल्याचा आरोप केला. गडचिरोलीतील शासकीय वसतिगृहातील सर्पदंशाची घटना तसेच आश्रमशाळेतील कोलाम विद्यार्थिनीच्या मृत्यूचा संदर्भ देत, गंभीर घटनांनंतरही ठोस कारवाई होत नसल्याबद्दल त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. गरीब पालकांवर दबाव आणून तुटपुंजी मदत देत प्रकरणे दडपली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. वनहक्क कायद्याचे अभ्यासक राहुल चिचघाटे यांनी कोलाम समाज आजही घर, रोजगार व शेतीच्या हक्कापासून वंचित असल्याचे सांगितले. वनहक्क कायद्यात आवश्यक सुधारणा करून पालकमंत्री व लोकप्रतिनिधींनी कोलाम समाजाच्या मागण्या कॅबिनेटसमोर मांडाव्यात, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी गुरुदेव घोडणारे, विष्णू सुरपाम, कु. शीतल बोंद्रे तसेच बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भाई जगदीश कुमार इंगळे उपस्थित होते. इंगळे यांनी आंदोलनाला संघटनेचा पाठिंबा जाहीर करून इतर संघटनांनीही सहभागी होण्याचे आवाहन केले. कोलाम समाजाने मतभेद विसरून एकजूट व्हावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# ई-पिक पाहणी नोंदणीसाठी तहसीलदारांचे आवाहन

## प्रत्येक खातेदाराने आपल्या शेतातील पिकांची नोंदणी करण्याचे आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. १८ :** तालुक्यात खरीप हंगामातील ई-पिक पाहणी नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, प्रत्येक खातेदाराने आपल्या शेतातील पिकांची ई-पिक पाहणी नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन तहसीलदार राजेंद्र इंगळे यांनी केले आहे.

मुरमाडी, मांगुर्डा परिसरासह तालुक्यातील विविध गावांमध्ये ई-पिक पाहणी सहाय्यकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नोंदणीसाठी मार्गदर्शन करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या पिकांची अचूक व अद्ययावत नोंद शासनाच्या अभिलेखात राहावी, यासाठी ई-पिक पाहणी प्रक्रिया महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात प्रत्यक्ष पाहणी करून लागवड केलेल्या पिकांची माहिती ई-पिक पाहणी प्रणालीमध्ये नोंदवावी. पिकांची योग्य नोंद झाल्यास शासकीय योजनांचा लाभ, पीकविषयक माहिती तसेच विविध प्रशासकीय प्रक्रियांमध्ये आवश्यक नोंदी उपलब्ध होण्यास मदत होते. तालुक्यातील अनेक शेतकरी शेतीवर अवलंबून असून खरीप हंगामात विविध पिकांची लागवड करण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक खातेदाराने आपल्या शेतातील प्रत्यक्ष पिकांची माहिती अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे. नोंदणी करताना शेतकऱ्यांनी पिकाचे नाव, लागवडीची माहिती तसेच संबंधित शेताची आवश्यक माहिती काळजीपूर्वक भरावी, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. ई-पिक पाहणी सहाय्यकांच्या माध्यमातून गावपातळीवर शेतकऱ्यांना नोंदणी प्रक्रियेसंदर्भात मार्गदर्शन केले जात आहे. ज्या खातेदारांना ई-पिक पाहणी नोंदणी करताना अडचणी येत असतील, त्यांनी संबंधित ई-पिक पाहणी सहाय्यकांशी संपर्क साधून आवश्यक मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, पिकांची नोंदणी वेळेत न झाल्यास भविष्यातील विविध शासकीय प्रक्रियांमध्ये अडचणी निर्माण होऊ नयेत, यासाठी शेतकऱ्यांनी नोंदणीची प्रक्रिया गांभीर्याने पूर्ण करावी. कोणत्याही शेतकऱ्याने ई-पिक पाहणी नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाकडून जनजागृती करण्यात येत आहे.

# जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात ‘स्टार्टअप कार्निव्हल २०२६’

## २२ ऑगस्टला टॉप-३ संघांना ‘युरेका २०२६’ची संधी



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १८ :** विद्यार्थ्यांमधील नवकल्पना, उद्योजकता आणि स्टार्टअप संस्कृतीला चालना देण्यासाठी जगदंबा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, यवतमाळच्या ई-सेलतर्फे ‘स्टार्टअप कार्निव्हल २०२६ – इंटर-कॉलेज स्टार्टअप पिच अरेना’चे आयोजन करण्यात आले आहे. २२ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या परिसरात होणारा हा उपक्रम यवतमाळ जिल्ह्यातील पहिला स्टार्टअप कार्निव्हल ठरणार आहे. या स्पर्धेत विद्यार्थी आपल्या नाविन्यपूर्ण व्यावसायिक व स्टार्टअप कल्पना उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांसमोर मांडणार आहेत. ॲमेझॉनचे टॅलेंट ॲक्विझिशन हेड एच.आर. अमोद शर्मा, टीसीएचचे कॅम्पस हायरिंग एच.आर. प्रमिक अगवान व राहुल पटेल हे परीक्षक म्हणून उपस्थित राहणार आहेत. कल्पनेची नावीन्यता, समस्या सोडविण्याची क्षमता, व्यावसायिक व्यवहार्यता, बाजारपेठेतील संधी आणि विस्ताराची क्षमता या निकषांवर परीक्षण होणार आहे. या स्पर्धेत दोन ते पाच विद्यार्थ्यांची टीम सहभागी होऊ शकते. उत्कृष्ट संघांना रोख पारितोषिकांसह टॉप-३ टीम्सना ‘युरेका २०२६ – ई-सेल, आयआयटी मुंबई’मध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. संस्था सचिव डॉ. शीतल वातीले, प्राचार्य डॉ. प्रविण डाखोरे व उपप्राचार्य डॉ. विजय भांबेरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाची तयारी सुरू आहे. समन्वयक प्रा. आशिष महल्ले, प्राध्यापकवृंद व विद्यार्थी समन्वयक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यरत आहेत. विदर्भातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# थोडक्यात

## स्व.रामलालजी पुरोहित इंग्लिश मीडियमची श्रुती राऊत शिष्यवृत्ती साठी पात्र

✦ किरण नरवाडे



**महागाव:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत स्व.रामलालजी पुरोहित इंग्लिश मिडीयम स्कूलमधील श्रुती राऊत हिने नेत्रदिपक यश मिळवुन शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पात्र ठरली आहे. महागाव येथील स्व.रामलालजी पुरोहित इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये चौथ्या वर्गात शिकणाऱ्या कु.श्रुती शंकर राऊत हिने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यावतीने घेण्यात येणाऱ्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये २९८ पैकी १८४ गुण मिळवून यश संपादन करीत ती शिष्यवृत्ती करीत पात्र झाली. तिने आपल्या यशाचे श्रेय शिक्षक,आई वडील यांना दिले आहे.तिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रितेशभाऊ पुरोहित ,मुख्याध्यापिका विद्या ठाकरे, शिक्षक यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. श्रुती राऊत हिच्या यशाबद्दल सर्वच स्तरातून तिचे अभिनंदन होत आहे.



## पारवा येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा..!

**राहत क्लिनिक परिसरात वृक्षारोपणातून पर्यावरणाचा संदेश**

**यवतमाळ :** पारवा येथील दारुल उलूम जामिया अन्वर उल इस्लाममध्ये स्वातंत्र्यदिन देशभक्तीच्या वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष मौलाना सै. हमजा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास उपाध्यक्ष मौलाना मोहम्मद याकुब, सचिव हाफीज मोहम्मद अनिस यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर स्वातंत्र्यसंग्रामातील हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण करून राष्ट्रीय एकता, अखंडता व सामाजिक सलोखा जपण्याचे आवाहन करण्यात आले. दरम्यान, जमात-ए-इस्लामी यवतमाळच्या वतीने राहत क्लिनिक परिसरात वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. जमात-ए-इस्लामीचे अध्यक्ष झियाउद्दीन तसेच आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. नागरिक, विद्यार्थी व पदाधिकाऱ्यांनीही सहभाग घेतला. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने देशभक्तीसोबतच पर्यावरण संवर्धनाचा ठोस संदेश देणारा हा उपक्रम ठरला.

## ३४ टक्के कोटींचे लेखी आश्वासन..! अभियंत्यांचे उपोषण स्थगित



**पुसद :** सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद अंतर्गत शासन निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांसाठी राखीव असलेली ३४ टक्के कामे मागील तीन-चार वर्षांपासून मिळत नसल्याच्या निषेधार्थ सुरू असलेले उपोषण कार्यकारी अभियंता महेश माथुरकर यांच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले. अभियंता सय्यद अन्वर अली यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात मागील तीन वर्षांचा ३४ टक्के कोटा पूर्ण का झाला नाही, याचा जाब विचारत २०२५-२६ मधील मंजूर लहान कामांची यादी, करारनामे तसेच १० लाख रुपयांपर्यंतच्या कामांचा तपशील मागण्यात आला. १४ ऑगस्ट रोजी कार्यकारी अभियंत्यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आगामी निविदांमध्ये ५० लाख रुपयांपर्यंतच्या कामांपैकी ३४ टक्के कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांसाठी राखीव ठेवण्याची लेखी हमी दिली. पुढील १५ दिवसांत मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

# रामदास आठवले यांच्या उपस्थितीत यवतमाळात रिपाईची विदर्भ बैठक..!

## सामाजिक न्यायाच्या प्रश्नांसह संघटन बळकटीवर मंथन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १८ :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)च्या विदर्भ विभागातील पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक गुरुवार, दि. २० ऑगस्ट रोजी यवतमाळातील धामणगाव रोडवरील हॉटेल राधामंगल येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासह विदर्भातील विविध सामाजिक प्रश्नांवर आक्रमक भूमिका निश्चित केली जाणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष महेंद्र मानकर यांनी दिली.

महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दीनिमित्त सातारा ते पुणे सामाजिक समता मार्चचे नियोजन, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षातील कार्यक्रम, सामाजिक न्याय व संविधानिक मूल्यांच्या प्रसाराबाबत बैठकीत चर्चा होणार आहे. यासोबतच यवतमाळ जिल्ह्याचा पीक विम्यात समावेश, ॲट्रॉसिटी प्रकरणे, चिंचोली संगम पुनर्वसन, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, मुलींच्या शासकीय वसतिगृहांतील रस्ते व विद्युत सुविधा, जात पडताळणी, कलावंत सन्मान योजना, उमरखेड तालुक्यातील तलावातून पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच रमाई घरकुल योजनेच्या प्रश्नांवरही पदाधिकारी भूमिका मांडणार आहेत. बैठकीला केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरोदे यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. विदर्भातील पदाधिकारी, महिला, युवा व विद्यार्थी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# संजय दत्तांच्या सहभागाने ‘महावॉकेथॉन’ला मिळणार ग्लॅमर..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १८ :** माती आणि जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागातर्फे २१ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत ‘महा वॉकेथॉन २०२६ – वॉक फॉर वॉटर’चे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमात अभिनेता संजय दत्त सहभागी होणार असून, मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या निमंत्रणाला त्यांनी होकार दिला आहे. ‘सेव्ह सॉईल, सेव्ह वॉटर, सिक्युअर टुमॉरो’ आणि ‘पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा’ या संदेशांसह होणाऱ्या या वॉकेथॉनमधून जलसंधारणाबाबत जनजागृती केली जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात कमाल तीन किलोमीटर अंतराची वॉकेथॉन होईल. त्यानंतर सहभागींकडून जलसंधारणाची शपथ घेण्यात येणार असून, ई-प्रमाणपत्रही दिले जाणार आहे.वॉकेथॉनमध्ये लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, कलाकार, खेळाडू, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हास्तरावर प्रथम दहा विजेत्यांचा गौरव केला जाणार असून, प्रायोजकांच्या माध्यमातून एकूण ७१ हजार रुपयांची रोख पारितोषिके प्रस्तावित आहेत. संजय दत्त यांच्या सहभागामुळे या उपक्रमाकडे नागरिकांचे विशेष लक्ष वेधले जाण्याची शक्यता असून, जलसंधारणाचा संदेश व्यापक लोकचळवळीत रूपांतरित करण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे.

**जलसंधारणाचा संदेश जनचळवळीत**



# वरूड जहागीर ग्रामपंचायतीवर भ्रष्टाचाराचे आरोप..! BDO चौकशीच्या मागणीने खळबळ



**राळेगाव, दि. १८ :** वरूड जहागीर ग्रामपंचायतीच्या कारभारावरून ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून, सरपंच व ग्रामसेवकांवर शासनाच्या निधीच्या गैरवापरासह विकासकामांमध्ये पारदर्शकता नसल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. १८ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी या मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेत गटविकास अधिकारी, पंचायत समिती राळेगाव यांच्याकडे लेखी तक्रार करून तातडीने चौकशीची मागणी केली आहे. तक्रारीनुसार, विविध शासकीय योजनांतून मिळणाऱ्या निधीचा कथित गैरवापर होत असून विकासकामे आणि खर्चाची माहिती ग्रामस्थांना दिली जात नाही. ग्रामपंचायत कार्यालयात माहिती मागितल्यास उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. गावातील पाणी, रस्ते, स्वच्छता आणि आरोग्याच्या मूलभूत सुविधांकडेही दुर्लक्ष होत असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. प्रत्यक्षात सुविधा कोलमडलेल्या असताना कागदोपत्री विकासकामे दाखवली जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. शासकीय निधीचा हिशेब ग्रामस्थांना द्या. अन्यथा चौकशी करून दोषींवर कारवाई करा,” अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. आता BDO या तक्रारीची दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करतात का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# मुकुटबन येथे गोवंशाची अवैध वाहतूक..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. १८ :** मुकुटबन पोलिसांनी राजराजेश्वर मंदिराजवळ कारवाई करत चार गोवंश जातीचे बैल आणि दोन पिकअप वाहने असा एकूण ७ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयुर बारती (वय २२, रा. वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ) आणि निखील गुणवंत कोल्हे (वय २३, रा. बोरगाव (मेढोली), ता. वणी, जि. यवतमाळ) हे आपल्या ताब्यातील पिकअप वाहनांमधून चार गोवंश जातीच्या जनावरांची वाहतूक करताना आढळून आले.

**दोन आरोपींविरुद्ध गुन्हा**

जनावरांना आखूड दोरीने एकमेकांना घट्ट बांधून त्यांच्या हालचालींना मोकळीक नसल्याचे तसेच चारा पाण्याची व्यवस्था नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी वाहन चालकांकडे जनावरांच्या वाहतुकी संदर्भातील परवाना व वैध कागदपत्रांची मागणी केली. मात्र, कोणतेही वैध कागदपत्र सादर करण्यात आले नसल्याने पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत चार बैलांची अंदाजे किंमत ६० हजार रुपये, तर दोन पिक अप वाहनांची किंमत ६ लाख ५० हजार रुपये असा एकूण ७ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी मुकुटबन पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# यवतमाळमध्ये मिस, मिसेस व किड्स विदर्भ ऑडिशन उत्साहात संपन्न



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १८ :** ओम ट्रस्ट आणि प्रस्तुत ‘मिस, मिसेस व किड्स विदर्भ २०२६’ या स्पर्धेचे यवतमाळ येथील ऑडिशन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडले. ऑडिशनला यवतमाळसह परिसरातील मॉडेल्सनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या ऑडिशनसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून क्रांती धोटे राऊत तसेच कीर्ती राऊत नगर सेवक शैला मिर्झापूरे जिल्हा अध्यक्ष भाजप अलका कोथळे शुभांगी सोनटक्के ,पुनम शेंडे उपस्थित होत्या. तसेच ज्युरी म्हणून डॉ. निकिता चव्हाण, वैभव तडस, नेहा पडोळे, डॉ. अंजली गवारले आणि वैभव साठवणे यांनी उपस्थित राहून स्पर्धकांचे परीक्षण केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ओम ट्रस्टच्या टीममधील विशाल डहाळे, प्रवीण जोशी, अनिकेत गीते, विक्रम चिंदले, विक्रांत कोटक आणि बाबू कदम यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच रितु गायकवाड यांनीही सहकार्य केले. यवतमाळ ऑडिशनच्या आयोजनासाठी आयोजक विशाल डहाळे आणि रितु गायकवाड उपस्थित होते.

**ALL INDIA COUNCIL OF PARAMEDICAL FACULTY**
(Registered under Govt. of India)
NIWARA PARAMEDICAL INSTITUTES YAVATMAL
Branch no - AIC२२२४५

| | पद | शिक्षण | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षक | बिएससी नर्सींग / MSC. BIO/ BMLT | ०४ |
| २ | अधिक्षक | BA/MA/BSW/MSW | ०१ |
| ३ | लिपिक | १२ वी पास (संगणकाचे ज्ञान आवश्यक) | ०२ |
| ४ | शिपाई | ७ वी पास / १०वी | ०२ |
| ५ | पहारेकरी | ७ वी पास / १० वी | ०१ |

निवारा पॅरामेडीकल ईन्टीट्यूट यवतमाळ
पत्ता: जवाहर नगर, वाघापूर-लोहारा बायपास रोड (राऊत नगर) वाघापूर
मुलाखत : दि. २३/०८/२०२६.
वेळ : सकाळी १० ते ४ पर्यन्त

डॉ. सुनीता नाटकर
यवतमाळ

# “बलसागर भारत होवो... विश्वात शोभूनी राहो...”

## राजर्षी शाहू सायन्स कॉलेज



**चांदूर रेल्वे-** राजर्षी शाहू सायन्स कॉलेज येथे आयोजित कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटने शिस्तबद्ध व आकर्षक संचलन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्रा. यू. व्ही. जगताप होत्या.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर, मुख्याध्यापक प्रदीप तळोकार, कुणाल सिंगलवार, वर्षा भगत तसेच सी.टी.ओ./ एनसीसी अधिकारी डॉ. एस. एस. पाडेन यांची प्रमुख उपस्थिती होती.संचालन प्रवीण चव्हाण तर समन्वयक म्हणून प्रा. अस्लम एन. खान यांनी जबाबदारी पार पाडली.महाविद्यालयाच्या ‘संकल्प’ या महाविद्यालयीन नियतकालिकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. नियतकालिकाच्या संपादक मंडळात डॉ. ए. डी. बानसोड, डॉ. संपदा पी. पाथरकर, के. के. सोळंके आणि पी. डब्लू. चव्हाण यांचा समावेश आहे.महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमही घेण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक तथा कार्यक्रम अधिकारी डॉ. जी. बी. संतापे आणि डॉ. आर. एन. भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.महाविद्यालयातील गुणवंत व अव्वल क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, एनसीसी कॅडेट्स, एनएसएस स्वयंसेवक आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## मेळघाटातील दऱ्याखोऱ्यांत घुमला देशभक्तीचा जयघोष



**चिखलदरा-** सह्याद्री आणि सातपुड्याच्या कुशीत विसावलेल्या मेळघाटातील निसर्ग जेवढा खडतर, तेवढीच इथल्या मातीतील निष्ठा गाढ आणि अथांग आहे. चिखलदरा तालुक्यातील अतिदुर्गम मानल्या जाणाऱ्या टेंब्रू गावामध्ये स्वातंत्र्यदिनी असाच एक अंतःकरणाला स्पर्शून जाणारा सोहळा पाहायला मिळाला. अंगावर कोसळणाऱ्या पावसाच्या धारांची तमा न बाळगता, अंगात देशभक्तीचा संचार झालेल्या चिमुकल्या पावलांनी अख्खे गाव राष्ट्रप्रेमाने भारून टाकले.जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेच्या वतीने आयोजित या अभिनव प्रभातफेरीने अवघ्या पंचक्रोशीचे काळीज जिंकून घेतले. या प्रभातफेरीचे मुख्य आकर्षण ठरली ती म्हणजे इयत्ता चौथीची विद्यार्थिनी संजनी रमेश कासदेकर.तिने साकारलेली साक्षात ‘भारत माते’ची मनमोहक वेशभूषा आणि तिच्या नेतृत्वात झालेले प्रभातफेरीचे शिस्तबद्ध संचलन पाहून उपस्थितांचे हात आपोआप जोडले गेले.‘भारत माता की जय’, ‘वंदे मातरम्’ आणि ‘जय जवान जय किसान’ या गगनभेदी घोषणांनी मेळघाटातील शांत दऱ्याखोऱ्या निनादून गेल्या.

प्रभातफेरीनंतर शाळेच्या प्रांगणात अत्यंत भावूक वातावरणात मुख्याध्यापक महेश ठाकरे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. तिरंग्याला दिलेली सलामी, त्यानंतर एका सुरात गायलेले राष्ट्रगीत, राज्यगीत आणि ध्वजगीताने उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले.अविस्मरणीय सोहळ्याला शाळेचे सहायक शिक्षक शिरीष मेहरे, ग्रामपंचायत सदस्य मुन्ना कासदेकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजू चिमोटे आणि शिक्षणप्रेमी सुरेश चिमोटे यांच्यासह माजी विद्यार्थी, पालक व संपूर्ण गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुविधांची वानवा असली तरी राष्ट्रप्रेमाची ज्योत कशी तळपत राहू शकते, याचे मूर्तिमंत उदाहरण टेंब्रूच्या या चिमुकल्यांनी संपूर्ण जगाला दाखवून दिले.

## बी.डी.एस. हायस्कूल



**चांदूर रेल्वे-** श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय चांदूर रेल्वे स्वातंत्र्य दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य डॉ.अतुल ठाकरे तर प्रमुख अतिथी म्हणून माजी मुख्याध्यापक अशोक मोटघरे, माजी कर्मचारी विलास ठाकरे, सुनील इंगळे, ज्येष्ठ शिक्षिका एस. बी. देशमुख, एस.डी. फुके, डी. डी. राठोड, पवन देशमुख उपस्थित होते.प्राचार्य डॉ. अतुल ठाकरे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर वंदे मातरम, राष्ट्रगीत व राज्य गीत घेण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी यावेळी देशभक्ती गीतावर सुंदर असे कवायत सादरीकरण केले व सामूहिक देशभक्ती गीत गाण्यात आले. त्यानंतर काही विद्यार्थ्यांची भाषणे व देशभक्ती गीतावर सांस्कृतिक नृत्य सादर केले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून यावेळी वर्ग ५ ते १२ मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.मुख्याध्यापक अतुल ठाकरे यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत स्वातंत्र्य दिनावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संचालक शारीरिक शिक्षक एस.टी. तायडे तर आभार संजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## महावितरणचा लोकाभिमुख योजनांचा जागर

**अमरावती-** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून महावितरणच्या अमरावती परिमंडळात विविध



लोककल्याणकारी योजनांचा जागर करण्यात आला. अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यातील शाळा, बाजारपेठ, गर्दीचे ठिकाण, ग्रामसभा, बाजार समित्या व व्यापारी संकुलांमध्ये १५० हून अधिक ठिकाणी महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी थेट नागरिकांशी संवाद साधून माहिती देण्यात आली.मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या मार्गदर्शनात आणि अधीक्षक अभियंते दिपक देवहाते आणि रूपेश टेंभुर्णे यांच्या पुढाकाराने आयोजित या मोहिमेदरम्यान ‘प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना’, ‘स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर योजना’, ‘मागेल त्याला सौर कृषिपंप योजना’, ‘मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनांची माहिती देण्यात आली.पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत ३ किलोवॅटपर्यंतच्या घरगुती रूफटॉप सोलर प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून कमाल ७८,००० रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध आहे. स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर योजनेअंतर्गत १ किलोवॅट क्षमतेची सौर यंत्रणा बसवल्यास घरगुती ग्राहकांना दरमहा १०० ते १२० युनिटपर्यंत मोफत वीज मिळण्यास मदत होते. या योजनेवर शासनाकडून मिळणाऱ्या घसघशीत सबसिडीमुळे ग्राहकांची वाढत्या वीजबिलातून कायमची सुटका होते, तसेच अतिरिक्त वीज महावितरणला विकून उत्पन्न मिळवण्याची संधीही प्राप्त होते.स्मार्ट योजनेत बीपीएल (आर्थिकदृष्ट्या दुर्बल) लाभार्थ्यांना केवळ २५०० रुपये भरावे लागणार आहे, तर उर्वरित ३०,००० रुपये केंद्र व १७,५०० रुपये राज्य शासनाचे अनुदान मिळणार आहे. अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५००० रुपये लाभार्थी हिस्सा भरावा लागणार आहे, तर ३०,००० रुपये केंद्र व १५,००० रुपये राज्य अनुदान मिळणार आहे, तर आर्थिकदृष्ट्या मागास सामान्य प्रवर्गातील लाभार्थ्यांना १०,००० रुपये भरावे लागणार असून ३०,००० रुपये केंद्र व १०,००० रुपये राज्य शासनाचे अनुदान मिळणार असल्याची माहिती यावेळी दिली.

## नवलाजी बाबा विद्यालय

**नांदगाव पेठ-** मंगरूळ येथील नवलाजी बाबा विद्यालयात भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन कार्यक्रम



उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक नितीन बोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. त्यानंतर देशभक्तीपर घोषणा देत राज्यगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. विद्यार्थ्यांची संगीत कवायत व प्रभात फेरीने कार्यक्रमात उत्साहाची भर पडली.तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष अशोकराव वानखेडे सह मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर ‘वंदे मातरम’ गीताने वातावरण देशभक्तीमय झाले. यानंतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. मंगरूळ येथील विवेकानंद वाचनालयाच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मंगरूळ येथील इयत्ता चौथीची विद्यार्थिनी कु. सृष्टी गुडधे तसेच नवलाजी बाबा विद्यालयातील शैक्षणिक सत्र २०२६ मधील शालांत परीक्षेत प्रथम आलेली कु. सोनाली रवींद्र वानखडे हिचा बक्षीस व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. स्व. आबासाहेब वानखेडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ‘शिक्षण गौरव पुरस्कार’ देऊन विद्यार्थ्याचा रोख एक हजार रुपये व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच नवलाजी बाबा विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक निकम सर यांच्या मातोश्रींच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यालयातून इंग्रजी विषयात प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे देण्यात आली. एका गरीब व होतकरू विद्यार्थ्याला शाळेचा गणवेश देऊन शैक्षणिक मदतीचा हात देण्यात आला.कार्यक्रमाला समस्त ग्रामवासी, पालकवर्ग, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. एन. इंगोले मॅडम यांनी केले.

## नारायण विद्यालय

**टाकरखेडा पूर्णा -** येथील नारायण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी



मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळा सल्लागार समितीचे अध्यक्ष मोहनभाऊ कराळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थित नागरिक व विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाशी एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा घेतली.यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी कोमल गायन व दिपाली गायन यांनी सुमधुर स्वरात देशभक्तीपर गीत सादर केले. इयत्ता सातवीच्या राजेश्वरी कैथवास, स्नेहल भोनखडे व हुमेरा फातिमा अब्दुल साजिक यांनी भाषणातून स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व विशद केले.टाकरखेडा पूर्णा येथील प्रतिष्ठित नागरिक तथा भारतीय राखीव पोलीस दलातून इन्स्पेक्टर पदावरून निवृत्त झालेले छोटेलालजी कैथवास यांनी इयत्ता दहावी व बारावीमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या साहिल खांडेकर व यश खांडेकर या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ हजार १ रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविले. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करून उज्ज्वल भवितव्य घडवावे, तसेच आई-वडील व शाळेचे नाव उज्ज्वल करावे, असा सल्ला त्यांनी दिला.दरम्यान, सैन्य दलातून नुकतेच निवृत्त झालेले व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी योगेश ढोणे यांनी देशभक्तीपर गीत सादर करणाऱ्या विद्यार्थिनींना प्रोत्साहनपर बक्षीस देऊन त्यांचा उत्साह वाढविला. प्राचार्य शरद नवले यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.संचालन प्रा. केशव वाटाणे यांनी केले, तर सहशिक्षक पंकज पवार यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

स्वातंत्र्य दिनी ग्रामपंचायतीला शितशवपेटी भेट

नांदगाव पेठ-स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून स्व. सौ. हिराबाई तुळशीरामजी गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत माहुली जहागीर ग्रामपंचायतीला शितशवपेटी भेट देण्यात आली.ट्रस्टचे अध्यक्ष तथा भाजपा ग्रामीण उपाध्यक्ष विवेक गुल्हाने (सावजी) यांच्या हस्ते ही शितशवपेटी ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करण्यात आली. यावेळी माहुली जहागीरच्या सरपंच प्रशासक सौ. प्रिती मनोज बुंदीले, माजी जि.प. सदस्या भारती गेडाम, ग्रामपंचायत अधिकारी सुबोध इंगळे, प्रशासक उपसरपंच अन्सारभाई , प्रशासकीय सदस्या छाया लायभर, मोनिका पिहुलकर, धनसुईकर ताई, स्वाती नाकाडे, देऊळकर ताई, माजी सरपंच ज्योती ठाकरे, शशीकांत खोब्रागडे, गजानन सकसुळे, हारूनभाई , चरण मेश्राम, संजय नागोने, मनोज यावले, बाळासाहेब पाचघरे, नितीन काळे, प्रविण वनवे, सुनील बिजवे, मधुकरराव जावरे, अनिल खंडारे, रफीकभाई मनोहरराव काळकर, महादेवराव अथिलकर, कमलेश काळकर, मंगेश पारवे, सौरभ शेगोकार, संदीप राऊत, संजोग गुल्हाने, प्रकाश ढोके, सौरभ जाधव यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बहुजन आघाडी



**अमरावती-** स्थानिक नवसारी येथील आई सावित्रीबाई फुले चौकात बहुजन आघाडी तर्फे स्वातंत्र्य दिन उत्साहात पार पडला. याप्रसंगी, ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष इंजि. सुभाष गोहत्रे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक प्रशांत महल्ले, ऋषिकेश देशमुख, ॲड. शिंदे सेनेच्या अचल कोल्हे, गजानन व्यवहारे, प्रकाश बनारसे, दिनेश जांभुळकर, गजानन मनोहरे, बंडू गायकवाड, पत्रकार संजय गायकवाड, दिनेश मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते.देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी बलिदान देणाऱ्या शूर विरांना सर्वानुमते श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी सुनील दाखोरे, सुभाष गायकवाड, धीरज सेवणे, गाडे गुरुजी, राजू सांगोळे, संतोष त्रिपाठी, भलावी, नरेंद्र आघाडे, अशोक खटाळे, केचे काका, प्रफुल इंगोले, किशोर परिहार, गणेश काटोलकर, सिद्धार्थ खांडेकर, अमोल तायडे, गणेश पारडे, साहेबाना गुघडे, अशोक दिंडोलकर तसेच बहुजन आघाडी व ऑटो युनियनचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# कौशल्य आत्मसात करा, रोजगार निश्चित मिळेल-किरण पातुरकर

### विद्यापीठात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/का.प्र.**

पूर्वीसारखी परिस्थिती आता राहिलेली नाही. त्यामुळेच केंद्र व राज्य शासनाने कौशल्य विकास, आत्मनिर्भर भारत यांसारख्या संकल्पनांना प्रत्यक्षात उतरवून विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करावे, रोजगार निश्चित मिळेल, असे आवाहन अमरावती इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष तथा अमरावती विभागीय रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष श्री किरण पातुरकर यांनी विद्यार्थ्यांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील स्वामी विवेकानंद भवन येथे आयोजित’पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे’ उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावतीचे उपायुक्त द.ल. ठाकरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावतीच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, अमरावती जिल्हा रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष भूषण काळमेघ, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

किरण पातुरकर म्हणाले, अमरावतीच्या तरुणांना अमरावतीतच रोजगार मिळाला पाहिजे. टेक्स्टाईल पार्क, आय.टी. पार्क येत्या काही वर्षात पूर्ण होईल, त्यामुळे स्थानिकांना त्यात मोठया प्रमाणात रोजगारही मिळेल. स्वयंसिध्दा च्या माध्यमातून आम्ही अनेकांना स्वत:च्या पायावर उभे केले आहे, असेही ते म्हणाले. याप्रसंगी विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी आलेल्या



संधीचा लाभ घ्या, कौशल्य आत्मसात करा, असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. विद्यापीठाचे इन्क्युबेशन सेंटर देखील तुमच्या मदतीला आहे, त्याचा लाभ घ्या, असे सांगून त्यांनी विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास विभागाचे आयोजनासाठी अभिनंदन केले. संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकेतून श्री द.ल. ठाकरे यांनी रोजगार मेळावामागील भूमिका स्पष्ट केली. याप्रसंगी रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी झालेल्या उद्योजकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मुलाखतीनंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ऑफर लेटर प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन श्री बाबासाहेब मुगले यांनी, तर आभार विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी मानले. विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

# बाल संरक्षणासाठी ग्राम बाल संरक्षण समितीचे यशस्वी पाऊल

**अमरावती/का.प्र.**

येथील महिला व बालविकास विभागातील जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्यामार्फत चांदूर बाजार तालुक्यातील बेलोरा गावातील अंगणवाडी सेविकांना विविध सामाजिक विषयांवर मार्गदर्शन करण्याकरिता ग्राम बाल संरक्षण समितीच्या बैठकीचे आयोजन ग्रामपंचायत कार्यालय, बेलोरा येथे करण्यात आले होते. बैठकीला गावातील अंगणवाडी सेविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्राम बाल संरक्षण समितीच्या बैठकीचे आयोजन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय गट, जिल्हा बाल संरक्षण कक्ष प्रमुख श्री. अजय डबले यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. बैठकीला गावाचे सरपंच भैय्यासाहेब कडू उपस्थित होते.



बेलोरा येथे बैठक; अंगणवाडी सेविक व गावकरी उपस्थित

बैठकीला गावातील अंगणवाडी सेविकांना बालहक्क, बाल संरक्षण, बालविवाह प्रतिबंध, बालमजुरी, बाल लैंगिक अत्याचारापासून संरक्षण, बालकांच्या सुरक्षिततेसाठी शासनाच्या विविध योजना तसेच समाजातील बाल संरक्षणाबाबत जागरुकता निर्माण करण्यासंबंधी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ग्रामस्तरावर बालकांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे व्हावे, यासाठी ग्राम बाल संरक्षण समितीची भूमिका आणि जबाबदाऱ्या याविषयीही माहिती देण्यात आली. बालसंरक्षणा साठी ग्राम बाल संरक्षण समितीचे ग्रामस्तरावर यशस्वी पाऊल असल्याचे महिला व बालविकास विभागाच्या सामाजिक कार्यकर्ता मनिषा फुलाडी यांनी सांगितले, उपस्थित अंगणवाडी सेविकांनी प्रश्न विचारुन शंकांचे निराकरण केले.

बैठकीला अंगणवाडी सेविका विमलताई बोरकुटे, रजनी भोजने, करुणा सोनोने, सुलभा डमके, लता वानखडे, शिला उके, सोनाली वाठ यांच्यासह किशोरवयीन मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. बैठकीच्या यशस्वीतेकरिता अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका व मदतनिस यांनी परिश्रम घेतले.

# वाडी-वस्तीवरील एकही शाळा बंद होणार नाही

### राज्यव्यापी आंदोलनाचा निर्णय

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांतील वाडी-वस्तीवरील एकही शाळा बंद होऊ नये, केजी ते पीजीपर्यंत गुणवत्तापूर्ण व सर्वांना समान शिक्षण मिळावे, तसेच राष्ट्रीय उत्पन्नाच्या दहा टक्के निधी शिक्षणावर खर्च करावा, या प्रमुख मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलन उभारण्याचा निर्णय पुणे येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीस महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून १५० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीचे निमंत्रक कॉ. संपत देसाई यांनी भूमिका मांडताना सांगितले की, राज्यातील



खेड्यापाड्यांतील वाडी-वस्तीवरील शाळा बंद होत आहेत.

अशा परिस्थितीत जनरेशन झेड आणि जनरेशन अल्फा रस्त्यावर उतरत असताना त्यांच्या पाठीशी उभे राहून व्यापक आंदोलन उभारणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.यावेळी रमेश बिजेकर, शरद जावडेकर यांनीही आपली भूमिका मांडली. तसेच गौतमीपुत्र कांबळे, सुधाकर सावंत, नंदकुमार होळकर, उमेश देसाई, प्रसाद पाटील, महेश पेडणेकर, सोमनाथ निर्मळ, वैभव चोपकर, अविनाश घुले, सुजित गेडाम, सतीश लोंढे, सिरत सातपुते, संजय मंगो, रजिया पटेल, नंदा कांबळे, संदीप बर्वे, प्रसाद म्हात्रे, सुभाष वारे, मंगेश भुताडे आणि मधु परांजपे यांनी महत्त्वाच्या सूचना मांडल्या.

बैठकीस प्राथमिक शिक्षक समिती, शिक्षक भारती, सत्यशोधक शिक्षक सभा, पुरोगामी शिक्षक संघटना, सत्यशोधक विद्यार्थी संघटना, छात्र भारती, एसएफआय, एआयएसएफ?, एएनयूआय, समाजवादी अध्यापक सभा, बघतो, मराठी अभ्यास केंद्र, फुले-आंबेडकर टीचर्स असोसिएशन, स्त्रीमुक्ती संघटना, बहुजन विकास आघाडी यांसह विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भारतातील शेअर बाजारात सक्रिय असणाऱ्या

# मध्यम-निम्न मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांसाठी...

**वॉ**ल स्ट्रीटवर जर एवढा चिखल असेल तर दलाल स्ट्रीटवर दलदल का असते ते समजू शकते! बरोबर दोन महिन्यापूर्वी एलोन मस्क यांच्या स्पेस क्स Spacex कंपनीचा आयपीओ झाला.आयपीओ येण्याआधी एक प्रचंड हाइप तयार केली गेली.शेयरची किंमत भविष्यात प्रचंड वाढणार आहे. बस चुकवू नका.त्यामुळे आयपीओला प्रचंड प्रतिसाद देखील मिळाला.

तो १३५ डॉलर प्रति शेयर किमतीचा होता. त्यात ८६ बिलियन डॉलर्स कंपनीने उभे केले.जगभरातील एक ऐतिहासिक उच्चांक.त्याचे लिस्टिंग होऊन त्या शेयरची किंमत पहिल्या काही दिवसात २२५ डॉलर्स प्रति शेयरवर पोचली होती. गेल्या दोन महिन्यात त्यात प्रचंड चढ-उतार झाले आहेत.काही दिवसांपूर्वी तो १०५ डॉलरच्या निच्चांकावर,म्हणजे आयपीओच्या निम्म्या पेक्षा कमी,जाऊन आता तो थोडा वधारून इश्यू प्राईसच्या जवळ आला आहे.

या सगळ्या प्रक्रियेत,जी भविष्यात अजून उलगडत जाणार आहे,वॉल स्ट्रीटवर किती प्रकारचे मॅन्युप्युलेशन चालते याच्या बातम्या बरीच अंतरदृष्टी देतात.गुंतवणूकदार बँका, ब्रोकरेज हाउसेस विविध कंपन्यांच्या शेयरबद्दल काही संशोधन अहवाल/ इक्विटी रिसर्च रिपोर्ट मधून गुंतवणूकदारांसाठी शिफारशी करतात.

स्पेस एक्स आयपीओ लॉन्च होताना वॉल स्ट्रीट वरील ३२ इक्विटी अर्नॅलिस्टनी कंपनीचा शेयर भविष्यात खूप वाढणार अशा शिफारसी केल्या. या अर्नॅलिस्ट पैकी बहुसंख्य कोणत्या ना कोणत्या गुंतवणूक बँकेशी निगडित होते.आणि या इन्व्हेस्टमेंट बँकांपैकी अनेक बँका स्पेस एक्सच्या आयपीओशी संबंधित होत्या.उदा अंडररायटर.यशस्वी आयपीओ नंतर त्यांना भरघोस फिया मिळाल्या. दुसऱ्या शब्दात स्पेसक्स चा शेयर गुंतवणूकदारांना शिफारस करण्यात त्यांचे उघड उघड कॉन्फ्लिक्ट ऑफ इंटरेस्ट होते.



हेच २००२ मध्ये डॉट कॉम कंपन्यांच्या बाबतीत घडले होते. अमेरिकेतील इन्व्हेस्टमेंट बँकांच्या इक्विटी रिसर्च शिफारशीमुळे अवास्तव किमतीचे डॉट कॉम कंपन्यांचे आयपीओ तुफान यशस्वी झाले होते. इन्व्हेस्टमेंट बँकांनी प्रचंड कमिशन कमावले आणि दोन वर्षात डॉट कॉम बबल फुटला होता. नॅसडॅक निर्देशांक ८० टक्क्यांनी खाली आला होता. आणि जगातील अनेक शेयर बाजार देखील!

स्पेक्सक्स थोडावेळ बाजूला ठेवूया. आर्टिफिशियल इंटीलिजन्स कंपन्यांचे शेयर्स गेल्या दोन वर्षात प्रचंड वाढले आहेत. याच प्रकारच्या शिफारशींमुळे. त्यांचा फुगा फुटेल का याच्या चर्चा सतत घडत आहेत.वित्त भांडवलशाहीच्या मक्केत अमेरिकेत सिस्टीम कशी मन्युपयुलेट केली जाते ते Space X च्या निमित्ताने दिसते. दोन प्रसंग पहिला, डॉट कॉम बबल नंतर अमेरिकन भांडवल बाजार नियामक मंडळाने SEC इन्व्हेस्टमेंट बँकांना आपल्या इक्विटी रिसर्च विंग वेगळ्या करण्याला भाग पाडले होते. वीस वर्षेनंतर तो नियम SEC ने स्पेस क्स चा आयपीओ येण्याच्या आधी सात महिने रद्द केला होता.

दुसरा, नॅसडॅक निर्देशांक १०० आघाडीच्या टेक कंपन्यांच्या शेयर वर आधारित आहे. त्या १००मध्ये समावेश होण्यासाठी काही निकष असतात. उदा कंपनीचा शेयर किमान तीन महिने ट्रेड झाला पाहिजे.पब्लिक फ्लोट किमान १० टक्के हवा इत्यादी. हे दोन्ही निकष स्पेस क्स पूर्तता करत नसताना नॅसडॅकच्या व्यवस्थापन समितीने ते नियम शिथिल करून स्पेस एक्सला त्या १०० शेयर मध्ये प्रवेश दिला.

(आकडेवारी , माहिती संदर्भ स्कॉट गॅलोवे )

हे सारे जागतिक भांडवल बाजाराच्या मक्केत. जेथे सर्वोच्च प्रोफेशनॅलिझम, पारदर्शकता, रेग्युलेशन आहे अशी जाहिरात केली जाते.कदाचित वाचकांना अमेरिकेतील वॉल स्ट्रीट वरील घडामोडींशी रिलेट करायला कठीण जाईल. पण यातून दलाल स्ट्रीटवर काय घडते,एकूणच सिस्टीम कशी चालते याची मिळणारी अंतर्दृष्टी आपल्याला उपयुक्त आहे.

पहिला भारतासकट अनेक देशांचा शेयर बाजार वॉल स्ट्रीट वरील सूर्याप्रमाणे उगवतो मावळतो. उदा. एआय शेअर्सचे उद्या काही कमी जास्त झाले तर त्याचा अपरिहार्य परिणाम भारतातील शेयर मार्केटवर होणार आहे. दुसरा मुद्दा. विविध कंपन्यांच्या शेयरच्या खरेदी विक्री संबंधात विशेषतः सर्वच प्रकारच्या मीडियावर महापूर आलेला आहे. त्यांना वित्तीय सल्लागार/Financial Influencer ( Fin-fluencer) वगैरे म्हणतात. त्यांना फॉलो करणारे लाखो गुंतवणूकदार आहेत. ही मंडळी कोण आहेत. शिफारशी करताना त्यांचे काय हितसंबंध आहेतष्ठ. आपल्याला काही माहिती नसते. त्यांच्यावर आंधळा विश्वास ठेवू नका. हा भ्रष्टाचार नाही का?खचितच आहे. पण तो आपल्या खोकी पेट्यांच्या परिभाषेच्या चिमटीत येणारा नाही. मूळात भांडवल बाजार एक मयसभा आहे.जेथे दिसते तसे नसते. म्हणून जरा जपून. गुंतवणूक करूच नका असे नाही. पण चौकस राहा. फेसव्हॅल्यू वर गोष्टी घेऊ नका.

पडद्यामागे नक्की काय चालते हे सामान्य गुंतवणूकदारांना कधीच कळणारे नसते. Information Asymmetry नेहमी राहणार आहे..त्यामुळे आपण किती तोटा सहन करू शकतो हे ठरवा. त्या बेताने गुंतवणूक करा. स्वतःच्या कष्टाच्या बचतीच्या सुरक्षिततेची जबाबदारी आपण स्वतः नाही घेणार तर कोण घेणार? नसू घेत तर दोष आपला आहे.

**-संजीव चांदोरकर**

## त-ड-का

### कामगार चौक..!

हातावर पोट
असणा-यांना कामगार
नाका हे आशास्थान जेथे
कामगार व सेवायोजक
गरजेनुसार वाटाघाटीतून
करती सेवेचे आदान
प्रदान ..!

शहरामध्ये कामगार
चौक संकल्पना आली
अस्तित्वात प्रातः काळी
उभय पक्ष अटीनुसार
मजूरीदर ठरतात...

असंघटीत
कामगारांची
स्थिती आहे विदारक
काम मिळाले तर
दाम मिळते नाहीतर
दिवस जाई निरर्थक...

अकुशल अर्धकुशल
श्रमिकांचे प्रमाण
दिसते जास्त सौदाशक्ति
कमी असल्याने शाश्वती
नसते मजुरी मिळेल
रास्त..!



**प्रा. अशोक सारडा, मेहकर**
मो.९४२१३९४३३९

### खगोलशास्त्र व ज्योतिष्यशास्त्र दृष्टीकोनातून

# गुरु ग्रहाचे महत्त्व आणि स्वरुप

**वै**ज्ञानिक आणि ज्योतिष्यशास्त्र विश्लेषणातून जर गुरु ग्रहाचा अभ्यास करायचा असेल तर तो दोन प्रकारे करावा लागतो. एक म्हणजे अवकाश पोकळीत गुरु ग्रहाचे पृथ्वी, सुर्य व इतर ग्रहासोबतचे भ्रमण अभ्यासल्या जाते. दुसरे म्हणजे प्रत्येक मनुष्याच्या जन्मकुंडलीत, नवमांश व इतर सर्व प्रकारच्या कुंडल्यांमध्ये गुरु ग्रहाचे स्थान किंवा कोणत्या स्थानात व कोणत्या राशीमध्ये गुरु हा ग्रह स्थित आहे? या सर्व अनुमानानुसार गुरु ग्रहाच्या फलीताचे विवेचन व निष्कर्ष सांख्यिकीय पध्दतीने विशद केले जातात.

ज्योतिष्यशास्त्रात ग्रहांची गोचर स्थिती असा शब्दप्रयोग केल्या जातो हा शब्द खगोलशास्त्राशी सुध्दा संबंधित आहे. गोचर म्हणजे ग्रहांचे भ्रमण होय. गोचर स्थिती ज्योतिष्यशास्त्रात व खगोलशास्त्रातही अत्यंत महत्वाची आहे ज्यावरुन वस्तुनिष्ठ स्थिती विशद होते.गुरु हा नैसर्गिक शुभ व सात्विक ग्रह आहे. त्याला नवग्रहामध्ये देवगुरुचे स्थान आहे. आपण ज्योतिष्यशास्त्र व जन्मकुंडलीच्या अंगाने गुरु ग्रहाचे महत्त्व बघूया! हा ग्रह ज्ञान, धर्म, भाग्य, संतती, विवाह या अंगाने आपली दिशा व कार्यपध्दती स्पष्ट करतो. या ग्रहाचा पुरस्कृत रंग पिवळा, सोनेरी आहे. दिशा ईशान्य. या ग्रहाचे रत्न पुखराज आहे. गुरु ग्रहाचे मित्र रवि, चंद्र, मंगळ आहे. शत्रू ग्रह शुक्र व बुध तर सम ग्रह शनी, राहू, केतू आहेत.

कुंडलीच्या योगाने हा ग्रह मनुष्य जीवनावर खूप मोठा प्रभाव पाडतो.प्रत्येक मनुष्याच्या जीवनात सर्व ग्रहांच्या महादशा, अंतर्दशा येत असतात. त्यात गुरुची महादशा अत्यंत शुभ मानली जाते. या महादशेचा कार्यकाळ सोळा वर्षाचा असतो. भाग्यवर्धनाच्या दृष्टीकोनातून या महादशेला बघितले जाते. विशेष म्हणजे गुरुचे शुभाशुभत्व गुरु कोणत्या राशीत आहे तो उच्च आहे की निच आहे, कमजोर आहे की बलवान आहे, स्वराशीत आहे की शत्रू राशीत आहे यावरुन त्याचे फलदायित्व व कारकत्व सिध्द होते.

गुरुबद्दल विशेषत्वाने सांगायचे झाल्यास मनुष्याच्या जन्मकुंडलीत गुरु कर्क राशीत उच्च असतो, मकर राशीत निच तर धनु आणि मीन ह्या राशीत तो स्वराशीचा असतो. आकाशतत्वाचा हा ग्रह ज्ञान, विस्तार व धर्माचे प्रतिक आहे. गुरु हा जन्म कुंडलीच्या सप्तम आणि नवम स्थानात विशेष भूमिका निभावतो. सप्तम हे स्थान विवाह व व्यापाराचे आहे तर नवम स्थान हे भाग्य स्थान आहे.परंतू गुरु जरी शुभ असला तरी जर तो राहू सोबत असेल तर गुरु-राहू चांडाल योग निर्माण होतो जो अशुभ फल देणारा आहे. गुरु हा जन्म कुंडलीच्या बारा स्थानातील सहा, आठ, बारा या त्रिक स्थानात अशुभ तर एक, दोन, तीन, चार, पाच, सात, नऊ, दहा, अकरा या स्थानात शुभ असतो. महत्वाची गोष्ट लक्षात घेण्यासारखी म्हणजे जन्मकुंडलीत गुरु ग्रह बलवान, स्वराशीत किंवा उच्च असला तरच गुरु महादशेत त्याचे फल शुभत्वाचे सिध्द होते आणि गुरु हा ग्रह जरी शुभ व आध्यात्मिक असला तरी जर कुंडलीत गुरु निचेचा, कमजोर असेल तर त्याच्या महादशेत शुभ फल मिळवण्यात कसर राहते.

गुरुच्या अमृत, भाग्यवृध्दी



व अधिकार प्रदान करणा-या ५,७,९ या तीन दृष्ट्या आहेत. कुंडलीत गजकेसरी योग हा केवळ आणि केवळ गुरु आणि चंद्राच्या उपस्थिती होतो. जन्मकुंडलीत १,४,७,१० हि केंद्र स्थाने आहेत. या स्थानामध्ये गुरू चंद्र एकाच घरात असतील(युती) किंवा पहिल्या घरात चंद्र व सातव्या घरात गुरू (प्रतियुती), चवथ्या घरात चंद्र व दहाव्या घरात गुरु (केंद्र दृष्टी) असेल तर गजकेसरी योग होतो. यातील पहिला योग म्हणजे प्रत्यक्ष युती असेल तर अतिशय बलवान गजकेसरी योग होतो. मात्र कुंडलीतील चंद्र हा क्षिण नसावा. गजकेसरी योगामुळे सामाजिक प्रतिष्ठा, स्थिर लक्ष्मी, विद्वत्ता, उत्तम संतती, यासह अन्य भौतिक सुखाचा लाभ मिळतो.स्थानपरत्वे गुरु कसा असतो तर जन्मकुंडलीच्या पहिल्या स्थानात गुरु व्यक्तीला धार्मिक, ज्ञानी बनवतो. प्रसन्न मुद्रा व चेह-यावर कांती प्रदान करतो. या स्थानातील गुरुची पाचवी अमृतदृष्टी विद्या व संतती स्थानावर, सातवी भाग्यदृष्टी विवाह स्थानावर व नववी अधिकार दृष्टी भाग्य स्थानावर पडते.

दुस-या स्थानातील गुरु उत्तम वक्तृत्व व धन प्राप्ती, तिस-या स्थानातील गुरु भावंडामध्ये प्रेम, सलोखा व सात्विक बुध्दीसंगत पराक्रम देतो. चतुर्थ स्थानातील गुरु वास्तू, वाहन, मातेचे सुख व मनःशांती प्रदान करतो. पंचम स्थानात गुरु उत्तम विद्या, संतान सुख, प्रेमभावना प्रदान करतो. सहाव्या स्थानातील गुरु नोकरीत यश, शत्रूवर मात करण्याची तसेच घेतलेले कर्ज फेडण्यासाठीच अनुकूल परिस्थिती निर्माण करुन देतो. सातव्या स्थानात गुरु उत्तम, सत्शील व भक्तीमार्ग अनुसरण करणारी पत्नी व वैवाहीक सुख, व्यापार असेल तर व्यापा-यात धनवृध्दी देतो. आठव्या स्थानातील गुरु दीर्घायुष्य, सासरकडून लाभ व अचानक धन देतो. नवव्या स्थानात तो भाग्यवृध्दी करतो. दहावे स्थान कर्मस्थान आहे यात तो नोकरीत किंवा व्यवसायात मोठे पद, प्रतिष्ठा, प्रमोशन, उच्चपद याचा लाभ देतो, अकराव्या स्थानात धनवान मित्र, इच्छापूर्ती व धनप्राप्ती देतो. बारावे स्थान मोक्षाचे आहे यात तो तुम्हाला धार्मिक यात्रा लाभ, विदेश वास्तव्य किंवा विदेशवारीचे लाभ देतो.



**डॉ नंदकिशोर कांडलकर**
ज्योतिषाचार्य
अमरावती
मो. ९९७५७६७९४५

### लिव्ह-इन रिलेशनशिप विवाहसंस्थेला पर्याय ठरू शकत नाही

बदलत्या जीवनशैलीबरोबर नातेसंबंधांचे स्वरूपही बदलत आहे. शहरांमध्ये काही तरुण-तरुणी विवाह न करता एकत्र राहण्याचा अर्थात 'लिव्ह-इन रिलेशनशिप'चा पर्याय स्वीकारताना दिसतात. परस्परांची समज, स्वभाव आणि सुसंवाद तपासण्यासाठी हा पर्याय निवडला जात असल्याचे सांगितले जाते. मात्र लिव्ह-इन रिलेशनशिपला विवाहसंस्थेचा पर्याय मानणे योग्य ठरेल का, हा सामाजिक आणि कौटुंबिक पातळीवर विचार करण्याचा विषय आहे.भारतीय कायद्यात लिव्ह-इन रिलेशनशिपला सरसकट गुन्हा ठरवलेले नाही. मात्र प्रत्येक लिव्ह-इन नात्याला विवाहाचा दर्जा किंवा विवाहातील सर्व कायदेशीर अधिकार आपोआप मिळत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने काही विशिष्ट परिस्थितीत 'विवाहाच्या स्वरूपातील संबंध' मानल्या जाणाऱ्या नात्यांना घरगुती हिंसाचारापासून संरक्षणाच्या कायद्यानुसार संरक्षण मिळू शकते, असे स्पष्ट केले आहे. त्यासाठी नात्याचा कालावधी, सामायिक घर, कौटुंबिक व्यवस्था, आर्थिक व्यवहार आणि दोघांचा नात्याबाबतचा हेतू अशा विविध बाबींचा विचार केला जातो.

**श्याम ठाणेदार**

### साखर आणि गूळ खरंच 'शुगर फ्री'असते?



'आमचे लाडू १००% शुगर फ्री आहेत, कारण आम्ही साखरेऐवजी गूळ वापरला आहे' अशी एक जाहिरात बघितली. अशा अनेक 'शुगर फ्री' पदार्थांच्या जाहिराती सध्या बघत असतो. आणि शुगर फ्री म्हणून साखरेऐवजी गूळ वापरला आहे असे वाचतो तेंव्हा मी पोट धरून हसतो.

आधुनिक जगानी आणि मॉडर्न मेडिसिननी साखरेला (म्हणजे refined sugar ला) व्हिलन करून ठेवले आहे. Refined sugar च्या अतीसेवनाने वजन वाढते, डायबेटीस बळावतो. त्याचे शरीरावर भयावह दुष्परिणाम होतात. हे सारे आता common knowledge झाले आहे. हे सगळ्यांना माहित झाले आहे. आणि ह्यात संशोधनाच्या आधारावर सिद्ध झालेले तथ्यही आहे.

मग लोक साखरेला पर्याय शोधायला जातात. त्याला गूळ हा पर्याय शोधतात. मग साखरेच्या लाडवाऐवजी गुळाचा लाडू. साखरेच्या शिऱ्याऐवजी गुळाचा शिरा. साखरेच्या पाकाऐवजी गुळाचा पाक इत्यादी! साखर नावाच्या व्हिलनला कटाप करून तिथे गूळ (त्यातही सेंद्रीय, विना केमिकलवाला गूळ) वगैरे घेतला की आपल्याला बरे वाटते. साखरेवर आपण मात केली असे वाटते.

पण थांबा, साखर आणि गूळ ह्यांच्यात तत्त्वतः फारसा काहीही फरक नसतो! साखर ही उसाची कन्या तर गूळ हा उसाचा मुलगा असतो.उसाचा रस खळाखळा आटवला की गूळ तयार होतो आणि उसाच्या रसावर कारखान्यात प्रोसेसिंग केले की साखर तयार होते. दोन्ही उसाचीच अपत्ये. साखरेत सुक्रोज ९९.९ टक्के असते आणि गुळात ते ६५ ते ८५ टक्के असते. गुळात लोह वगैरे इतर गोष्टीही असतात, पण त्याची स्वीट डिश केल्यावर त्या कितपत उरतात हा प्रश्नच आहे. दोन्हीत साधारण एकसारखेच गुण (आणि दोष) असतात!

माझा एक डॉक्टर मित्र तर म्हणतो की 'ब्युटी पार्लरमध्ये जाऊन आलेला गूळ म्हणजे साखर'! इतके हे दोघे समानधर्मी आहेत.तर, तुम्ही मधुमेह, वजनवाढ किंवा इतर कोणत्याही अत्यंत महत्त्वाच्या आरोग्याच्या कारणाने 'शुगर फ्री' असे काही खाऊ बघत असाल तर,साखरेला पर्याय म्हणून 'गुळाचे' पदार्थ खाऊन स्वतःची फसवणूक करू नका. साखरेला दोडकी बहीण बनवून, गुळाला लाडका भाऊ बनवू नका.

साखर-गूळ ही दोन्ही बहीण-भावंडे एकसारखीच घातक असतात. तेंव्हा, 'शुगर फ्री' म्हणून साखरे ऐवजी साखरेचा ब्यूटी पार्लरमध्ये न गेलेला भाऊ गूळ वापरून तयार केलेले पदार्थ खात असाल तर पुन्हा एकदा विचार करा!

शेवटी, आपले आरोग्य, आपली जबाबदारी!

**-प्रसाद शिरगावकर**



# लग्नाआधीची गुप्त चौकशी

**महानगरांसह मध्यम शहरांमध्येही प्री-मॅरिटल इन्व्हेस्टिगेशन' हा स्वतंत्र व्यवसाय म्हणून पुढे येत आहे. लग्नानंतर होणारी फसवणूक, खोटी माहिती,आर्थिक गैरव्यवहार, व्यसनाधीनता किंवा पूर्वीचे वैवाहिक संबंध लपविल्याच्या घटनांनी अनेकांना सावध केले आहे.**

'**मु**लगा नेमका कुठे काम करतो?','त्याचा पगार खरंच एवढाच आहे का?', 'त्या-तिचे आधी काही रिलेशनशिप होते-आहेत का?','दारूचे व्यसन आहे का' असे प्रश्न आजकाल अनेक घरांमध्ये सहज ऐकायला मिळतात.एकेकाळी या प्रश्नांची उत्तरे नातेवाईक, ओळखीचे लोक किंवा गावातील विश्वासू व्यक्ती शोधून देत असत; पण आता काळ बदलला आहे.नातेसंबंधांचे स्वरूप बदलले, विवाहाची माध्यमे बदलली आणि त्याचबरोबर विश्वास ठेवण्याची पद्धतही बदलली.त्यामुळे अनेक कुटुंबे लग्न ठरण्यापूर्वी खासगी गुप्तहेरांच्या माध्यमातून वधू किंवा वराची गुप्तपणे चौकशी करून घेत आहेत.

काही वर्षांपूर्वी हा प्रकार फारसा ऐकिवात नव्हता; पण आज महानगरांसह मध्यम शहरांमध्येही 'प्री-मॅरिटल इन्व्हेस्टिगेशन' हा स्वतंत्र व्यवसाय म्हणून पुढे येत आहे. लग्नानंतर होणारी फसवणूक,खोटी माहिती,आर्थिक गैरव्यवहार, व्यसनाधीनता किंवा पूर्वीचे वैवाहिक संबंध लपविल्याच्या घटनांनी अनेकांना सावध केले आहे.

**चौकशीची गरज का वाटू लागली?**

आज विवाह जुळवण्याची प्रक्रिया पूर्वीपेक्षा खूप बदलली आहे. नोकरीच्या निमित्ताने मुलं-मुली वेगवेगळ्या शहरांत, राज्यांत किंवा परदेशात असतात. अनेक विवाह मॅट्रिमोनियल वेबसाईटस्, सोशल मीडिया किंवा मोबाईल ॲपच्या माध्यमातून जुळतात. अशावेळी समोरच्या व्यक्तीबद्दल प्रत्यक्ष माहिती मिळवणे सहज शक्य होत नाही. याचाच गैरफायदा घेऊन काहीजण शिक्षण, पगार, नोकरी, मालमत्ता किंवा वैवाहिक स्थितीबाबत चुकीची माहिती देतात. काही प्रकरणांमध्ये आधीचे लग्न, घटस्फोट, मोठे कर्ज किंवा व्यसनाधीनता लपविली जाते. अशा घटना समोर आल्यानंतर अनेक कुटुंबांनी आधी पडताळणी, मगच निर्णय हे धोरण स्वीकारले आहे.

**पूर्वीही चौकशी होत होती; पण पद्धत वेगळी**

पूर्वी मुलाच्या गावात चौकशी करणे, शेजाऱ्यांना विचारणे, नातेवाईकांकडून माहिती घेणे हीच पडताळणीची पद्धत होती. गावातील एखादी विश्वासू व्यक्ती दोन दिवसांत बरीच माहिती मिळवून आणायची. आज स्थिती वेगळी आहे. नोकरी एका शहरात, कुटुंब दुसऱ्या शहरात आणि शिक्षण तिसऱ्या राज्यात असे चित्र दिसते. त्यामुळे पारंपरिक चौकशी पुरेशी ठरत नाही. ही जागा आता खासगी गुप्तहेरांनी घेतली आहे.

**गुप्तहेर नेमके काय तपासतात?**

प्री-मॅरिटल चौकशीमध्ये सामान्यतः काही मुद्द्यांवर भर दिला जातो. दिलेली नोकरी आणि कंपनी खरी आहे का? शैक्षणिक पात्रता योग्य आहे का? आर्थिक स्थिती किंवा मोठी कर्जे आहेत का? पूर्वीचे लग्न, घटस्फोट किंवा इतर संबंध लपविले आहेत का? व्यसनाधीनता किंवा संशयास्पद सवयी आहेत का? कुटुंबाची पार्श्वभूमी आणि सामाजिक वर्तन कसे आहे? घर स्वतःचेच आहे का?अनेक संस्था संबंधित व्यक्तीच्या परिसरात जाऊन शेजाऱ्यांशी बोलतात, कार्यालयाजवळ चौकशी करतात आणि उपलब्ध सार्वजनिक माहितीची पडताळणी करतात; मात्र ही चौकशी कायदेशीर मर्यादेतच असणे आवश्यक आहे. खासगी आयुष्यात बेकायदेशीर हस्तक्षेप करणे किंवा फोन, संदेश हॅक करणे कायद्याने गुन्हा ठरू शकतो.

**सोशल मीडियामुळे संशय वाढला**

आज प्रत्येकजण सोशल मीडियावर आपली एक वेगळी प्रतिमा तयार करत असतो. महागड्या गाड्या, परदेश दौरे, आलिशान जीवनशैली दाखवणारी छायाचित्रे पाहून समोरच्या व्यक्तीबद्दल एक ठरावीक मत तयार होते; पण प्रत्यक्ष वास्तव अनेकदा वेगळे असते.काही जण बनावट प्रोफाईल तयार करतात, नोकरीबद्दल चुकीची माहिती देतात किंवा स्वतःला वेगळ्या स्वरूपात सादर करतात. त्यामुळे सोशल मीडियावर दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवण्याऐवजी प्रत्यक्ष पडताळणी करण्याकडे कल वाढला आहे.महिलाच नाहीत, पुरुषही चौकशीच्या कक्षेत पूर्वी अशी चौकशी प्रामुख्याने मुलाबद्दल केली जात असल्याची धारणा होती; पण आता परिस्थिती बदलत आहे. मुलीच्या शिक्षणापासून नोकरीपर्यंत, तसेच तिच्या सांगितलेल्या माहितीत तथ्य आहे का, याचीही पडताळणी केली जाते. म्हणजेच ही चौकशी केवळ एका बाजूची राहिलेली नाही. दोन्ही कुटुंबे स्वतःची खात्री करून घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

**हा व्यवसायही वाढतो आहे**

विवाहपूर्व चौकशीची मागणी वाढल्यामुळे अनेक खासगी गुप्तहेर संस्थांनी ही सेवा स्वतंत्रपणे सुरू केली आहे. काही संस्थांच्या मते त्यांच्या एकूण कामांपैकी लक्षणीय हिस्सा आता विवाहपूर्व चौकशीचा असतो. या सेवेसाठी काही हजार रुपयांपासून ते मोठ्या रकमांपर्यंत शुल्क आकारले जाते. चौकशीचे स्वरूप, शहर, प्रवास आणि माहितीची व्याप्ती यावर खर्च अवलंबून असतो. यामुळे हा व्यवसाय अधिक संघटित स्वरूपात विकसित होत असल्याचे चित्र दिसते; मात्र या क्षेत्रातही कोणतीही एकसमान नियामक व्यवस्था नसल्याने ग्राहकांनी संस्था निवडताना काळजी घेणे आवश्यक आहे.

**चौकशीने फसवणूक टळतेच असे नाही**

खासगी चौकशी हा अंतिम उपाय नाही; कारण अनेक गोष्टी व्यक्तीच्या स्वभावाशी आणि भविष्यातील वर्तनाशी संबंधित असतात. चौकशीत उपलब्ध माहिती खरी असली, तरी भविष्यात परिस्थिती बदलू शकते. म्हणूनच केवळ गुप्तहेरांच्या अहवालावर अवलंबून राहणे योग्य ठरत नाही. दोन्ही कुटुंबांतील मोकळा संवाद,प्रत्यक्ष भेटी, अपेक्षांवर चर्चा आणि आवश्यक ते प्रश्न स्पष्टपणे विचारणे तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक नात्याचा पाया विश्वासावर उभा असतो;पण विश्वास म्हणजे डोळे झाकून स्वीकार करणे नव्हे. त्याचवेळी प्रत्येक गोष्ट संशयाच्या नजरेतून पाहिली, तर नात्याची सुरुवातच अविश्वासाने होते.आजचा समाज या दोन टोकांमध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न करत आहे. पडताळणीची गरज मान्य करतानाच समोरच्या व्यक्तीच्या गोपनीयतेचाही आदर राखणे आवश्यक आहे.प्री मॅरिटल इन्व्हेस्टिगेशन हा केवळ नवीन ट्रेंड नाही, तर बदलत्या सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब आहे. वाढत्या फसवणुकीच्या घटना, बदललेली जीवनशैली, ऑनलाईन विवाह, शहरांमधील अंतर आणि माहितीची सहज पडताळणी न होणे या सगळ्यामुळे हा पर्याय अनेकांना सुरक्षित वाटत आहे; मात्र प्रत्येक विवाह संशयाच्या पायावर उभा राहू नये.चौकशीचा उद्देश व्यक्तीची बदनामी करणे नसून चुकीची माहिती टाळणे असा असायला हवा. विश्वास, संवाद, पारदर्शकता आणि आवश्यक तेवढी पडताळणी या चार गोष्टींचा समतोल साधला, तर विवाहासारखा महत्त्वाचा निर्णय अधिक सजगपणे घेता येईल.आजचा प्रश्न एवढाच आहे की, लग्न जुळवताना आपण विश्वास ठेवावा की पडताळणी करावी? कदाचित बदलत्या काळाने याचे उत्तर दिले आहे, विश्वास ठेवा; पण खात्री करून.

**कावेरी गिरी**

# शेतकऱ्यांच्या आक्रोशापुढे प्रशासन झुकले; चौकशी समिती गठित

## रविराज मोरेंच्या उपोषणाला निर्णायक यश; १५ दिवसांत अहवाल, दोषींवर निलंबनासह कठोर कारवाईचे लेखी आश्वासन

■ प्रतिनिधी | अकोट ■

शेतकऱ्यांच्या थकीत रकमेसह अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीतील कथित गैरप्रकारांविरोधात सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रविराज मोरे यांनी पुकारलेल्या तीन दिवसीय आमरण उपोषणाला अखेर यश आले. सोमवारी हजारो शेतकरी बाजार समितीसमोर एकवटले. रास्ता रोकोमुळे प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाल्यानंतर अखेर चौकशी समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला. चौकशीचा अहवाल १५ दिवसांत सादर करण्यात येणार असून, दोषी आढळणाऱ्यांवर निलंबनासह कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले.

अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीतील ८३ शेतकऱ्यांची थकीत रक्कम तातडीने अदा करावी, तसेच बाजार समितीचे सचिव राजकुमार माळवे यांच्यावर कारवाई करावी, यासह विविध मागण्यांसाठी रविराज मोरे यांनी उपोषण सुरू केले होते. आंदोलनाला तालुक्यातील शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. सोमवारी हजारो शेतकरी बाजार समितीसमोर दाखल झाल्याने परिसराला छावणीचे स्वरूप आले.



दरम्यान, पोलिसांनी मोरे यांना आंदोलनस्थळावरून डिटेन केल्याने शेतकरी अधिकच आक्रमक झाले. त्यानंतर शेतकऱ्यांनी रास्ता रोको करीत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. वाढता जनक्षोभ पाहता प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या.

### डीडीआर साबळे यांनी घेतली आंदोलकांची भेट

डीडीआर साबळे यांनी अकोट येथे येऊन आंदोलकांशी चर्चा केली. प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समितीत बुलढाणा येथील डीडीआर यांचाही समावेश करण्यात येणार असून, समितीला १५ दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर निलंबनासह नियमानुसार कठोर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले. मोरे यांना डिटेन केल्यानंतर शेतकरी नेते ब्रह्मकुमार पांडे आणि ललित दादा बहाळे यांनी आंदोलनाची धुरा सांभाळली. त्यांनी प्रशासनाकडे शेतकऱ्यांच्या मागण्यांचा जोरदार पाठपुरावा केला. माजी आमदार संजय गावंडे, दिलीप बोचे, भारतीताई गावंडे, कु. चंचल पितांबरवाले, ॲड. मनोज खंडारे, शेतकरी नेते प्रशांत डीक्कर, महेश गणगणे यांच्यासह अनेक नेते, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि हजारो शेतकरी आंदोलनात सहभागी झाले.

तीन दिवसांच्या उपोषणानंतर प्रशासनाने चौकशी समिती गठित करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने आंदोलनाला तूर्तास निर्णायक वळण मिळाले आहे. मात्र, १५ दिवसांत चौकशी अहवाल सादर होऊन प्रत्यक्ष दोषींवर कारवाई होते का, तसेच ८३ शेतकऱ्यांची थकीत रक्कम कधी मिळते, याकडे आता शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे. 'शेतकऱ्यांच्या न्याय आणि हक्कासाठी पुढील काळातही लढा सुरूच राहील,' अशी भूमिका रविराज मोरे आणि ब्रह्मकुमार पांडे यांनी व्यक्त केली.

# एनओसीच्या 'रेटकार्ड'ला एसीबीचा दणका!

## ठाणेदारांच्या नावाने ३० हजार, स्वतःसाठी ५ हजारांची मागणी; लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

वाईन बार सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या ना हरकत प्रमाणपत्रासाठी ६५ हजार रुपयांची लाच मागून तडजोडीनंतर ३५ हजार रुपये स्वीकारणाऱ्या चान्नी पोलिस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी (१८ ऑगस्ट) रंगेहात पकडले. महादेव मधुकरराव देशमुख (वय ५७) असे कारवाई करण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे. या कारवाईमुळे चान्नी पोलिस ठाण्यात खळबळ उडाली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिमकडे १२ ऑगस्ट रोजी एका ३० वर्षीय व्यावसायिकाने तक्रार दाखल केली होती. तक्रारदाराचे मळसूर-पांगरा रोड परिसरात 'भूमिपुत्र बिअर अँड वाईन शॉप' असून, त्यांना तेथे वाईन बार सुरू करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे नियमानुसार अर्ज केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने चान्नी पोलिस ठाण्याकडून एनओसीसाठी पडताळणी सुरू होती.

या प्रक्रियेदरम्यान पोलीस उपनिरीक्षक महादेव देशमुख आणि ठाणेदार दराडे यांच्या नावाने तक्रारदाराकडे ६५ हजार रुपयांची लाच मागण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता. तक्रारीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १२, १५ आणि १७ ऑगस्ट रोजी मळसूर येथे पडताळणी केली. या पडताळणीत तडजोडीनंतर ठाणेदारांसाठी ३० हजार रुपये आणि स्वतःसाठी ५ हजार रुपये, अशी एकूण ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारण्याचे देशमुख यांनी मान्य केल्याचे निष्पन्न झाले.दरम्यान, तक्रारदाराने एनओसीच्या कामासाठी ठाणेदार दराडे यांची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली असता, त्यांची भेट घेण्याची आवश्यकता नसल्याचे पोलीस उपनिरीक्षक देशमुख यांनी सांगितल्याचे एसीबीच्या अहवालात नमूद आहे. विशेष म्हणजे, १२ ऑगस्ट रोजी ठाणेदार दराडे यांच्याबाबत करण्यात आलेली पडताळणी नकारात्मक आल्याचे एसीबीने स्पष्ट केले असून, त्यांनी एनओसीसाठी पैशांची मागणी केल्याचे निष्पन्न झाल नाही. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी १८ ऑगस्ट रोजी सापळा रचला. सकाळी सुमारे १०.३७ वाजता चान्नी पोलिस ठाण्यातील खुपीया कक्षात पोलीस उपनिरीक्षक महादेव देशमुख यांनी तक्रारदाराकडून ठाणेदारांच्या नावाने ३० हजार आणि स्वतःसाठी ५ हजार, अशी एकूण ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले.

या प्रकरणी चान्नी पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोपी लोकसेवकास ताब्यात घेण्यात आले असून, गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकेची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आरोपीच्या निवासस्थानी घरझडतीची कारवाईही सुरू असल्याची माहिती देण्यात आली. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिमच्या पोलीस निरीक्षक सुलभा राऊत यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पर्यवेक्षक अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक जगदीश परदेशी यांनी काम पाहिले. पथकात पोलीस हवालदार विनोद मारकंडे, समाधान मोघाड, पोलीस अंमलदार मनोहर हेम्बाडे आणि वाहनचालक नावेद शेख यांचा समावेश होता. या कारवाईस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावतीचे पोलीस अधीक्षक बापू बांगर यांचे मार्गदर्शन लाभले.

### चौकशीला वेग येण्याची शक्यता

वाईन बारच्या एनओसीसाठी लाचेची मागणी करून प्रत्यक्ष रक्कम स्वीकारल्याने पोलीस उपनिरीक्षक देशमुख एसीबीच्या जाळ्यात अडकले आहेत. दरम्यान, लाचेतील ३० हजार रुपये ठाणेदारांच्या नावाने मागितल्याचा आरोप असला तरी पडताळणीमध्ये ठाणेदार दराडे यांची भूमिका नकारात्मक आल्याचे एसीबीने नमूद केले आहे. त्यामुळे या प्रकरणातील पुढील तपासात लाचेच्या रकमेची मागणी, त्यातील लाभार्थी आणि पैशांच्या व्यवहाराची पार्श्वभूमी याबाबत अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

# चान्नी ठाणे हद्दीत अवैध दारूविक्रीविरोधात महिलांचा एल्गार

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील ग्रामीण भागात वाढलेल्या गावठी दारूच्या अवैध विक्रीला आळा घालावा, तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील प्रलंबित हप्ते पात्र महिलांना तातडीने अदा करावेत, या मागणीसाठी सावरगाव, झरंडी, नवेगाव, पिंपळडोळी, उंबरवाडी व आलेगाव परिसरातील शेकडो महिलांनी सोमवारी (१८ ऑगस्ट) अकोला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.



सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात महिलांनी अवैध दारूविक्रीविरोधात आक्रमक भूमिका घेतली. ग्रामीण भागात गावठी दारूची निर्मिती व विक्री वाढल्याने व्यसनाधीनता, कौटुंबिक कलह तसेच अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. अवैध दारूविक्रेत्यांवर कठोर कारवाई करून परिसरात दारूमुक्ती अभियान राबवावे, अशी मागणी महिलांनी केली.

दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील अनेक पात्र महिलांना अद्याप हप्ते मिळालेले नाहीत. पडताळणी तसेच आधार-बँक खाते जोडणीतील अडचणींमुळे हप्ते प्रलंबित असल्याचे महिलांनी सांगितले. संबंधित अडचणी तातडीने दूर करून पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यावर थकीत हप्ते जमा करावेत, अशी मागणीही जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली. मोर्चात समाधान गाढवे, सागर लाड, अतुल वसतकार, शंकर जाधव, मयूर गावंडे, गुलाब अंभोरे, विशाल इंगळे यांच्यासह परिसरातील शेकडो महिला सहभागी झाल्या.

**अकोला :** गोरक्षण रोडस्थित व्हीएचबी कॉलनी परिसरातील मुख्य रस्त्यावरील भव्य प्रांगणात विराजमान होणाऱ्या 'गोरक्षण रोडचा राजा' च्या आगमनाचीही जोरदार तयारी सुरू झाली.

**Change In Name**

I Have change
My Name from
**MOHD ARIF MOHD ABDUL RASHID**
-TO-
**MOHAMMAD ARIF ABDUL RASHID**
My Passport Number - J9289329My Residential Address In Mahalaxmi colony, near micro tower, Shiloda Akola 444003

**Change In Name**

I have change
my Name From
**RUBINA JABIN SYED NOORALI**
--TO--
**RUBINA PARAVIN AMIN AHAMAD KHAN**
My Resedancial Address is - PATHANPURA WARD NO 7 DARGA ROAD MANGRULPIR DIST WASHIM 444003

**Change In Name**

I Have Change My Name In My Son Passport Passport No. N3377330 From
**PARAGKUMAR SUBHASHCHANDRA SHAH**
-TO-
**PARAG SUBHASHCHANDRA SHAH**
My Residential Address is Navkar Banglow, Nr. Collector Office, Radhe Nagar akola, Maharashtra 444001.

**Change In Name**

I Have change
My Name from
**SHAMA PARVIN MOHD ARIF**
-TO-
**SHAMA PARVEEN MOHAMMAD ARIF**
My Passport Number - J9289328My Residential Address In Mahalaxmi colony, near micro tower, Shiloda Akola 444003

**Change In Name**

I Have Change My Name In My Passport Passport No. N3377330 From
**SMIT PARAGKUMAR SHAH**
--TO--
**SMIT PARAG SHAH**
My Residential Address is Navkar Banglow, Nr. Collector Office, Radhe Nagar akola, Maharashtra 444001.

**Change In Name**

I Have change
My Name from
**FARIDA BEGUM KAISAR KHAN**
-TO-
**FARIDA KHATUN KAISAR KHAN**
My Passport Number - F 6755303
My Residential Address In June Lokhand Bazaar, Baidpura Akola 444001

**Change In Name**

Have Change My Name In My Son Passport Passport No. N3377330 From
**POOJA PARAGKUMAR SHAH**
--TO--
**POOJA PARAG SHAH**
My Residential Address is Navkar Banglow, Nr. Collector Office, Radhe Nagar akola, Maharashtra 444001.

**Change In Name**

I Have change
My Name from
**KAMALJOT SINGH ANAND**
- TO-
**KAMALJOT SWARANJIT SINGH ANAND**
My Passport Number -A1466156
My Residential Address In Anand Niwas, Shri Hari Nagar, Nibandhe plot Akola 444005

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३१८/२०२६ प्रोसेस नं.१०३३४/२०२६
चौ.ता. २४/०९/२०२६ दिनांक : ११/०८/२०२६

**अर्जदार :** १. प्रविण श्रीरामजी दांदळे २. सुनिल श्रीरामजी दांदळे दोघेही रा. गोमाजी नगर, डीपी रोड, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्रीमती. प्रमिला श्रीराम दांदळे
**पत्ता :-** रा.गोमाजी नगर, डीपी रोड, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीमती प्रमिला श्रीराम दांदळे यांचे दि. १५/०४/२०२५ रोजी निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३७३/२०२६ प्रोसेस नं.१०४५९/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ दिनांक : १४/०८/२०२६

**अर्जदार :** तुळसाबाई गुलाबराव नवलकार रा. आगर, ता. जि. अकोला. मो. क्र. ९८२२२१७८१२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. झांगोजी / झागोराव पुनाजी साबळे २. कासाबाई झांगोजी / झागोराव साबळे
**पत्ता :-** रा.आगर, ता. जि. अकोल. मो. क्र. ९८२२२१७८१२

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत झांगोजी / झागोराव पुनाजी साबळे यांचे दि. ०७/०२/२०२२ रोजी व मयत कासाबाई झांगोजी / झागोराव साबळे यांचे दि. १४/०५/२०१६ रोजी मांजरी, ता. बाळापूर, जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९१/२०२६ प्रोसेस नं.२७९७/२०२६
चौ.ता. १५/०९/२०२६ दिनांक : ०४/०८/२०२६

**अर्जदार :** बेबी भरत कुटेमाटे, वय ७५ वर्ष, मो.नं.८८३०९६३७७४ रा. कळाशी, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII अकोट, १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील नमुद ठिकाणी राहत असून मयत जयवंत ज्ञानदेव तरोळे, हे राहत्या घरी पातोंडा, ता. अकोट, जि. अकोला येथे दि. १२/०९/२०२१ रोजी अविवाहित मृत्यू झाले आहेत. तसेच त्यांचे वडील नामे ज्ञानदेव दौलत तरोळे हे दि. ०८/०६/१९८६ रोजी तसेच त्यांच्या आई मधुकला ज्ञानदेव तरोळे ह्या दि. २८/०७/२००५ रोजी तसेच त्यांचा अविवाहीत भाउ बंडु ज्ञानदेव तरोळे हे दि. २४/११/२०२१ रोजी राहते घरी मरण पावले आहेत. अर्जदार ही मयत जयवंत ज्ञानदेव तरोळे यांची सख्खी बहिण असून, त्या कायदेशीर वारस आहेत. याव्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०४/०८/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२५६/२०२६ प्रोसेस नं.९९३८/२०२६
चौ.ता. २१/०९/२०२६ दिनांक : ०१/०८/२०२६

**अर्जदार :** १. माधुरी गजानन रत्नपारखी लग्नापुर्वीचे नाव-माधुरी सुधाकर मेहरूणकर रा. आशिर्वाद अपार्टमेंट, रेणुका नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. २. चंद्रकांत सुधाकर मेहरूणकर ३. मृणाल मधुकर मेहरूणकर क. २ व ३ रा. व्दारा विजय जे. कुळकर्णी, व्हीटीसी डाबकी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुधाकर यशवंत मेहरूणकर
**पत्ता :-** रा. आशिर्वाद अपार्टमेंट, रेणूका नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे. की, मयत सुधाकर यशवंत मेहरूणकर यांचे दि. २५/०७/२०२३ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर ईशारा नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, **१. मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा परिषद अकोला, पोट तुकडी तालुका बार्शीटाकळी पैकी मौजे पुनोती बु. या गावाचे हद्दीतील व शिवारातील शेतमिळकती **अ.शेतमिळकती : १.गट क्र. १४/५** यासी क्षेत्र हे १.३६ आर, आकार रु.०६.० पैसे, **२.गट क्र. १२** यासी क्षेत्र हे ३.९४ आर + पो.ख. हे ०.१० आर, आकार रु. २३.४० पैसे, एकुण क्षेत्र हे ०४.०४ आर **३.गट क्र. ७/१अ** यासी क्षेत्र हे १.०१ आर, आकार रु.०८.७५ पैसे, **४.गट क्र. १३/५** यासी क्षेत्र हे ३.०६ आर +पो.ख. हे ०.०१ आर, एकुण क्षेत्र हे ०३.०७ आर आकार रु. १८.०० पैसे, **५.गट क्र. १३/३** यासी क्षेत्र हे १.५५ आर, आकार रु. ०९.५० पैसे, **६.गट क्र. १४/२** यासी क्षेत्र हे २.५० आर +पो.ख. हे ०.०३ आर, एकुण क्षेत्र हे ०२.५३ आर, आकार रु.१३ .०० पैसे. **७.गट क्र. १३/२** यासी क्षेत्र हे १.२८ आर, आकार रु. ०८.०० पैसे, **८.गट क्र. ७/१** यासी क्षेत्र हे ०.८९ आर + पो.ख. हे ०.१४ आर, एकुण क्षेत्र हे ०१.०३आर आकार रु. ०८.७५ पैसे, **९.गट क्र. १४/१** यासी क्षेत्र हे ४.०३ आर, आकार रु.२१.०० पैसे, **१०.गट क्र. १३/४** यासी क्षेत्र हे २.१७ आर + पो.ख. हे ०.०५आर, एकुण क्षेत्र हे ०२.२२ आर आकार रु.१२.०० पैसे, **११.गट क्र. १४/३** यासी क्षेत्र हे २.५४ आर, आकार रु.१३.०० पैसे, **१२.गट क्र. १४/४** यासी क्षेत्र हे २.७४ आर, आकार रु.१४.०० पैसे, **१३.गट क्र. २/२** यासी क्षेत्र हे १.१७ आर, आकार रु. ६.५५ पैसे, **१४.गट क्र. १६/१** यासी क्षेत्र हे २.१५ आर + पो.ख. ०.०६ आर, ए. क्षेत्र हे ०२.२१ आर, **१५.गट क्र. ४६/२** यासी क्षेत्र हे १.१४ आर, आकार रु.१०.२० पैसे, **१६.गट क्र. ४६/३** यासी क्षेत्र हे १.४२ आर, आकार रु.१०.२५ पैसे, या शेतमिळकती मिळकत असे.

**ब.निवासी घर आणि भूखंड मिळकती :-**

तुकडी जिल्हा परिषद अकोला, पोट तुकडी तालुका बार्शीटाकळी पैकी मौजे पुनोती बु. (सकणी) या गावाचे ग्रामपंचायत हद्दीतील मिळकती.

**१.मालमत्ता क्रमांक २७८** असलेले निवासी पक्के घर, एकूण क्षेत्रफळ १३६० चौ. फूट **२.मालमत्ता क्रमांक २७९** असलेले निवासी पक्के घर, एकूण क्षेत्रफळ १३६० चौ. फूट **३. मालमत्ता क्रमांक २७७** असलेले दगड विटा मातीचे घर, एकूण क्षे. १३६० चौ. **फूट ४. मालमत्ता क्रमांक २५७**, खुला भूखंड एकूण क्षेत्रफळ १३६० चौ. फूट **५.मालमत्ता क्रमांक २५६,** खुला भूखंड एकूण क्षेत्रफळ १३६० चौ. फूट **६.मालमत्ता क्रमांक २५४,** जनावरांचा गोठा पक्के घर, एकूण क्षेत्रफळ १३६० **७.मालमत्ता क्रमांक २५५,** खुला भूखंड एकूण क्षेत्रफळ १३६० चौ. फूट **८.मालमत्ता क्रमांक २७५,** खुला भूखंड एकूण क्षेत्रफळ १३६० चौ. फूट **९.मालमत्ता क्रमांक २७४** जनावरांचा गोठा एकूण क्षेत्रफळ १३६० चौ. फूट चौ. फूट **१०. मालमत्ता क्रमांक २७३,** जनावरांचा गोठा व खुला भूखंड एकूण क्षे. १३६० चौ. फूट. **११. मालमत्ता क्रमांक २७२,** निवासी घर व खुला भूखंड एकूण क्षे. १३६० चौ. फूट. **१२.मालमत्ता क्रमांक २८०** असलेले निवासी पक्के घर, एकूण क्षे. १३६० चौ. फूट. **१३.मालमत्ता क्रमांक २८१** असलेले दगड विटा मातीचे घर, एकूण क्षे. १३६० चौ. फूट. **१४.मालमत्ता क्रमांक २८३** जनावरांचा गोठा एकूण क्षेत्रफळ १३६० चौ. फूट. **१५.मालमत्ता क्रमांक २८२,** खुला भूखंड एकूण क्षेत्रफळ १३६० चौ. फूट वरील निवासी घर आणि खुले भूखंड, गोठा या मिळकती.'

२. वरील कलम क्र. १अ व १ब मध्ये वर्णन केलेली मिळकती ह्या आमचे पक्षकार **सौ. सुनंदा पुरुषोत्तम झटाले** यांच्या वडिलोपार्जित मालमत्ता आहे. दरम्यानच्या काळात आमचे अशिल यांचे भाऊ व इतर नातेवाईक यांनी स्वतःचा फायदा करून घेण्याच्या उद्देशाने, लबाडीने व बेकायदेशीरपणे, आमचे अशिल यांचा अविभक्त हिस्सा डावलून सदर मिळकतीचे बेकायदेशीर वाटप, मृत्युपत्र व इतर करून घेतल्याचा वाद निर्माण झालेला आहे. त्या संदर्भाने दिवाणी न्यायालय, अकोला येथे रे.मु. नं. ४८/२०२२ हा दावा/प्रकरण प्रलंबित असून त्याची पुढील तारीख १४/०८/२०२६ अशी नेमलेली आहे. म्हणून, सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीने खरेदी-विक्री, गहाण, बक्षीसपत्र, हस्तांतरण, ताबा व्यवहार किंवा इतर कोणताही व्यवहार करू नये, तसेच असा व्यवहार केल्यास संबंधित व्यक्ती दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कार्यवाहीस पात्र राहील तसेच त्या कामी होणाऱ्या खर्चास, जोखमीस व परिणामास सर्वस्वी जबाबदार राहील. यासाठी ही जाहीर ईशारा नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. कळावे.

पिंपळगांव (ब), ता.११/०८/२०२६
आमचे मार्फत प्रसिध्द

**श्री. त्र्यंबक एकनाथ वाटपाडे**
**ॲडव्होकेट व नोटरी**
ऑफीस:- ८, जयआनंद शॉपिंग सेंटर,
पिंपळगांव (ब), ता. निफाड, जि. नाशिक

## विदर्भ ग्रामिण शिक्षण संस्था
## अकोला आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स ज्यु. कॉलेज (एस. आर. पाटील कॉलेज)
### सहकार नगर, गोरक्षण रोड अकोला.

**पाहिजेत**

शैक्षणिक सत्र २०२६ - २०२७ करिता एच. एस. सी व्होकेशनल ज्यु. कॉलेज शिवर, अकोला (१०० टक्के अनुदानित) येथे घड्याळी तासिका तत्वावर खालील पदे भरावयाची आहे.

| अ. क्र. | पद | पदांची संख्या | विषय | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | अर्धवेळ क.म.वि. शिक्षक | १ | मराठी | एम.ए.(बी.एड) मराठी |
| २ | अर्धवेळ क.म.वि. शिक्षक | १ | इंग्रजी | एम.ए.(बी.एड) इंग्रजी |
| ३ | अर्धवेळ क.म.वि. शिक्षक | १ | जी.एफ.सी | एम.कॉम (बी.एड/एम.बी.ए.) |
| ४ | अर्धवेळ क.म.वि. शिक्षक | १ | पर्यावरण शास्त्र | एम.एस.सी. (बी.एड) |
| ५ | अर्धवेळ क.म.वि. शिक्षक | १ | शा.शिक्षण | एम.ए.एम.पी.एड. बी.ए |

वरील पदावरील पात्र व अनुभवी उमेदवारांनी आपल्या मुळ कागदपत्रासह दि. २६ ऑगस्त २०२६ मंगळवार रोजी सकाळी ८ : ०० ते ११: ०० वाजेपर्यन्त मुलाखती करीता खालील पत्त्यावर उपस्थित राहावे.

**प्राचार्य**
एस. आर. पाटील आर्टस् कॉमर्स सायन्स ज्यु कॉलेज, सहकार नगर, गौरक्षण रोड अकोल

SANT GADGEBABA AMRAVATI UNIVERSITY AMRAVATI
**SHRI DHABEKAR KALA MAHAVIDYALAYA, KHADKI (CHA), TQ. DIST. AKOLA.**
( NAAC ACCRIDIATED GRADE-B )

**WANTED**

For The session 2026-27
NAME OF THE COLLEGE -. **SHRI DHABEKAR KALA MAHAVIDYALAY KHADKI (CHA) DIST. AKOLA**

Applications are invited for appointments of Candidates for teaching in the college on contributory (CHB) basis as under.

Vacancies for Grant-in-aid Course/programmes.
(As Per Regulation No.2/2020, and its para-11, G.R. Dated 17/10/2022)

| Sr.No. | Subject/Course | Total No. of Contributory Post. |
|---|---|---|
| 1. | English | 02 |

Eligibility: Academic qualifications shall be as per U.G.C. Regulation 2018 (University Direction No. 08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No.संकीर्ण--2018/ (185/18)/मशि-3, dt. 14-11-2018. The other conditions and Remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.

Qualified Candidates should appear for direct interview on Monday dated 24 August 2026 at 10. A.M in the office of Shri. Dhabekar kala Mahavidyalaya Khadki (cha) Dist. Akola at their own Cost along with application on plain Paper With two Xerox Copies of marksheets , Caste Certificate, Caste validity two Passport Photos, Aadhar Cards and original testimonials With Biodata.

**President**
**Shri. Anil Patil Dhabekar**
Shri Sant Dnyaneshwar Bahuuddeshiya Mandal, Dhaba, Tq. Barshitakali, Dist. Akola

**(Principal)**
SHRI DHABEKAR KALA MAHAVIDYALAY KHADKI (CHA) DIST. AKOLA

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २४९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# वर्धेत प्रथमच आढळली काळ्या छातीची सुगरण

**वर्धा**-जिल्ह्याच्या समृद्ध पक्षीवैविध्यात आणखी एका दुर्मिळ पक्ष्याची भर पडली आहे. काळ्या छातीची सुगरण अर्थात ब्लॅक ब्रेस्टेड वीव्हर या पक्ष्याची वर्धा जिल्ह्यात प्रथमच छायाचित्रीत नोंद झाली आहे. समुद्रपूर तालुक्यातील ग्रामीण भागात हा पक्षी आढळून आला.हिंगणघाटचे पक्षी अभ्यासक व सर्पमित्र प्रविण कडू, वर्ध्याचे पक्षी अभ्यासक व वन्यजीव छायाचित्रकार राहुल वकारे, यशवंत शिवणकर आणि अनिल गडवानी यांनी ही नोंद केली. उंच गवतामध्ये नर आणि मादी असे एकूण सहा पक्षी आढळले. याठिकाणी पाच अर्धवट बांधलेली घरटी दिसून आली असून घरटी बांधण्याचे काम सुरू असल्याचे निरीक्षणात आले.

## प्रारंभीक अधिसूचना

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) उर्ध्व वर्धा प्रकल्प
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचे कार्यालय
**क्र.स.म.अ/भू.स/उवप्र/कावि-९४९/२०२६**
**दिनांक १२.०८.२०२६**

**भुमीसंपादन, पुनर्स्थापना न व करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,**

**२०१३ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना**

भुसंपादन प्रकरण क्रमांक - १४/एल.ए.क्यू-४७/२०२५-२६, मौजा - अंतरगाव, ता.सेलू, जि.वर्धा

**ज्याअर्थी, भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वनविभाग क्र.संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/(भाग-२)/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश** "उक्त अधिसूचना" **असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.**

**आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेंल्या, वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश** "उक्त अधिसूचना" **असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश** "उक्त सार्वजनिक प्रयोजन" **असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.**

**आणि ज्याअर्थी, सदर्हु प्रस्तावित भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत.**

**आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे.**

**आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्स्थापना या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे.**

**त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.**

**परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.**

**परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.**

**तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश** 'उक्त नियम' **असा करण्यात आला आहे) यांच्या नियम-१० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.**

**आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) उर्ध्व वर्धा प्रकल्प, वर्धा यांना पदनिर्देशित करीत आहे.**

**अनुसूची - एक**
**जमिनीचे वर्णन**
**भू.प्र.क्रमांक-१४/एल.ए.क्यू-४७/२०२५-२६**
**मौजा- अंतरगाव ता. सेलू, जि. वर्धा**

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| १. | ३३/१,३३/२,अ,३३/२/ब | ३.०६ |
| २. | ३४ | ०.३३ |
| ३. | ३५ | ०.२१ |
| ४. | ३६ | ०.०४ |
| ५. | ३८ | ०.२१ |
| ६. | ४१ | ०.१६ |
| ७. | ४३/१, ४३/२ | ०.२२ |
| ८. | ४४ | ०.२४ |
| ९. | ४५ | ०.०४ |
| १०. | ४७/अ,४७/ब,४७/क | ०.०७ |
| ११. | ६९/१,६९/२,६९/३,६९/४, ६९/५,६९/६,६९/७ | ३.९१ |
| १२. | ७४ | ०.०७ |
| १३. | ७९/१, ७९/२ | १.०५ |
| १४. | ११० | ०.०३ |
| | एकुण | ९.६४ |

**अनुसूची दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** - **वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पाच्या लिंक-१ अंतर्गत मुख्य कालव्याच्या बांधकाम करण्याकरीता**

**सिंचन योजना प्रकल्प कार्याचे वर्णन** - **वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पाच्या लिंक-१ अंतर्गत मुख्य कालव्याच्या बांधकाम करण्याकरीता**

**समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार पायाभूत सुविधा, सोयी सुविधा, याबाबत इतर लाभासंबंधात)** - **या प्रकल्पामुळे ता.सेलू जि.वर्धा येथील २२६२० हे.आर. जमिनीस सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सिंचनाकरीता व सार्वजनिक पाणी पुरवठा होणार असल्यामुळे व त्या परिसरातील शेतकऱ्यांना त्याचबरोबर ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर यांना रोजगाराच्यास ंधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात सुधारणा होणार आहे.**

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** - **कुणीही व्यक्ती किंवा कुटूंब विस्थापित होत नाही.**

**अनुसूची - चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या प्राधिकरणाने दिलेला)** - **मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.भूसंपादन/कार्या-४(१)/कावि-३५७/२०२६ दि.२८.०७.२०२६ अन्वये भूसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम ६(२) व कलम १० चे परंतुकानुसार प्रकरण दोन व तीन च्या तरतुदी लागू होत नाहीत.**

**अनुसूची - पाच**
नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

--- निरंक ---

विशेष नोंद -
**उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) उर्ध्व वर्धा प्रकल्प, वर्धा या कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.**

**दिनांक - १२.०८.२०२६**
**ठिकाण - वर्धा**

(क्र.जिमाका-वर्धा/१३०/२०२६-२०२७)

स्वाक्षरी/-
**जिल्हाधिकारी, वर्धा**

# पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते महा वॉकेथॉन लोगोचे अनावरण

**जलसंधारणदिनी २१ ऑगस्टला वॉकेथॉनचे आयोजन, सहभागासाठी क्युआर कोडद्वारे नोंदणीची सुविधा**



**वर्धा /जनमाध्यम**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटरच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. दि.२१ ऑगस्ट या जलसंधारण दिनी वर्धा शहरात या वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. १५ वर्षावरील प्रत्येक व्यक्ती यामध्ये सहभागी होऊ शकतील.

लोगो अनावरण प्रसंगी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अप्पर जिल्हाधिकारी संजय तेली, भारतीय प्रशासकीय सेवेतील परिवीक्षाधिन अधिकारी शोभिका पाठक तसेच विभागप्रमुख अधिकारी उपस्थित होते.

राज्याचे माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांची जयंती व जलसंधारण दिनानिमित्त मृद व जलसंधारण विभागामार्फत दि.१५ ते २१ ऑगस्ट या दरम्यान जलसंधारण सप्ताह राबविण्यात येत आहे. त्यानिमित्त मृद व जलसंधारणाच्या जनजागृती साठी दि.२१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटरचे आयोजन करण्यात आले आहे. वॉकेथॉनमध्ये प्रथम दहा विजेत्यास जिल्हास्तरावर सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.

तर सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. महा वॉकेथॉनमध्ये क्युआर कोड स्कॅन करून सहभागासाठी नोंदणी करता येणार आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकातून सकाळी ७ वाजता मान्यवरांच्याहस्ते हिरवी झेंडी दाखवून महा वॉकेथॉनला सुरुवात होईल.

तत्पूर्वी सकाळी ६.४५ वाजता मृद व जलसंधारणाची शपथ होईल. शुभारंभानंतर महात्मा गांधी चौक, विश्रामगृह, जिल्हा परिषद समोरून मार्गक्रमण करत महा वॉकेथॉन पुन्हा आंबेडकर चौकात येईल व समारोप होईल.

### जलसंधारण उपक्रमास योगदान द्या : डॉ.पंकज भोयर

मृद व जलसंधारणाचे महत्व भावी युवा पिढीला महत्व पटवून देण्यासाठी १५ ते २१ ऑगस्ट या कालावधीत जलसंधारण सप्ताह राबविण्यात येत आहे. याअंतर्गत दि.२१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन तसेच युवकांसाठी जलसंधारण या विषयावर इन्स्टाग्राम रील स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. माती व पाण्याचे महत्व पटवून देणाऱ्या या उपक्रमास योगदान देण्याचे आवाहन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी यावेळी केले.

# पोलीस ठाण्यासमोर कचरा; स्वच्छतेसाठी होमगार्डची ड्युटी

**सीसीटीव्हीच्या निगराणीत शहर तरीही बेशिस्तीचा कळस, कारवाईऐवजी पोलिसांवर अतिरिक्त बंदोबस्ताची वेळ**



**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील नागरिकांच्या बेशिस्तीचा कळसच गाठला असून चक्क शहर पोलिस ठाण्यासमोरच कचरा टाकला जात आहे. पोलिस ठाणे आणि सीसीटीव्ही कॅमेरे अगदी समोर असतानाही काही नागरिक निर्ढावल्याप्रमाणे कचऱ्याच्या पिशव्या रस्त्याच्या कडेला फेकून निघून जात आहेत. त्यामुळे कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी तो रोखण्यासाठी पोलिसांना आता होमगार्डची ड्युटी लावावी लागत असल्याचे संतापजनक चित्र समोर आले आहे.

शहरातील विविध भागांत आपण सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आहोत, असे फलक लावण्यात आले आहेत. मात्र, या फलकांचा आणि सीसीटीव्हीच्या धाकाचा नागरिकांवर कोणताही परिणाम होत नसल्याचे या प्रकारावरून स्पष्ट होत आहे. पोलिस ठाण्यासमोरच कचरा टाकला जात असल्याने परिसराचे विद्रुपीकरण होत असून स्वच्छतेच्या मोहिमेलाच नागरिकांकडून हरताळ फासला जात आहे.

विशेष म्हणजे काही नागरिक चालत्या वाहनातून कचऱ्याच्या पिशव्या थेट रस्त्याच्या कडेला फेकून देतात. कचरा कुठे टाकावा याचे भानही काहींना राहिलेले नाही. वारंवार सूचना करूनही प्रकार थांबत नसल्याने पोलिस ठाण्यासमोरील परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्याची वेळ आली आहे.

कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याऐवजी त्यांच्या बेशिस्तीवर पहारा देण्यासाठी होमगार्ड तैनात करावा लागणे ही शहरासाठी लाजिरवाणी बाब आहे. सीसीटीव्ही असूनही कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई होत नसेल तर निगराणीचा उपयोग काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.प्रशासनाने केवळ स्वच्छतेचे फलक लावून थांबू नये. सीसीटीव्हीच्या माध्यमातून कचरा टाकणाऱ्यांची ओळख पटवून त्यांच्यावर कठोर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### मारहाण करीत रोकड हिसकावली

**वर्धा**-रस्त्याने जात असलेल्या व्यक्तीला अडवून मारहाण करीत धारदार शस्त्राचा धाक दाखवून १० हजार रुपयांची रोकड हिसकावण्यात आल्याची घटना पुलगाव शहरातील नागपूरफैल परिसरात घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध पुलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाचणगाव येथील रहिवासी पवन सोंदिया हे नागपूरफैल परिसरातून जात असताना मोन्या इंगळे वय ३२, सुमीत इंगळे वय ३५ आणि रितेश कांबळे वय ३५ यांनी त्यांना वाटेत अडविले. तेथे धारदार शस्त्राचा धाक दाखवून त्यांच्याकडील १० हजार रुपयांची रोकड हिसकावली.पवन सोंदिया यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### महिलेचे दागिने चोरी

**वर्धा**-बसने प्रवास करणाऱ्या ७८ वर्षीय महिलेच्या बॅगमधील सोन्याचे दागिने असलेली पर्स अज्ञात चोरट्याने लंपास केली.चोरी गेलेल्या दागिन्यांची किंमत ४ लाख ४५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. वर्धा शहरातील लहानुजी नगर येथील मालती कावळे या राजुरा येथून जाम बसस्थानकावर आल्या होत्या. त्यानंतर त्या वर्ध्याकडे जाणाऱ्या बसमध्ये चढल्या. तिकीट काढण्यासाठी त्यांनी बॅग उघडली असता त्यातील छोटी पर्स गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या पर्समध्ये दोन लाख रुपये किमतीच्या सोन्याच्या बांगड्या, ६० हजार रुपयांची सोन्याची मोहनमाळ, एक लाख २५ हजार रुपयांचे सोन्याचे लॉकेट आणि ६० हजार रुपयांची सोनसाखळी होती. मालती कावळे यांच्या तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### व्यक्तीच्या गळ्यावर वार

**वर्धा**-साहित्य खरेदीसाठी इतवारा बाजारात गेलेल्या व्यक्तीच्या गळ्यावर कटरने वार करून जखमी केल्याची घटना घडली. या प्रकरणी अनिल कुरिल याच्याविरुद्ध वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मध्यप्रदेशातील मंडला जिल्ह्यातील रहिवासी प्रेमसिंग आर्मो हे पत्नी आणि गावातील काही नागरिकांसह कारला रोड परिसरात राहतात.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २६२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# इन्स्टाग्रामवर चाकूसह फोटो व्हायरल

## राजापेठ पोलिसांनी २० वर्षीय तरुणाला घेतले ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** हातात प्राणघातक चाकू घेऊन फोटो काढून तो इन्स्टाग्रामवर व्हायरल करत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या २० वर्षीय तरुणाला राजापेठ पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून सुमारे १ हजार २०० रुपये किमतीचा चायना चाकू जप्त करण्यात आला. ही कारवाई मंगळवारी (१८ ऑगस्ट) सायंकाळी गोपालनगर परिसरात करण्यात आली. राजापेठ पोलिसांना इन्स्टाग्रामवर एक तरुण हातात चाकूसदृश प्राणघातक शस्त्र घेऊन फोटो व्हायरल करीत असल्याची माहिती मिळाली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी गुन्हे शाखेच्या पथकाला संबंधित तरुणाचा शोध घेऊन कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजल्यापासून गोपालनगर परिसरात पेट्रोलिंग सुरू केले. याचदरम्यान सुतगिरणीसमोर एक तरुण प्राणघातक शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष कारवाई करून वेदांत विनोदराव वर्गे (वय २०, रा. शिव मंदिराजवळ, आदर्शनगर, गोपालनगर, अमरावती) याला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याकडून एक चायना चाकू जप्त करण्यात आला. या चाकूची एकूण लांबी १२.५० इंच, पात्याची लांबी ९ इंच, मुठीची लांबी ४.५० इंच आणि पात्याची रुंदी १.९ इंच असून त्याची अंदाजे किंमत १ हजार २०० रुपये आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीने हातात प्राणघातक शस्त्र घेऊन त्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले होते. या प्रकारामुळे सर्वसामान्यांच्या मनात दहशत निर्माण होण्याची शक्यता असल्याने त्याच्याविरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ७५७/२०२६, कलम ४/२५ आर्म्स ॲक्ट तसेच कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

